सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३५७ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



अमेरिका, आफ्रिका व ऑस्ट्रेलियामध्ये मूळनिवासी असू शकतील. परंतु भारतात कोणताही एक समूह मूळनिवासी नाही. येथे तर आपण सर्व भारतवासी मूळनिवासी आहोत. कारण, भारतात आक्रमणकारी अथवा बाहेरून आलेले व मूळनिवासी असे दोन समूह नाहीत. मूळनिवासी ही संकल्पना भारतासाठी घातक आहे.

**- बाळासाहेब देशपांडे**
संस्थापक, अ.भा. वनवासी कल्याण आश्रम

## विनम्र अभिवादन



स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचा आज स्मृतिदिन

# बलशाली देशासाठी नागरिक निरोगी हवेत : राष्ट्रपती मुर्मू

### संतनगरीत राष्ट्रीय आयुष महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन

◆ **शेगाव, २५ फेब्रुवारी**

बलशाली देश निर्माण होण्यासाठी नागरिक निरोगी असले पाहिजेत, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. केंद्रीय आयुष्य मंत्रालय व अ. भा. आयुर्वेद संमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय आयुष महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

संत गजानन महाराज संस्थानच्या आनंद विसावा प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा राज मंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री मकरंद पाटील, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे, राजेश कोटेचा आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रपती म्हणाल्या, देशातील आरोग्य विभागावरील ताण कमी करणे व नागरिकांचे आरोग्य सुदृढ, स्वस्थ, निरोगी करणे हेच आयुष मंत्रालयाचे ध्येय व उद्दिष्ट आहे. मी स्वतः जंगलांशी निगडित आयुष्य जगलेली आहे. मानवी जीवनात वनौषधी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे जंगल वाचवणे, औषधी झाडांचे संरक्षण, संगोपन करणे ही केवळ सरकारचीच जबाबदारी नसून सर्व देशवासीयांची ती जबाबदारी असल्याचे त्या म्हणाल्या.

तणावमुक्त जीवन जगण्यासाठी सर्वात पहिले निरोगी आयुष्य असणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीमध्ये आपल्या गृहिणी स्वयंपाकघरामध्ये आयुर्वेदाचा वापर करीत होत्या. आपले ऋषिमुनी त्यावर संशोधन करीत होते. याच आयुर्वेदाच्या साहाय्याने मानवी जीवन सुखी व समृद्ध होते. आजारी पडल्यावर उपचार घेण्यापेक्षा आजारपण येऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे केव्हाही चांगले. हेच आयुष मंत्रालय आयुर्वेदाच्या माध्यमातून आपल्या सर्वांना आग्रहपूर्वक सांगत आहे. तेव्हा या आरोग्य मेळाव्यातून सुदृढ व निरोगी नागरिक बनवण्यासाठी आपण एक पाऊल पुढे टाकून सशक्त देशाची निर्मिती करूया, असे आवाहन त्यांनी केले.

*(तभा वृत्तसेवा)*



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरात जाऊन 'श्रीं'चे समाधी दर्शन घेतले. याप्रसंगी श्री गजानन महाराज संस्थानतर्फे त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

### स्वस्थ शरीरासाठी आयुर्वेद : राज्यपाल

**मानवी शरीर जल, स्थल, वायू, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वाने बनलेले आहे. त्याचा श्वास आयुर्वेदातच आहे. ते निरोगी ठेवण्यासाठी पंचतत्त्वातील गोष्टींचाच वापर करून चांगल्या पद्धतीने ते निरोगी राहू शकते. ऋतूप्रमाणे आहारात बदल केले तर आपण निरोगी राहू शकतो. तेव्हा या सर्व नियमांचे पालन आपण केले पाहिजे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.**

# चंद्रपूर किडनी रॅकेट प्रकरण विधानसभेत गाजले

### ● आरोपींची संपत्ती गोठवणार ● मकोका लावण्याची मागणी




### पीडित कुटुंबीयांना आर्थिक मदत देणार



**सावकाराच्या जाचाला कंटाळून आपली किडनी विकावी लागल्याने सदर अल्पभूधारक शेतकऱ्यांचे कुटुंब हलाकीच्या परिस्थितीत असल्यामुळे सदर कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून आर्थिक मदत करण्यात येईल, आश्वासन गृहराज्यमंत्री पंकज भुईवर यांनी संविधानसभेत दिले.**

◆ **मुंबई २५ फेब्रुवारी**

देशभरात गाजत असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील किडनी प्रकरणाचे बुधवारी विधानसभेत पडसाद उमटले. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी गरीब शेतकऱ्याला किडनी विकावी लागली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असल्याचे सांगत या प्रकरणातील आरोपींविरोधात मकोका लावण्याची मागणी सदस्यांनी केली. यावर आरोपींची संपत्ती गोठविण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, अशी माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सभागृहात दिली.

नागभीड तालुक्यात असलेल्या मिंथुर येथील अल्पभूधारक शेतकऱ्याला सावकारीचा कर्जाखाली आपली किडनी विकावी लागली असल्याचे प्रकरण बुधवारी विधानसभेत गाजले. सत्ताधारी पक्षाचे आमदार अतुल भातखळकर यांनी विधानसभेत बुधवारी लक्षविधे सूचनेच्या माध्यमातून चंद्रपूर येथील गाजलेल्या किडनी रॅकेट प्रकरणावर प्रकाश टाकला. एका अल्पभूधारक शेतकऱ्याने घेतलेल्या एका लाखाचे ७४ लाख रुपयांचे व्याज देणे हे गंभीर स्वरूपाचे प्रकरण आहे. व्याजाची रक्कम देण्यासाठी सावकाराने सतत तकादा लावल्याने सदर अल्पभूधारक शेतकऱ्याने कर्जाचे पैसे परत करण्यासाठी परदेशात जाऊन किडनी विकली असल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. ही घटना सांघिक स्वरूपाचा गुन्हा आहे. त्यामुळे यावर मकोका लावावा, अशी मागणी केली. त्याचबरोबर सदर प्रकरण हे जलद गती न्यायालयात चालवून कठोर शिक्षा करावी, अशी ही मागणी यावेळी आमदार भातखळकर यांनी केली. प्रकरण इतके गंभीर असतानाही आरोपी जामिनावर का सुटले? असा सवालही यावेळी केला.

गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सदर प्रकरणातील विस्तृत माहिती सभागृहाच्या लक्षात आणून दिली. पैसे परत केल्यानंतरही सावकारांनी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याकडे तगादा लावल्याने सोलापूरमधील एका व्यक्तीच्या संपर्कात येऊन सदर शेतकऱ्याने कंबोडिया येथे जाऊन किडनी विकली आणि त्याचे पैसे सावकारांना दिली. *(पान ५ वर)*

### किडनी रॅकेट राज्यभरात सक्रिय : वडेट्टीवार

सदर प्रश्नावर बोलताना आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, सदर किडनी रॅकेट प्रकरणात तामिळनाडू आणि दिल्ली येथील डॉक्टरांचा समावेश असून दिल्लीतील डॉक्टर हे पद्मश्री असल्याने सरकार त्यांचे काहीही करणार नाही अशी उपरोधिक टीका केली. अशा प्रकारची रॅकेट चालवणारे राज्यभरात सर्वत्र आहेत. शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांच्या किडन्या काढण्यापर्यंतची मजाल सावकारांची कशी जाते? असा खडा सवाल करीत आरोपींवर मकोका लावावा आणि पीडित कुटुंबीयाची हलाकीची परिस्थिती असून मुख्यमंत्री सहायता निधीमधून दहा लाख रुपयाचे आर्थिक मदत करावी, अशी ही मागणी यावेळी केली.

### मुंबई महापालिकेचा ८१ हजार कोटींचा अर्थसंकल्प

**मुंबई** : मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी आज सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ८० हजार ९५२.५६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना सादर केला. ज्यात ८९.८४ कोटी रुपयांची शिल्लक रक्कम दाखवण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या ७४ हजार ४२७. कोटी ४१ लाख रुपयांच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात ८.७७ टक्क्यांची भरीव वाढ झाली आहे.

### सरकारने केला थकित वेतनवाढीचा हप्ता जमा

**मुंबई** : महाराष्ट्रातील राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांचे दीड वर्षांहून अधिक काळ थकित राहिलेल्या वेतनवाढीच्या हप्त्यांचे देय त्यांच्या बँक खात्यात अखेर जमा करण्यात आले. ही माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

# निष्पाप नागरिकांची हत्या खपवून घेणार नाही

### इस्रायलच्या संसदेत हमासवर बरसले मोदी

**जेरुसलेम, २५ फेब्रुवारी**

निष्पाप नागरिकांची हत्या कदापि खपवून घेणार नाही, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी इस्रायलचे नेसेट अर्थात् संसदेला संबोधित करताना हमासवर केला.

इस्रायलच्या संसदेला संबोधित करणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. नरेंद्र मोदी यांना स्पीकर ऑफ द नेसेट या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताचा पंतप्रधान म्हणून मी १.४ अब्ज भारतीयांच्या मैत्रीचा संदेश आणला आहे. निष्पाप नागरिकांची हत्या कदापि सहन केली जाणार नाही. कोणत्याही किमतीत निर्दोष लोकांच्या हत्येला योग्य ठरवता येणार नाही. शांततेचा रस्ता सोपा नसतो. मात्र, भारत शांततेच्या या प्रक्रियेत नेहमीच सोबत राहील. गाझा शांतता प्रयत्नात भारत तुच्यासोबत आहे, असे मोदी यांनी सांगितले. जगभरात यहुदींचा विरोध वाढत असताना भारत आमच्यासोबत आहे. भारतात यहुदींवर कधीच अत्याचार झाले नाहीत. केवळ स्वागतच झाले आहे. ही बाब आम्ही कदापि विसरणार नाही. आम्ही भारताचे आभारी आहोत, असे नेतान्याहू यांनी संसदेत सांगितले. भारत-इस्रायलने कित्येक चमत्कार घडवले आहेत. या कालावधीत दोन्ही देशांधील व्यापार दुप्पट झाला आणि परस्पर सामंजस्य चारपट झाल्याचे नेतान्याहू म्हणाले.



### राज्यात गतवर्षी ४१ वाघांचा मृत्यू

**मुंबई, २५ फेब्रुवारी**

राज्यात सन २०२५ या वर्षात विविध कारणांुळे एकूण ४१ वाघांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये नैसर्गिक कारणांनी २८, अपघातात ८, विद्युत प्रवाहामुळे ४ आणि शिकारीमुळे १ वाघ दगावल्याची माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी आपल्या लेखी उत्तरात दिली आहे. याबाबतचा तारांकीत प्रश्न विधानसभा सदस्य मनोज जामसुतकर यांच्यासह अन्य काही सदस्यांनी उपस्थित केला होता. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या अहवालानुसार देशभरात २०२५ मध्ये १६६ वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी महाराष्ट्रातील मृत्यूंची संख्या लक्षणीय आहे. सदर प्रश्न चर्चेला आला नसला तरी, यावेळी मंत्र्यांनी दिलेल्या लेखी उत्तरात याबाबतचा खुलासा केला आहे. वर्ध्यातील प्रकरणाची चौकशी सुरू आहे.




# मुलांच्या 'डिजिटल व्यसना'ची सरकारकडून दखल

**मुंबई, २५ फेब्रुवारी**

राज्यातील मुलांध्ये वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनाच्या समस्येची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र शासनाने तज्ज्ञांची विशेष टास्क फोर्स नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील अधिवेशनाच्या आत या टास्क फोर्सचा सविस्तर अहवाल सादर केला जाईल, अशी माहिती ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधीद्वारे मुलांधील वाढते डिजिटल व्यसन आणि त्याचे दुष्परिणाम याकडे सरकारचे लक्ष वेधले. मंत्री शेलार यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना २ फेब्रुवारी २०२६ रोजी लेखी पत्राद्वारे तज्ज्ञांची टास्क फोर्स स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात १८ वर्षांखालील सुरे चार कोटी मुले असून त्यापैकी जवळपास तीन कोटी मुले १५ वर्षांखालील आहेत. त्यामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून शासन याबाबत कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या विषयावर सखोल चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



# रोहित पवारांचा पोलिसांसोबत वाद

### अजितदादांच्या अपघात प्रकरणी DGC, VSR वर गुन्हा दाखल करण्याच प्रकरण

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी -**

अजितदादांच्या विमान अपघातप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिसांनी आज रोहित पवारांचा 'एफआयआर' दाखल करून घेतला नाही. कोणाच्या तरी पाठिंब्यामुळेच पोलिस अधिकाऱ्यांची मग्रुरी सुरू आहे. अजितदादा प्रकरणी आमदारांचे असे होत असेल, तर इतरांची काय, असा सवालही रोहित पवार यांनी केला.

रोहित पवार, अमोट मिटकरी यांच्यासह अजित दादां आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यासाठी गेले होते. मात्र, हा एफआयआर पोलिसांनी दाखल करून घेतला नाही. रोहित पवार म्हणाले की, 'सुरुवातीला आमचा वादविवाद झाला. मात्र, त्यांनी लॅपटॉप आणला. माझं स्टेटमेंट टाइप करायला सुरुवात आली. मात्र, एक बडे पोलिस अधिकारी आले. त्यांनी त्यांनी एफआयआर करण्यापासून थांबवलं. त्यांनी आम्हाला का थांबवलं? या पोलिस अधिकाऱ्याला कोणाचा फोन आला?, असा प्रश्न असून आमचा संशय बळावत चालला आहे. आम्हाला राज्य सरकारनं आणलेल्या नव्या कायद्यानुसार एफआयर दाखल करण्याचा अधिकार आहे. रोहित पवार म्हणाले की, 'आता उद्या सकाळी दहा वाजता बारामतीमध्ये 'एफआयआर' दाखल करायचा प्रयत्न करणार आहोत. ती बिल्डिंग दादांनी बांधली आहे. तिथं नाही झालं, तर न्यायालयात जाऊ. ती बिल्डींगही दादांनी बांधलीय. रोहित पवार म्हणाले की, 'विखे-पाटील, आशिष शेलार, साताऱ्याचे मंत्री आणि त्यांचे ट्रोलर ट्रोल करतात. आज पोलिस एफआयआर दाखल करून घेत नाहीत. कुणाचा तरी पाठिंबा असल्याशिवाय पोलिस अधिकाऱ्यांना अशी मग्रुरी येत नाही. लाखो लोकांच्या आम दारांची अशी अवस्था असेल, तर इतरांचे काय? कोण अडथळे आणत आहेत, कोण नेते आहेत, बघणार,' असे रोहित पवार म्हणाले.

मात्र, मुंबई पोलिसांनी आपण रोहित पवारांनी दिलेली तक्रार स्वीकारली असून, त्यावर योग्य ती कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे आणि आमच्याकडे या प्रकरणात घातपात झाल्याचे स्पष्ट पुरावे असतानाही पोलिस अद्याप एफआयआर दाखल का करत नाहीत? असा संतप्त सवाल रोहित पवार यांनी केला आहे. या दुर्घटनेमागे केवळ तांत्रिक बिघाड नसून घातपाताचा संशय बळावणारे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. वारंवार मागणी करूनही आणि पुरावे देऊनही पोलिस गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ का करत आहेत, असा प्रश्न त्यांनी विचारला. एवढ्या मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत जर पोलिस इतकी दिरंगाई करत असतील, तर सामान्य जनतेला न्याय कसा मिळणार? व्हीएसआर' या विमान कंपनीला वाचवण्यासाठी पोलिस प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत आहे. तपासाची दिशा भरकटवून कंपनीला क्लीन चिट देण्याचा घाट घातला जात असल्याचा दावा त्यांनी केला. पोलिस नक्की कोणाच्या दबावाखाली आहेत आणि कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, हे जनतेला समजले पाहिजे, असेही ते म्हणाले.

### बारामती पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार रिंगणात

**पुणे, दि. २५ फेब्रुवारी -**

बारामती विधानसभा मतदारसंघात लवकरच पोटनिवडणूक होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे ही जागा रिक्त झाली. त्यानंतर निवडणूक आयोगाने या मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. १ जानेवारी २०२६ पर्यंत नाव नोंदविलेल्या मतदारांना पोटनिवडणुकीत मतदानाचा अधिकार असेल. १० मार्च रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार असून त्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, या पोटनिवडणुकीसाठी उमेदवाराबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत यावर एकमत झाल्याची माहिती आहे. पक्षाने ही निवडणूक शक्यतो बिनविरोध करण्याचा प्रयत्न करावा, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. प्रारूप मतदारयादी १० मार्चला जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना अधिक वेग येईल, असे चित्र आहे. बारामतीतील या घडामोडींप्रमाणेच राज्यसभेच्या निवडणुकीबाबतही राष्ट्रवादी काँग्रेसने निर्णय घेतला आहे. आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षाने घेतल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी रात्री मुंबईत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ही बैठक प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी पार पडली. बैठकीला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच कोअर कमिटीचे अन्य सदस्य उपस्थित होते. या बैठकीत २६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भातील राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीची तयारीही आढळून आली. येत्या काही दिवसांत वरळी डोम येथे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# भाजपा चिटणीसपदी माजी आमदार राम सातपुते

## नव्या पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका जाहीर; पश्चिम महाराष्ट्रातून चौघांना संधी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

भाजपकडून मंगळवारी राज्यातील नव्या पदाधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. यामध्ये मुख्य प्रवक्ता, सरचिटणीस, चिटणीस, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि भाजप युवा मोर्चा अध्यक्ष या पदांचा समावेश आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. यात माजी आमदार राम सातपुते यांची चिटणसीपदी वर्णी लागली आहे.

काही महिन्यांपूर्वी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्याकडे जबाबदारी दिली. त्यानंतर निवडणूक आचारसंहिता व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरु झाल्या. त्यामुळे प्रदेश कार्यकारिणी व पदाधिकारी नेमणूक या निवडणुकीनंतर करावी, असा निर्णय प्रमुख पदाधिकारी नेत्यांनी घेतला. मला अत्यानंद होतोय की आज राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन, अमित शाह, बी एल संतोष, शिव प्रकाश व सर्व नेत्यांनी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांसह मी पदाधिकारी नेमणुकीबाबत चर्चा केल्याचे रवींद्र चव्हाण यांनी म्हटले.

भाजपच्या घटनेप्रमाणे व महाराष्ट्र प्रदेश परिस्थिती लक्षात घेता कोणाला पदाधिकारी करावे व कुणाला करू नये यापेक्षा भाजप कार्यकर्ता व पदाधिकारी हा सक्षम आहे. प्रत्येकाने पक्षाच्या वाटचालीतील योगदान हे वर्षानुवर्षे आहे याची कल्पना आहे. परंतु प्रदेश पदाधिकारी करताना अत्यंत मर्यादित संधी देता येते. अशावेळी ज्याला संधी मिळते, त्यांचे अभिनंदन सर्वजण करतात, पण या घोषणा करताना ज्यांची नेमणूक होईल, त्यांच्या व्यतिरिक्त असे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते आहेत. त्यांना पदाधिकारी म्हणून संधी देता आली नाही, तरीही वेगवेगळ्या आयामांच्या माध्यमातून कामाची संधी देण्याचा विचार केला जाईल. आमच्याकडे असलेल्या मोर्चा व आघाडी यांची नावे घोषणा करणार होतो. पण प्रमुख मोर्चा व आघाडी यांची नावे आज घोषित केले जातील. मर्यादित पदाधिकारी यांची नावे आज प्रसिद्ध केली जात आहेत, असे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

### असे आहेत भाजपाचे नूतन पदाधिकारी

भाजपा मुख्य प्रवक्ता : नवनाथ बन. प्रदेश उपाध्यक्ष : केशव उपाध्ये, अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कोरगे, संजय भेंडे, रामदास कडस, गोपीचंद पडळकर, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील, अर्चना पाटील चाकूरकर. सरचिटणीस : निरंजन डावखरे, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनिल राणे, योगेश सागर. चिटणीस : मंगेश चव्हाण, संजय कुटे, परिणय फुके, वर्षा डहाळे, संजय जगताप, अर्चना डेहणकर, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रविण घुगे, रेखा कुलकर्णी, भैरवी घाक युवा मोर्चा अध्यक्ष : कृष्णराज महाडिक. महिला मोर्चा अध्यक्ष- चित्रा वाघ. ओबीसी मोर्चा अध्यक्ष-योगेश टिळेकर, कोषाध्यक्ष : मिहिर कोटेचा.

## महत्वाचे...



### विद्यापीठाचे डॉ. शिरीष बंडगर यांना आदर्श कर्मचारी पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

संघटनात्मक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथील वरिष्ठ लिपिक डॉ. शिरीष अनिता शामराव बंडगर यांना 'आदर्श कर्मचारी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सांगली येथे झालेल्या कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य, शाखा सांगली व संलग्न सर्व शाखांच्या वतीने आयोजित 'भारतीय संविधान सन्मान अमृत महोत्सवी गौरव वर्ष २०२५-२६' निमित्त द्वितीय पुणे विभागीय मेळाव्यात हा पुरस्कार कास्ट्राईब संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष गणेश मढावी यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. डॉ. बंडगर यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, कार्यतत्परता व शिस्तबद्ध प्रशासनिक कामकाज यांद्वारे उल्लेखनीय ठसा उमटविला आहे. विद्यापीठातील दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवणे, विद्यार्थ्यांशी व सहकाऱ्यांशी समन्वय राखणे तसेच संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घेणे या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



### स्वाभिमानी शेतकरी संघटना वकील आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी चाँदपाशा शेख

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील आदर्श नगर, शेळगी येथील ॲड. चाँदपाशा बासुमियाँ शेख यांची येथील बार कौन्सिल हॉलमध्ये शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांनी शेतकरी संघटनेच्या वकील आघाडीच्या सोलापूर जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख विजय रणदिवे, बार्शी तालुका अध्यक्ष शरद भालेकर, रामहरी पेजगुडे, युवा जिल्हाध्यक्ष मोसिन महमूद पटेल, ॲड. बापूसाहेब देशमुख, ॲड. रोहिदास पवार, ॲड. असीम बागी, ॲड.संजय गायकवाड, ॲड.बि.डी. मनसावले, ॲड. डी.एन. मैंदरकर, ॲड. असिफ शेख, ॲड.संजय काळे व शेतकरी उपस्थित होते. ॲड.शेख हे गोरगरिबांच्या केसेस अत्यल्प फीमध्ये लढवत असल्यामुळे त्यांची शेतकरी संघटनेच्या वकील आघाडीच्या जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती केली असल्याचे शंकर गायकवाड यांनी सांगितले.



### सृजनरंग स्पर्धेत 'दयानंद'चे यश

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

येथील द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने आयोजित केलेल्या सृजनरंग नियतकालिक स्पर्धेत यश संपादन केले. या स्पर्धेत एकूण ११ पुरस्कारांनी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानिक सचिव डॉ. महेश चोप्रा साहेब, प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे , आणि प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. सृजनरंग नियतकालिकासाठी डॉ. जी. डी. बिराजदार, डॉ. एन.एन. लोंढे, डॉ. आर. ए. रणवरे, प्रा. एस.एस. मोरे, डॉ. डी. आर. गायकवाड, डॉ. आर. व्ही. शिंदे, डॉ. आर. एच. कुलकर्णी, डॉ. एस. पी. देशमुख यांनी संपादनाची जबाबदारी पार पाडली.




### सुमन चंद्रशेखर यांना ग्रंथ साहित्य पुरस्कार

**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

शासकीय अधिकारी साहित्य पुरस्कार, यशदा संस्था पुणे यांचा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार साहित्यिका सौ. सुमन चंद्रशेखर बार्शी यांच्या ऋत प्रकाशनने प्रकाशित केलेल्या मायेची पाखर या कादंबरीला उल्लेखनीय साहित्य पुरस्कार दि. २२ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा संवर्धन समिती संवाद पुणे, यशदा पुणे आयोजित दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन २०२६ मध्ये बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे सुनील महाजन संवाद, पुणे सचिन ईटकर, शेखर गायकवाड, अतिरिक्त महासंचालक यशदा पुणे, महेश भागवत, अतिरिक्त पोलीस आयुक्त तेलंगणा तथा संमेलना अध्यक्ष डॉ. किरण धांडे प्रभारी प्रशासन आधिकारी प्रशासन विभाग यांचे हस्ते मिळाला. सुमन चंद्रशेखर यांचा नेहमी साहित्य चळवळीत सहभाग असतो . त्यांची आतापर्यंत आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याबद्दल मसाप. शाखा बार्शीचे अध्यक्ष निपाणीकर, कवी कालिदास मंडळचे अध्यक्ष रामचंद्र इकारे, साहित्यिक मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, प्रकाश गव्हाणे, डॉ. रविराज फुरडे, शिवानंद चंद्रशेखर, श्रीमती शारदा पानगांवकर, आबासाहेब घावटे, सर्व साहित्यिक, मान्यवर आणि सर्वच स्तरावरुन सुमन चंद्रशेखर यांचे अभिनंदन केले जात आहे.

## पुस्तकी ज्ञान न घेता नवीन गोष्टीही आत्मसात करा

### जयश्री माने; ब्रह्मदेवदादा माने तंत्रनिकेतनमध्ये गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



गुणवंत विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता नवीन गोष्टी शिकण्याची आवड बाळगून त्यांनी अभ्यासासोबतच खेळ आणि इतर पाठ्यतर उपक्रमांमध्येही उत्साहाने सहभाग घ्यावा व जिद्द, चिकाटी आणि कठीण परिश्रम करण्याची तयारी ठेवावी, असे प्रतिपादन संस्थेच्या सचिवा जयश्रीताई माने यांनी केले.

ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निक येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व पालक मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, संस्थेच्या सचिवा जयश्री माने व संकुलाचे संचालक प्रा. राहुल माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष आमदार दिलीपराव माने, सचिवा जयश्री माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, प्राचार्य डॉ. श्रीकांत जोशी, संकुल संचालक प्रा. राहुल माने, समन्वयक प्रा. शशिकांत फुलारी, प्रा.पवन माने यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जोशी यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षामधून एकूण १५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. नितीन जाधव, तर आभार प्रदर्शन प्रा. शशिकांत फुलारी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. राहुल ढगारे, प्रा. घुले, प्रा.कंदले, प्रा.सोमा, प्रा.खंडागळे, प्रा.तुपे, प्रा.गवळी, प्रा.सोमा, प्रा.पवार, प्रा.चौगुले, कबाडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### विज्ञान दिनानिमित्त शनिवारी विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शनिवार २८ फेब्रुवारीला ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर येथे सकाळी १० ते १२ या वेळेत विज्ञान प्रदर्शन भरणार आहे.

शिशुशाळेत वय वर्षे ५ ते ६ वयोगटातील विद्यार्थी पालक व शिक्षिकांच्या मदतीने विज्ञान प्रदर्शन मांडणी करणार आहे. मुलांमधील निरीक्षणाची नैसर्गिक शक्ती जागृत करण्यासाठी,जिज्ञासू वृत्ती वाढवण्यासाठी ह्या उपक्रमाची योजना केली होती. हवेचा दाब, हवेला जागा लागते, डांबर गोळीचा नाच, मेणबत्तीचा सी-सॉ, जादूचा डबा, मिठाच्या पाण्यात रंग मिसळत नाही इत्यादी सोप्या सोप्या प्रयोगांची मांडणी करून मुले प्रत्यक्ष माहिती सांगणार आहेत. इच्छुकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'ग्लोबल व्हिलेज'मध्ये २७ व २८ फेब्रुवारीला आरोग्य शिबीर

**सोलापूर दि २५ फेब्रुवारी-**

ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी यांच्या वतीने आणि अश्विनी रूरल मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल तसेच पोद्दार पॅथॉलॉजी लॅब यांच्या सहकार्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन दिनांक २७ व २८ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. हे शिबिर विद्यापीठाच्या पीएम-उषा (Pradhan Mantri Uchchatar Shiksha bhiyan) सॉफ्ट कंपोनंट उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात येत असून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीद्वारे त्यांच्यात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, हिमोग्लोबिन (ॲनिमिया) तपासणी, रक्तगट तपासणी, रक्तदाब मोजणी, बीएमआय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ॲनिमिया प्रतिबंध, पोषण आहार, स्वच्छता आणि वैयक्तिक आरोग्य याबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन सत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिराचे उदघाटन अश्विनी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी व विद्यापीठाचे आरोग्य संचालक डॉ. अभिजीत जगताप यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी व प्रा. सोमनाथ स्वामी यांनी आयोजन समितीच्या वतीने केले आहेत.

## राज्यातील विविध कंत्राटदार संघांची ९ मार्चला बैठक

### ७७ हजार कोटींच्या प्रलंबीत बिलावर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या कंत्राटदार यांच्या बाबतीत असलेल्या चुकीच्या प्रशासकीय धोरणावर निर्णय घेण्यासाठी व कंत्राटदार यांचे प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी सोमवार, ९ मार्च रोजी मुंबईत बैठक होणार आहे, असे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदारचे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे, अभियंता संघटना महासचिव राजेश देशमुख, कंत्राटदार महासंघ कार्याध्यक्ष संजय मैंद यांनी कळविले आहे. राज्यातील सर्व विभागाकडे कंत्राटदार यांची केलेल्या कामांची देयके अनेक महिन्यांपासून मिळणे तर दुरापास्त झाले आहेत. तसेच गेल्या दीड वर्षांपासून पाच ते सहा अधिवेशन झाले पण कागदोपत्री जे बजेट सादर केले जाते आणि प्रत्यक्षात असलेली गंभीर आर्थिक परीस्थिती यांची आकडेवारी पाहिली तर यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे.

राज्यात मार्च २०२५ मध्ये सर्व विभागाकडील ८९ हजार कोटींची रकमेची देयके प्रलंबित होती! आता मार्च २०२६ उजडले आहे प्रलबिंत देयकांची रकमेची बाकी अद्यापही ७७ हजार ५०० कोटी आहे याचा अर्थ शासनाने १४ महिन्यात फक्त ११००० कोटी रुपये दिले. फक्त १२ टक्के रक्कम वितरीत केली आहे, ही अक्षरश: कंत्राटदारांची आर्थिक गळचेपी व मानसिक स्वास्थ्य बिघडण्याची प्रक्रिया शासनाने केली आहे. मागची प्रचंड आर्थिक बाकी शिल्लक असल्याने जवळपास १४ महिन्यांपासून नवीन सर्व विभागाकडील लेखाशिर्षकासाठी कामांना मंजुरी नाही, निधी उपलब्ध केला नाही. यामुळे राज्यातील सगळ्या विभागाकडील विकास कामे, रोजगार, उलाढाल ठप्प आहे,जी कामे हातात आहेत ती कामे शासन पैसे देत नसल्याने बंद आहेत, अर्धवट स्थितीत जी कामे आहेत ती सदर कामे करण्यास कोणीही धजावत व तयार नाही, अशी सध्याची परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली आहे.

### शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयात पहिली बालरोग नेत्र शस्त्रक्रिया यशस्वी

**सोलापूर दि २५ फेब्रुवारी-**

शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य धर्मादाय नेत्र रुग्णालय आणि पुण्यातील २५ वर्ष जुन्या एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या युनिटने आज सोलापूर येथील शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर रेश्मा मेहता यांच्या हस्ते पहिली बालरोग नेत्र शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. सोलापूर येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये रुग्णालयाने आयोजित केलेल्या शालेय नेत्र तपासणी कार्यक्रमात समर्थ माऊली गुंड इयत्ता ६ वी -११ वर्षीय विद्यार्थ्यांचे निदान झाले. समर्थ जन्मापासूनच डोळ्यांच्या चुकीच्या सरेखनाने जगत होता. भीती, जागरूकतेचा अभाव आणि डोळ्यांच्या शस्त्रक्रियेबद्दलच्या गैरसमजुतींमुळे, त्याचे पालक उपचार घेण्यास टाळाटाळ करत होते. त्यांना संभाव्य धोके आणि खर्चाची काळजी होती आणि त्यांना असे वाटले की या स्थितीला तातडीने काळजीची आवश्यकता नाही. कालांतराने, समर्थला त्याच्या दिसण्यामुळे सामाजिक संवाद आणि आत्मविश्वासात अडचणी येऊ लागल्या. समर्थचे वडील, जे रोजंदारीवर काम करत होते, त्यांना शाळा व्यवस्थापन आणि शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी समुपदेशन केले. ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. समर्थच्या तिरकस शस्त्रक्रियेमुळे आता शालेय नेत्र आरोग्य कार्यक्रमांतर्गत ओळखल्या जाणाऱ्या ४०० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी संधीचे दरवाजे उघडले आहेत, ज्यांना जिल्ह्यातील शस्त्रक्रिया हस्तक्षेपाची आवश्यकता आहे ते या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल सर्व गरजू विद्यार्थ्यांना आणि जिल्हा परिषद आणि सोलापूर महानगरपालिकेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त धर्मादाय मदत करेल व शालेय नेत्र तपासणी कार्यक्रम त्यांच्या कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मा आणि शस्त्रक्रिया सहाय्य प्रदान करतो.

## माणूस आजारीच पडू न देणे हा आयुर्वेदाचा 'सर्वांगीण दृष्टिकोन' : डॉ. ओमप्रकाश शेटे

### जगभरातील लोकांची उपचारासाठी भारताकडे आशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**






जेंव्हा आयुर्वेद ही केवळ 'पर्यायी चिकित्सा' राहिलेली नाही, तर ती जगाची मुख्य गरज बनली आहे. आज पाश्चिमात्य देश 'रुग्णसेवेकडून' 'आरोग्यसेवेकडे' वळत आहेत. प्रत्येक आजारासाठी एक नवीन गोळी शोधण्यापेक्षा, माणूस आजारीच पडू न देणे हा आयुर्वेदाचा 'सर्वांगीण दृष्टिकोन' आज संपूर्ण जग स्वीकारत असल्याचे विचार आयुष्मान भारत मिशन, महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे आज (दि. २५) दैनिक तरूण भारतशी बोलताना व्यक्त केले. दरम्यान, यामुळेच जगभरातील लोक उपचारांसाठी भारताकडे आशेने पाहत आहेत. याचाच अर्थ, आपल्या तरुण वैद्यांसाठी आता केवळ देशातच नव्हे, तर जागतिक पातळीवर प्रगतीच्या आणि सेवेच्या अमर्याद संधी खुल्या झाल्या आहेत.

डॉ. शेटे पुढे म्हणाले की, मी आजच रत्नागिरी जिल्ह्यातील खेडच्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आयुर्वेद महाविद्यालयातील पदवीप्रदान समारंभात भविष्यातील तरुण वैद्यांशी संवाद साधताना हाच विचार मांडला होता. आयुर्वेदाचे महत्व मांडताना डॉ. शेटे पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आज आयुर्वेदाला जागतिक स्तरावर अभूतपूर्व प्रतिष्ठा मिळत आहे. परदेशी नागरिकांना भारतात येऊन आयुर्वेद आणि पारंपरिक भारतीय उपचार पद्धतींचा लाभ घेता यावा, यासाठी केंद्र सरकारने नव्याने सुरू केलेला 'आयुष व्हिसा' हा एक अत्यंत क्रांतिकारी आणि प्रगतीशील निर्णय ठरला आहे. यामुळे देशात 'मेडिकल व्हॅल्यू ट्रॅव्हल'ला प्रचंड मोठी चालना मिळत असून, जगभरातील लोक उपचारांसाठी भारताकडे आशेने पाहत आहेत. तक्षशिलेपासून सुरू झालेला भारताचा हा वैभवशाली वारसा आता आधुनिक विज्ञानाच्या आणि एकात्मिक उपचारांच्या माध्यमातून संपूर्ण जगावर राज्य करेल.

इतकेच नाहीतर जग आता केवळ आजारपणावरील उपचारांकडून निरोगी जीवन व्यवस्थापनाकडे वळत आहे आणि आपले तरुण आयुर्वेदिक वैद्य या जागतिक चळवळीचे निर्विवाद नेतृत्व करणार असल्याचा आत्मविश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

#### 'आयुष्मान' मधून शेवटच्या माणसांपर्यंत दर्जेदार सेवा देणार

'आयुष्मान भारत' योजनेच्या माध्यमातून डॉ. ओमप्रकाश शेटे हे राज्याच्या कानाकोपऱ्यातील गावागावात जावून पोहोचले आहेत. राज्यातील शेवटच्या माणसापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवण्याचे आपले ध्येय असल्याचे ते वारंवार सांगतात. सोलापूर शहर आणि जिल्ह्यासाठीही त्यांनी आयुष्मान भारत कार्डच्या माध्यमातून जनतेची सेवा केली आहे. जे अधिकारी, संबंधित रूग्णालये या योजनेकडे दुर्लक्ष करतात किंवा रूग्णांना योग्य मदत करीत नाहीत, त्यांच्यावरही कडक कारवाई डॉ. शेटे हे करीत असल्याने आता ही योजना राज्यभर चांगल्या पध्दतीने राबत असल्याचे दिसून येत आहे.



### रुपेश म्हंता यांची प्लंबिंग व्यवसायासंबंधी मार्गदर्शन कार्यशाळा

**सोलापूर दि २५ फेब्रुवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत प्लंबिंग व्यवसाय संबंधी कार्यशाळा घेण्यात आली. इयत्ता सहावी व सातवी विज्ञान व भूगोल विषयातील विविध व्यवसायाची ओळख या विषयांतर्गत आयोजित कार्यशाळेत रुपेश म्हंता यांनी प्लंबिंग व्यवसाय संबंधी माार्गर्शन केले. प्लंबिंग व्यवसायात लागणारे हातोडी, छिन्नी, करवत पट्टी सुलोचन, पाईप, मीटर पट्टी मीटर गेज, मार्किंग दोरी, टेनलिन टेप, ब्रास जोडणी, कोपरे एलबो, टाकी निप्पल, नळ विविध जोडण्या, ग्राइंडर मशीन, ड्रिल मशीन आदी साहित्य दाखवले. प्रत्येक साहित्याचे उपयोग सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच पीव्हीसी व सीपीव्हीसी पाईप कनेक्शन संबंधी संपूर्ण माहिती दिली. आपल्या कामाच्या अनुभवाची व्हिडिओ दाखवले. या कार्यशाळेत इयत्ता सहावी व सातवीच्या वर्गातील दोनशे विद्यार्थ्यांनी माहिती घेतली . कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्लंबिंग व्यवसाय संबंधित पूर्वज्ञान माहिती मिळाली. यावेळी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, बजरंग शिरसाट, विशाल खाडे, वैशाली गुजर, हणमंत कुरे आदी उपस्थित होते.

# गांधी कुटुंबीयांची राष्ट्रीय हिताशी तडजोड

## नितीन नवीन यांचा आरोप; तिबेटमधील भारताचे अधिकार चीनला दिले

**◆ पाटणा, २५ फेब्रुवारी**

काँग्रेस आणि गांधी कुटुंबीयांनी स्वतःच्या स्वार्थाला प्राधान्य देत राष्ट्रीय हिताशी तडजोड केली. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तिबेटमधील भारताचे अधिकार चीनकडे सोपवत देशाला संकटात टाकले, अशा शब्दांत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी बुधवारी गांधी-नेहरू कुटुंबांवर तीव्र हल्ला चढवला.



एका सभेला संबोधित करताना नवीन यांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू, राजीव गांधी, काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्यावर निशाणा साधला. काँग्रेसचे 'तडजोड मिशन' स्वहितासाठी होते. त्यांनी राष्ट्रीय हिताचा कधीही विचार केला नाही. नेहरू यांनी १९५४ मध्ये कोणत्याही नुकसान भरपाईशिवाय तिबेटमधील भारताचे अधिकार चीनला दिले. त्यांच्या निर्णयांमुळे राष्ट्रीय हिताला हानी पोहोचली.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी संरक्षण करारांचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी केला. विदेशातून त्यांच्या खासगी बँक खात्यात मोठ्या प्रमाणात पैसा जमा केला जात होता. (वृत्तसंस्था)

### राहुल बनले परदेशी शक्तीचे बाहुले

राहुल गांधी परदेशी शक्तीचे बाहुले बनले आहेत. निवडणुकीसाठी काँग्रेसला सीआयएकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळतो. गांधी यांनी दहा वर्षांत २४७ हून अधिक परदेश दौरे केले, त्यापैकी बरेच सुरक्षा एजन्सींना माहिती नव्हते. त्यांनी इल्हान ओमर आणि जॉर्ज सोरोस यासारख्या परदेशी गुंतवणूकदारांसोबत गुप्त बैठका घेतल्या आणि देशाच्या बदनामीचा कट रचला.

### सोनियांनी दहा वर्षे चालविले समांतर सरकार

२००४ ते २०१४ दरम्यान सोनिया गांधींनी 'सुपर प्राईम मिनिस्टर' म्हणून काम केले आणि राष्ट्रीय सल्लागार परिषदेद्वारे (एनएसी) समांतर सरकार चालवले. या काळात राजीव गांधी फाउंडेशनला चीन सरकार आणि जॉर्ज सोरोसच्या नेटवर्ककडून मोठ्या प्रमाणात निधी मिळाला आणि केंद्र सरकारने तपास यंत्रणेमार्फत याची चौकशी करायला हवी.

### तरुणाईची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

देशातील तरुणाईची दिशाभूल करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून सुरू आहे. हा प्रकार देशहितासाठी गंभीर आहे. जनतेला आता तथाकथित 'तडजोड मोहीम' समजली आहे आणि भविष्यात ते केवळ राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व स्वीकारतील. देशातील जनता राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवर जागरूक आहे.

# माजी व्यवस्थापकासह तिघांना अटक

## आयडीएफसी फर्स्ट बँक घोटाळा प्रकरण

**◆ चंदीगड, २५ फेब्रुवारी**

हरियाणाच्या राज्य दक्षता आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ५९० कोटी रुपयांच्या आयडीएफसी फर्स्ट बँकेतील घोटाळाप्रकरणी सूत्रधारांसह चार जणांना अटक केली आहे. यात दोघे आयडीएफसी फर्स्ट बँकेचे माजी कर्मचारी तर दोघे खासगी व्यक्ती आहेत. त्यांना मंगळवारी सायंकाळी अटक करण्यात आली. रिभव ऋषी, अभय कुमार, स्वाती सिंगला आणि अभिषेक सिंगला अशी, अशी आरोपींची नावे आहेत.

एसीबीचे महासंचालक ए.एस. चावला यांनी सांगितले की, ऋषी आणि अभय हे आयडीएफसी फर्स्ट बँकेचे माजी कर्मचारी तर स्वाती आणि अभिषेक हे भावंडे आहेत. ते स्वस्तिक देश प्रोजेक्ट नावाची फर्म चालवत होते. ऋषी हे नोकरी सोडण्यापूर्वी बँकेच्या सेक्टर ३२ शाखेचे प्रमुख होते.बँकेचे रिलेशनशिप मॅनेजर अभय यांनी गतवर्षी ऑगस्टमध्ये नोकरी सोडली. ऋषी आणि अभय हे दोघेच या घोटाळ्याचे सूत्रधार आहेत, असा दावाही त्यांनी केला.

**स्वस्तिकच्या खात्यात ३०० कोटी हस्तांतरित**

स्वस्तिक देश प्रकल्पाच्या बँक खात्यात ३०० कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आले. स्वाती सिंगला कंपनीची मालकीण आहे. कंपनीत त्यांचे ७५ टक्के शेअर्स तर तिचा भाऊ अभिषेक सिंगलाकडे उर्वरित २५ टक्के शेअर्स आहेत. स्वाती अभयची पत्नी आहे. (वृत्तसंस्था)

# खामेनेईंच्या निवासस्थानावर मुजाहिद्दीनचा सशस्त्र हल्ला

**◆ तेहरान, २५ फेब्रुवारी**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या बेत-ए रहबरीवर मुजाहिद्दीन-ए-खल्क या संघटनेने सशस्त्र हल्ला केला. सैनिक आणि हल्लेखोरांमध्ये संघर्ष झाला, यात अनेक सुरक्षा कर्मचारी ठार झाल्याची माहिती समोर आली. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या घरावर अशा प्रकारचा पहिलाच सुनियोजित हल्ला आहे.

मुजाहिद्दीन या संघटनेने हल्ल्याची पुष्टी करत समाज माध्यमावर जारी केलेल्या चित्रफीतीत म्हटले की, खामेनेईंच्या कार्यालयावर आणि घरावर सोमवारी २५० सदस्यांनी आधुनिक शस्त्रास्त्रांसह हल्ला केला. सशस्त्र संघर्षात इराणचे लष्करी कमांडर ठार झाले, तर १०० पेक्षा अधिक बंडखोरांचा खात्मा करण्यात सैनिकांना यश आहे.

दुसरीकडे इराणच्या लष्कराने म्हटले की, मुजाहिद्दीनचा हल्ला अपयशी ठरला असून, त्याचे १०० वर सदस्य मारले गेले. हल्ला झाला त्यावेळी खामेनेई निवासस्थानी नव्हते. दरम्यान देशात वाढता तणाव पाहता खामेनेई यांनी आपले निवासस्थान सोडून एका सुरक्षित अंडरग्राउंड बंकरमध्ये आश्रय घेतला आहे. सध्या त्यांच्या कार्यालयाची आणि घराची सर्व जबाबदारी त्यांचा मुलगा मोजतबा खामेनीई सांभाळत आहे. (वृत्तसंस्था)

### कोण आहे मुजाहिद्दीन-ए-खल्क संघटना?

मुजाहिद्दीन किंवा एमईके ही संघटना १९६५ मध्ये शाह पहेलवी यांच्या राजवटीविरुद्ध लढण्यासाठी स्थापन झाली होती. १९७९ च्या क्रांतीत या संघटनेने महत्त्वाची भूमिका बजावली, पण नंतर खामेनेई यांच्याशी मतभेद झाल्यामुळे त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. ही संघटना इराणला एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनवू इच्छिते. विशेष म्हणजे, २००२ मध्ये इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाची गुप्त माहिती याच संघटनेने जगासमोर आणली होती.

## श्रीलंकेचे माजी गुप्तचर सेवा प्रमुख अटकेत

**◆ कोलंबो, २५ फेब्रुवारी**

श्रीलंकेचे माजी राज्य गुप्तचर सेवा प्रमुख सुरेश सैली यांना केंद्रीय गुप्तचर संस्था (सीआयडी) च्या पथकाने बुधवारी अटक केली आहे. त्यांच्यावर २०१९ च्या ईस्टर बॉम्बस्फोटात सहभाग असल्याचा आरोप आहे.कोलंबो उपनगरातील पेलियागोडा येथे त्यांना अटक करण्यात आली. २०१९ च्या ईस्टर संडे बॉम्बस्फोटांच्या संदर्भात ही कारवाई करण्यात आली. या घटनेत कोलंबोमधील चर्च आणि पंचतारांकित हॉटेल्समध्ये ११ भारतीयांसह २७० लोकांचा मृत्यू झाला होता. सैली २०१९ मध्ये परदेशात राजदूत म्हणून काम करत होते. संरक्षण संस्थांना हल्ल्यांबद्दल पूर्व माहिती होती. मात्र त्यांनी वेळेवर कारवाई केली नाही आणि त्यामुळे हल्लेखोर बॉम्बस्फोट घडविण्यात यशस्वी झाले. भारताने बॉम्बस्फोटासंदर्भात श्रीलंकेच्या संरक्षण विभागाला गुप्त माहिती दिली होती. (वृत्तसंस्था)




उत्तर प्रदेशात परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढावा आणि कंपन्यांनी उद्योग स्थापन करावेत, या उद्देशाने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जपानच्या दौऱ्यावर आहेत. कोनोईके वाहतूक कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापकीय कार्यकारी अधिकारी शिगेकी यांच्याशी त्यांनी चर्चा केली

## चित्रपट वार्ता

### बिग बींनी सुरू केले 'कल्कि २'चे चित्रीकरण



**मुंबई** : अमिताभ बच्चन यांनी आगामी चित्रपट 'कल्कि २' च्या सेटवरून 'बिहाइंड द सीन' फोटो शेअर करत ते हैदराबादमध्ये चित्रीकरण करत असल्याचे सांगितले. त्यांनी सुमारे ४० वर्षांनंतर कमल हासन यांच्यासोबत पुन्हा काम करण्याबद्दल उत्साह व्यक्त केला. त्या दोघांनी १९८५ मध्ये 'गिरफ्तार' चित्रपटात एकत्र काम केले होते. विशेष म्हणजे, 'कल्कि २८९८' या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि कमल हासन या दोघांनीही काम केले असले तरी एकाही दृश्यात ते एकत्र नव्हते. अमिताभ बच्चन यांनी शेअर केलेल्या फोटोंमध्ये ते अश्वत्थामा या भूमिकेच्या लूकमध्ये दिसत आहेत.

### आई झाल्यानंतर पहिल्यांदाच दिसली कॅटरीना



**मुंबई** : आई झाल्यानंतर साधारण साडेतीन महिन्यांनी पहिल्यांदाच कॅटरीना सार्वजनिक ठिकाणी दिसली. तिचा हा व्हिडीओ समाज मध्यमावर व्हायरल झाला आहे. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी तिने मुलगा विहानला जन्म दिल्यानंतर ती प्रसिद्धीपासून दूर होती. यावेळी कटरीनाने चेहऱ्यावर मास्क घातला होता, तरीही तिचा ग्लो स्पष्ट दिसत होता. कॅमेरे पाहताच तिने हात हलवत गोड स्मितहास्य केले आणि याने चाहत्यांची मने जिंकली. ती कारमध्ये बसलेली होती आणि तिच्यासोबत सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर यास्मिन कराचीवाला देखील होती. यास्मिन कटरीनाची फिटनेस ट्रेनर आहे.

### लॉस एंजेलिसमध्ये 'रामायण'चे विशेष प्रदर्शन

**वॉशिंग्टन** : नितेश तिवारी दिग्दर्शित, रणबीर कपूर अभिनीत 'रामायण' हा चित्रपट या वर्षातील सर्वात अपेक्षित चित्रपटांपैकी एक मानला जातो. यावर्षी दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचे पहिले स्पेशल स्क्रिनिंग अमेरिकेतील लॉस एंजेलिसमधील सिनेमार्क प्लेया व्हिस्टा चित्रपटगृहामध्ये आयोजित करण्यात आले होते. चित्रपटाचे हे विशेष प्रदर्शन १८ ते ६० वयोगटातील निवडक प्रेक्षकांसाठी होते. नितीश तिवारी दिग्दर्शित आणि नमित मल्होत्रा निर्मित, 'रामायण' हा चित्रपट दोन भागात प्रदर्शित होणार आहे. पहिला भाग या दिवाळीत प्रदर्शित होईल. हा चित्रपट बॉलिवूडच्या इतिहासातील सर्वात महागड्या चित्रपटांपैकी एक असल्याचे मानले जातो. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान रामाची भूमिका साकारणार आहे, तर साई पल्लवी सीतेची भूमिका साकारणार आहे आणि यश रावणाच्या भूमिकेत आहे.




# उपसंचालकाच्या घरात सापडले ४ कोटी रोख

## एसीबीची कारवाई; कपाटात, बॅगेत आढळली नोटांची बंडले

**◆ भुवनेश्वर, २५ फेब्रुवारी**

ओडिशाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अर्थात् एसीबीने कटक मंडळाचे खाण उपसंचालक देबब्रत मोहंती याला ३० हजार रुपयांची लाच घेताना पकडल्यानंतर, त्याच्या घरात टाकलेल्या छाप्यात ४ कोटी रुपयांहून अधिकची रोख रक्कम जप्त केली. कपाटात, बॅगेत नोटांचे मोठ्या प्रमाणात नोटांची बंडल आढळल्यानंतर रक्कम मोजण्यासाठी मशिन मागवण्यात आली.





मोहंती यांनी एका परवानाधारक कोळसा विक्रेत्याला कोळसा डेपो व्यवस्थित चालवण्यासाठी आणि कोळशाच्या वाहतुकीला परवानगी देण्याच्या बदल्यात तीस हजारांची लाच मागितली होती. कंत्राटदाराने यासंदर्भात एसीबीकडे तक्रार केली. तक्रारीची पृष्टी झाल्यानंतर मंगळवारी रात्री सापळा रचून मोहंती यांना लाच घेताना रंगेहात पकडले. एसीबीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पथकाने कटक येथील मोहंती यांचे शासकीय कार्यालय, भद्रक येथील त्यांचे वडिलोपार्जित घर, भुवनेश्वर येथील त्यांच्या आलिशान फ्लॅटवर एकाचवेळी छापे टाकले. यावेळी फ्लॅटमधील कपाटे आणि ट्रॉली बॅग्जमध्ये नोटांची बंडले ठासून भरलेली होती. मोजणीत ४ कोटी रुपयांहून अधिक रोकड हस्तगत करण्यात आली आहे. पैशांचा आकडा इतका मोठा आहे की, त्याचे अचूक मूल्य निश्चित करण्यासाठी यंत्रांच्या सहाय्याने अजूनही मोजणी प्रक्रिया सुरू आहे. ३० हजार रुपयांच्या लाचेच्या प्रकरणातून सुरू झालेला हा तपास आता कोट्यवधींच्या बेहिशोबी मालमत्तेपर्यंत पोहोचला आहे. या कारवाईत रोख रकमेशिवाय स्थावर मालमत्ता आणि १३० ग्रॅम सोन्याचाही समावेश आहे. (वृत्तसंस्था)

## धनबाद सिव्हिल कोर्टात बॉम्ब ठेवल्याची धमकी

**◆ धनबाद, २५ फेब्रुवारी**

धनबाद सिव्हिल कोर्टाच्या परिसरात बुधवारी सकाळी बॉम्ब ठेवण्यात आल्याची धमकी मिळाली. अज्ञात व्यक्तीने ईमेलद्वारे धमकी पाठवल्यानंतर संपूर्ण कोर्ट परिसर ताबडतोब रिकामा करण्यात आला. न्यायाधीश, कर्मचारी, पक्षकार आणि उपस्थितांना इतरत्र हलवून चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पोलिसांच्या सखोल तपासणीत सिव्हिल कोर्ट परिसरात कोणतेही स्फोटक किंवा संशयास्पद साहित्य सापडले नाही. सूत्रांनुसार, कोर्ट प्रशासनाला एक धमकीचा ईमेल मिळाला. ज्यात दावा करण्यात आला होता की, आवारात बॉम्ब ठेवण्यात आले आहेत आणि त्याचा केव्हाही स्फोट होऊ शकतो. यामुळे न्यायालयाचे कामकाज सुमारे तीन तास थांबवण्यात आले होते. न्यायालय परिसराची कसून तपासणी केली असता तेथे कोणतेही स्फोटक साहित्य किंवा संशयास्पद साहित्य आढळले नाही. त्यानंतर दुपारी २:३० वाजता न्यायालयाचे कामकाज पुन्हा सुरू करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# लग्न मंडपातच वधूची हत्या

## प्रियकरानेच मारली गोळी

**◆ बक्सर, २५ फेब्रुवारी**

एकतर्फी प्रेमातून प्रियकराने वधूला लग्न मंडपातच गोळी घालून ठार मारले. त्याने वरमाला घालण्यासाठी स्टेजवर उभ्या असलेल्या वधूच्या पोटात गोळी झाडली. गोळीबारानंतर मंडपात एकच गोंधळ उडाला. जखमी वधूला ताबडतोब रूग्णालयात नेण्यात आले. परंतु तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना मुफस्सिल पोलिस ठाण्याच्या हद्दीत मल्लाह टोला येथे मंगळवारी रात्री घडली. आरती नंदजी मल्लाह, असे मृत मुलीचे तर दीनबंधू, असे आरोपीचे नाव आहे. दोघेही एकमेकांचे शेजारी होते.

डीएसपी गौरव पांडे यांनी सांगितले की, नंदजी मल्लाह यांच्या मुलीचे लग्न उत्तर प्रदेशातील बलिया येथील मुलाशी होत होते. मंगळवारी रात्री बलिया जिल्ह्यातील सुलेमनपूर गावातून वरात बक्सरच्या चौसा येथे आली होती. रात्री जयमालेचा विधी सुरू होता. नवरदेव-नवरी स्टेजवर उपस्थित होते. यादरम्यान एक व्यक्ती बुरखा घालून स्टेजपर्यंत पोहोचला. त्याने वधू आरतीला गोळी मारली. मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे गोळीचा आवाज दबला. पण आरती अचानक स्टेजवर कोसळली. स्टेजवर उभ्या असलेल्या मुली मोठ्याने ओरडून सांगितले की, आरतीला कुणीतरी गोळी मारली. नातेवाईकांनी स्टेजकडे धाव घेतली असता त्यांना आरतीच्या पोटातून रक्त वाहताना दिसले. तातडीने वधूला वाराणसी येथील रुग्णालयात नेले. रस्त्यात आरती पोटात गोळी लागल्याचे आणि दीनबंधूने गोळी मारल्याचे सांगत होती. उपचारादरम्यान आरतीचा मृत्यू झाला. स्थानिक लोकांच्या मते, हे प्रकरण प्रेमप्रकरणाशी संबंधित आहे. दोघांची घरे शेजारी-शेजारी आहेत.मुलीच्या घरच्यांचे म्हणणे आहे की, दीनबंधू आरतीवर एकतर्फी प्रेम करत होता. आमच्या मुलीवर त्याचे प्रेम होते, पण माझ्या मुलीचे त्याच्यावर नव्हते. (वृत्तसंस्था)

## पोलिसांच्या हत्येचा मास्टरमाईंड गुरुदासपूरमधील चकमकीत ठार

**◆ गुरुदासपूर, २५ फेब्रुवारी**

पंजाबच्या सीमावर्ती जिल्ह्यातील गुरुदासपूरमधील अदियान गावात पोलिस चौकीवर तैनात एक पोलिस अधिकारी व एका कर्मचाऱ्याची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. ही घटना दुसऱ्या दिवशी सकाळी उघडकीस आली. या हत्याकांडाचा मास्टरमाइंड अदियान निवासी रणजीत सिंग बुधवारी सकाळी ६ वाजता पोलिस चकमकीत मारला गेला.

चौकशीदरम्यान पोलिसांना अनेक महत्त्वाची माहिती मिळाली आहे. मास्टरमाइंड आणि गोळीबार करणाऱ्यांना पाकिस्तानी गुप्तचर संस्थांनी पैशाचे आमिष दाखवले होते, अशी माहिती डीआयजी बॉर्डर रेंज संदीप गोयल यांनी दिली.

गोयल यांनी सांगितले की, आरोपींनी आयएसआयच्या इशाऱ्यावर, पैशाच्या आमिषाने हा गुन्हा केला. आरोपी दिलावर सिंगला गोळीबार करणाऱ्यांना मदत करण्यासाठी २०,००० रुपये देण्यात येणार होते. त्यापैकी त्याला ३,००० रुपये मिळाले होते. तर रणजीत सिंग आणि इंद्रजीत सिंग यांना प्रत्येकी २ ते ३ लाख रुपये देण्यात येणार होते. (वृत्तसंस्था)

# सर्वात जुन्या 'खादाड' कृष्णविवराचा शोध



### क्ष-किरण, रिडीओ लहरींचे करतोय् उत्सर्जन

### 'सॅजिटेरियस ए' कृष्णविवरापेक्षा १०० पट मोठा

### 'वैश्विक खादाडपणाच्या' अभ्यासासाठी लहरींचा वापर

'द ॲस्ट्रोफिजिकल जर्नल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधानुसार, संशोधकांनी या 'वैश्विक खादाडपणाचा' अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या लहरींचा वापर केला. एखादे कृष्णविवर रेडिएशनचा दाब निर्माण होण्यापूर्वी काही काळासाठी मर्यादेपेक्षा जास्त वेगाने पदार्थ गिळंकृत करू शकतो, असे मत टेक्सास विद्यापीठातील खगोलशास्त्रज्ञ अँथनी टेलर यांनी व्यक्त केले आहे.

**◆ वॉशिंग्टन, २५ फेब्रुवारी**

खगोलशास्त्रज्ञांना सर्वात जुने कृष्णविवर सापडले आहे. या कृष्णविवराने प्रस्थापित नियमांना छेद दिला आहे. 'आयडी८३०' नावाचा हा क्वेसार मर्यादित वेगाने वाढतो आहे. तसेच एकाच वेळी मोठ्या प्रमाणात क्ष-किरण आणि रेडीओ लहरींचे उत्सर्जन करतो आहे.

विज्ञानानुसार या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडणे हे दुर्मीळ असल्याचे मानले जाते. 'आयडी८३०' हा अत्यंत तेजस्वी आणि सक्रिय असलेला 'सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल' आहे. या कृष्णविवराच्या ध्रुवांतून रेडिएशनचे झोत मोठ्या प्रमाणात बाहेर येत आहेत तसेच याच्या मुखाभोवती प्रकाशाच्या वेगाने फिरणाऱ्या पदार्थांमुळे यामधून तीव्र क्ष-किरण उत्सर्जित होत आहेत. सुमारे १२ अब्ज वर्षांपूर्वी ज्यावेळी विश्वाचे वय आजच्या तुलनेत केवळ १५ टक्के होते, तेव्हा या कृष्णविवराचे वस्तुमान सूर्याच्या तुलनेत ४४ कोटी पट जास्त होते. थोडक्यात आकाशगंगेच्या केंद्रस्थानी असलेल्या 'सॅजिटेरियस ए' या कृष्णविवरापेक्षा तो १०० पटीने मोठा आहे.

कृष्णविवरांच्या खाण्यापिण्यावरही निसर्गाचे काही निर्बंध असतात. याला 'एडिंग्टन लिमिट' म्हणतात. कृष्णविवर वायू आणि धूळ स्वतःकडे ओढतो, तेव्हा यातून बाहेर पडणाऱ्या रेडिएशनचा दाब अधिक पदार्थ आत येण्यापासून रोखतो. मात्र, 'आयडी८३०'ने या मर्यादेचे उल्लंघन करतो आहे. याचा आकार अत्यंत वेगाने वाढला आहे. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# एकेकाळच्या ‘मुक्तिदात्यां’चा शक्तिपात

१९९१मध्ये नक्षलवाद्यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मंत्री आणि अहेरीचे राजे धर्मरावबाबा आत्राम यांचे अपहरण केले होते. या योजनेचा मुख्य सूत्रधार तिप्पिरी तिरुपती उर्फ देवजी हा होता. बाबा आत्रामांना ओलिस ठेवून त्याने आपल्या काही सहकाऱ्यांची सुटका करून घेतली. या घटनेमुळे नक्षल चळवळीत देवजीचा नावलौकिक झाला. आठ महिन्यांपूर्वी बसव राजू मारला गेल्यानंतर देवजीकडे या चळवळीच्या प्रमुख पदाची सूत्रे आली होती. पण परवा अचानक त्याने तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करल्याचे समोर आले. तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या या सर्वोच्च नेत्याचे समर्पण नक्षल चळवळीसाठी मोठाच धक्का आहे. किंबहुना, ही चळवळच आता पूर्णपणे नेतृत्वहीन झाली आहे. देवजीची शरणागती हा कदाचित त्यातील शेवटचा टप्पा असेल.

देवजीचा जन्म तेलंगणा राज्यातील निर्मल जिल्ह्यातल्या लक्ष्मणचांदा येथील गरीब शेतकरी कुटुंबातला. शालेय शिक्षण स्थानिक पातळीवर पूर्ण करून तो औद्योगिक प्रशिक्षणासाठी कोठागुडम येथे आला. याच काळात तो डाव्या विचारसरणीच्या संपर्कात आला. विद्यार्थी असतानाच तो १९८० च्या दशकात राजकारणात सक्रिय झाला होता. ‘रॅडिकल स्टुडंट्स युनियन’मध्ये असताना त्याचे वैचारिक परिवर्तन झाले आणि नंतर तो ‘पीपल्स वॉर ग्रुप’मध्ये (आताची भाकप माओवादी) सामील झाला. अवघ्या काही वर्षांत त्याने गनिमी काव्यात प्रावीण्य मिळविले. देवजी नक्षलवाद्यांच्या लष्करी विभागाचा मुख्य रणनीतिकार मानला जात होता. चळवळीचे सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या ‘सेंट्रल कमिटी’चाही तो सदस्य होता. महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील नक्षल हालचालींचे त्याने दीर्घकाळ नेतृत्व केले. छत्तीसगडमधील बस्तर आणि सुकमा भागात अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन त्याचेच होते. नवीन शस्त्रे आणि स्फोटकांच्या वापराबाबत तो तज्ज्ञ मानला जायचा. २१ मे २०२५ रोजी छत्तीसगडच्या बस्तर भागात माओवाद्यांचा तत्कालीन सर्वोच्च नेता बसव राजू याच्यासह २७ माओवाद्यांचा खात्मा केला गेला. परिणाम म्हणून ६ जूनला १२ माओवाद्यांनी गडचिरोली येथे आत्मसमर्पण केले. लगेच १८ जूनला आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातल्या चकमकीत माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य गजरला रवी ठार झाला. धास्तावलेला केंद्रीय समिती सदस्य भूपतीने ३ ऑक्टोबरला सशस्त्र लढा थांबविण्याची भूमिका जाहीर केली. पुढे त्याने १५ ऑक्टोबरला ६१ माओवाद्यांसह आत्मसमर्पण केले. १८ नोव्हेंबर २०२५ ला अत्यंत जहाल माओवादी माडवी हिडमा यास केंद्रीय सुरक्षा रक्षकांनी यमसदनी धाडले. त्या चकमकीत हिडमाची पत्नी राजक्का हिच्यासह अन्य सहा नक्षलवादीही ठार झालेत. नजीकच्या काळातील या दमदार कारवाया नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडण्यास पुरेशा होत्या. आता देवजीची शरणागती माओवादी चळवळीला लागलेली घरघर थांबली असल्याचेच संकेत देणारी आहे.

सुरक्षा रक्षकांकडे देवजीचे जुने ठेवणीतलेच छायाचित्र असल्याने देवजी अजूनही दिसायला तरुण वाटायचा. खरे तर तो थकलेला होता. त्याचे ढासळते आरोग्य आणि चळवळीतील सुरक्षा रक्षकांची पसरलेली दहशत हे त्याच्या शरणागतीचे कारण मानले जात आहे. दीर्घकाळ जंगलात राहिल्यामुळे त्याला सांधेदुखी आणि इतर शारीरिक व्याधींनी ग्रासले होते. शिवाय नक्षल चळवळीतील नेत्यांमधील अंतर्गत मतभेदही नजीकच्या काळात उफाळून आले आहेत. देवजीच्या शरणागतीने नक्षल चळवळ पुन्हा एकदा नेतृत्वहीन झाली असून केंद्र आणि राज्य सरकारच्या नक्षलविरोधी मोहिमेचे हे मोठे यश मानले जात आहे तर दुसरीकडे माओवाद्यांच्या या शक्तिपातामुळे नव्याने उभारी घेण्याची शक्यताही मावळली आहे. एक काळ असा होता की, या चळवळीने अंतर्गत सुरक्षेसमोर सर्वात मोठे आव्हान उभे केले होते. या नक्षलवादाची मुळे पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी या लहानशा गावात रुजली. चारू मुजुमदार, कानु सन्याल आणि जंगल संताल यांच्या नेतृत्वाखाली शेतमजुरांनी जमीनदारांविरुद्ध पुकारलेला तो सशस्त्र उठाव होता. पाहता-पाहता ‘कसणाऱ्याची जमीन’ या घोषणेची ठिणगी १० पेक्षा जास्त राज्यांत पसरली. छत्तीसगड राज्यातील बस्तर, दंतेवाडा येथील भौगोलिक दुर्गमता आणि घनदाट जंगलांमुळे ते नक्षलवाद्यांचे मुख्य केंद्र बनले. खनिज संपत्तीने समृद्ध असूनही झारखंड आणि बिहारमधील गरिबीमुळे माओवादी विचारांना खतपाणी मिळाले. आंध्र प्रदेशाला लागून असलेल्या महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदियासारख्या सीमावर्ती भागांत नक्षलवाद्यांनी आपले जाळे विणले. ओडिशा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणात ही चळवळ अतिशय तीव्र होती. आदिवासींच्या संसाधनांवर बाहेरील लोकांचे आक्रमण, दुर्गम भागात रस्ते, दवाखाने आणि शाळांची अनुपस्थिती, सावकार आणि जमीनदारांकडून होणारी पिळवणूक ही पृष्ठभूमी माओवादी विचारांना मोठे करीत राहिली. सुरुवातीला आदिवासींनी नक्षलवाद्यांना मुक्तिदाता मानले. कारण त्यांनी तेंदूपत्ता संकलनाचे दर वाढवून दिले. पण या फुटकळ प्रयत्नांनी असमानता व विषमता दूर होईल, हा भ्रम लवकरच दूर झाला. कारण विकासाच्या पर्यायी संकल्पना हे नक्षलवादी रुजवू शकले नाहीत. उलट त्यांनी रस्त्यांना, टेलिफोनचे जाळे विणण्यास, पूल बांधकामास विरोध केला. ज्यांच्या भरवशावर ते जंगलात राहत होते त्याच आदिवासींना पोलिसांचे खबरी म्हणून ठार मारण्यास सुरुवात केली. शाळा जाळणे आणि कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणावर खंडणी उकळल्यामुळे स्थानिकांनाही नक्षल्यांची भीती वाटू लागली. नाही म्हणायला, आदिवासींचे उत्पन्न वाढविण्याचे थोडेफार काम त्यांनी केले, पण त्याचाही वाटा मागण्याचा वाहियातपणा या माओवाद्यांनी दाखवला.

दुसरीकडे, सुरुवातीला पोलिसांनी नक्षलवाद्यांना संपवण्यासाठी बळाचा वापर केला होता. त्यात स्थानिक आदिवासींचेही नुकसान झाले. नक्षलवादी व पोलिस यांच्यात ‘इकडे आड तिकडे विहीर’ अशी काहीशी स्थिती या वनवासींची झाली होती. त्यामुळे मधला काळ ही चळवळ संपण्यासाठी कठीण गेला. पण नंतरच्या काळात पोलिसांनी आपली रणनीती बदलली. आदिवासींना विश्वासात घेतले. प्रदीर्घ काळ या प्रभाव क्षेत्रावर ताबा असूनही आदिवासींमध्ये त्यांना आपला विचार पूर्णपणे रुजवता आला नव्हता. त्यामुळे या चळवळीला स्थानिक पातळीवर वैचारिक अधिष्ठान नव्हतेच. त्याचा लाभ घेत सरकार व पोलिसांनी विविध विकासात्मक योजना राबविल्या. सशस्त्र क्रांती करून आम्ही शोषणविरहित व्यवस्था उभी करू, या नक्षलवाद्यांच्या आश्वासनांवर आदिवासी जनता आणखी किती काळ विश्वास ठेवू शकली असती. तसेही सशस्त्र क्रांती कुठेही कायमस्वरूपी यशस्वी होऊ शकली नाही, हा इतिहास आहे. त्यामुळे २०१२ नंतरच्या काळात नक्षल चळवळीला उतरती कळा लागली. त्याचा सुयोग्य लाभ सरकारने घेतला. नक्षल्यांविरुद्ध विपरीत परिस्थितीतही लढणाऱ्या सुरक्षा दलांच्या धैर्याची प्रशंसा करीत, त्यांच्यात विजयाची इच्छाशक्ती कायम जागृत ठेवण्याचे काम विद्यमान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपवण्याची ‘डेडलाईन’ दिली. ती संपायच्या आतच ही चळवळ संपायच्या मार्गावर असल्याची खात्री पटते. देवजीची शरणागती ही नक्षलवादी विचारसरणीचा संपूर्ण पराभव दर्शविणारी आहे. सरकारचे मोठे यशही ती अधोरेखित करते. पण नक्षलवाद संपत असताना सरकारची भूमिका सहयोग्याची असणे गरजेचे आहे. आदिवासींच्या मनात हे सरकार आमचे आहे अशी भावना रुजली पाहिजे; जेणेकरून पुन्हा अशा चळवळी उभ्या राहणार नाहीत. शोषणमुक्त समाज ही या भागाची गरज होती आणि काही अंशी अद्यापही आहे. त्यासाठी आश्वासक योजना आखली जावी. जल, जमीन व जंगलावर मनापासून प्रेम करणाऱ्या व तीच जीवनपद्धती जगणाऱ्या या भागातील जनतेचा विकास करीत असताना पर्यावरणाला ओरबाडण्याची जाणीव त्याच्यात रुजणार नाही, याचीही दक्षता घ्यावी लागणार आहे. बाकी एकेकाळच्या मुक्तिदात्यांचा शक्तिपात आदिवासींना, शासन-प्रशासन व पोलिसांना तसेच समस्त भारतातील नागरिकांना सुखावणाराच आहे, यात वाद नाही.

## स्मरण

# सावरकरांच्या विचारांचे सार शोधताना...

**डॉ. प्रीती पोहेकर**

इतिहासातील व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन करताना दोन टोकांपासून जपून राहावे लागते. अतिभक्ती आणि अतिरेकी टीका. कारण या दोन्ही टोकांमध्ये सत्य अनेकदा हरवते. विनायक दामोदर सावरकर अर्थात स्वातंत्र्यवीर सावरकर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याभोवती प्रशंसा आणि विवाद यांचे वलय आजही तितक्याच तीव्रतेने फिरताना दिसते. सावरकरांकडे केवळ भावनांच्या किंवा राजकीय पूर्वग्रहांच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी इतिहासाच्या संदर्भात त्यांच्या लेखनाच्या आणि कृतीच्या आधारे चिकित्सक नजरेने पाहणे आवश्यक ठरते. सावरकर हे केवळ स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक नव्हते; ते समाजरचनाविषयक चिंतक, तर्कनिष्ठ सुधारक आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना मांडणारे विचारवंत होते. त्यांच्या जीवनातील अंदमानातील कठोर शिक्षा, रत्नागिरीतील स्थानबद्धतेचा काळ, जातिनिर्मूलनासाठी केलेले प्रयोग आणि अखंड राष्ट्राच्या संकल्पनेविषयीची त्यांची तळमळ या सर्वांचा एकत्रित विचार केल्याशिवाय त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व समजणे कठीण आहे. सावरकरांच्या दृष्टीने ‘धर्म’ ही संकल्पना संकुचित नव्हती. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन अशा पंथनिहाय विभागणीत ते धर्म पाहत नसत. सावरकरांचा दृष्टिकोन याच संकल्पनेशी साधर्म्य राखतो. त्यांच्या मते, या भूमीत राहणारा प्रत्येक जण सांस्कृतिक अर्थाने ‘हिंदू’ आहे. ‘हिंदू’ हा शब्द कोणत्याही पंथाचा द्योतक नसून सिंधू संस्कृतीपासून अपभ्रंश होत निर्माण झालेली एक भौगोलिक आणि सांस्कृतिक ओळख आहे. त्यामुळे ‘हिंदुत्व’ हे त्यांच्यासाठी धर्मसंकल्पना नसून सांस्कृतिक राष्ट्रत्वाचे प्रतीक होते. अंदमानमधील सेल्युलर तुरुंगातून झालेल्या त्यांच्या सुटकेविषयी समाजात आजही वाद आहेत. आयुष्यभर तुरुंगात खितपत पडून काही साध्य होणार नाही, हे त्यांना उमगले होते. देशासाठी कार्य करण्याचे मार्ग केवळ राजकारणापुरते मर्यादित नसतात, तर समाजकारणही तेवढेच प्रभावी असावे लागते, हा त्यांचा विश्वास होता.

१९२४ मध्ये सेल्युलर कारागृहातून मुक्तता झाल्यानंतर त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध करण्यात आले होते. राजकीय कार्यावर निर्बंध होते. सार्वजनिक राजकीय भाषणांवर मर्यादा होत्या. परंतु या बंधनांमधूनही त्यांनी राष्ट्रनिर्मितीचा मार्ग शोधला आणि तो मार्ग होता समाजसुधारणेचा. रत्नागिरीत त्यांनी सर्वप्रथम हात घातला तो जातिभेदाच्या प्रश्नाला. दलित वस्त्यांमध्ये जाऊन सहभोजन करणे, त्यांना आपल्या घरी आमंत्रित करणे, आपल्या घरात-अगदी स्वयंपाकघरातही प्रवेश देणे, सार्वजनिक विहिरी, मंदिरे आणि सामाजिक स्थळे सर्वांसाठी खुली व्हावीत यासाठी प्रचार करणे या कृती त्या काळात धाडसी मानल्या जात. त्या काळातील सामाजिक परिस्थितीत ही कृती क्रांतिकारीच होती. त्यामुळे त्यांना केवळ परंपरावाद्यांकडून नव्हे, तर स्वतःच्या समाजातूनही विरोध पत्करावा लागला. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात एक विलक्षण सुसंगती दिसते. ते जसे बोलत तसेच जगत. विचार आणि आचरण यांच्यातील दरी त्यांनी जाणीवपूर्वक नाकारली होती. त्यांच्या रत्नागिरीतील स्थानबद्धतेचा काळ हा याच सुसंगतीचा प्रत्यय देणारा ठरतो. सावरकर केवळ दलित समाजाबरोबरच नव्हे, तर मुस्लिम आणि ख्रिश्चन बांधवांबरोबरही सहभोजन करत. त्या काळात सहभोजन हा सामाजिक क्रांतीचा प्रत्यक्ष प्रयोग होता. मांडीला मांडी लावून बसणे, एकत्र बसून जेवणे या कृती म्हणजे त्या समाजमान्यतेच्या भिंतींना दिलेले उघड आव्हान होते. स्पृश्य-अस्पृश्यतेच्या, पंथभेदांच्या कोंडमाऱ्यात अडकलेल्या समाजाच्या दृष्टीने हे पाऊल धाडसीच नव्हे, तर परंपरावाद्यांना अस्वस्थ करणारे होते.



या कृतीमुळे पारंपरिक रूढी आणि रिवाजांना घट्ट धरून बसणाऱ्या भारतीय समाजात खळबळ उडालीच; परंतु काही मुस्लिम आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांमध्येही एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली होती, असेही म्हटले जाई. कारण त्या काळात ‘सहभोजन’ धार्मिक सीमारेषांशी जोडले गेले होते. रत्नागिरीतील सहभोजनांच्या पंक्ती केवळ जेवणाच्या नव्हत्या. त्या सामाजिक क्रांतीच्या पंक्ती होत्या. त्या पंक्तीत बसताना सावरकर केवळ समाजसुधारकाची भूमिका बजावत नव्हते, तर ‘मानव’ या समान ओळखीचा पुरस्कार करीत होते. राष्ट्र उभे राहते ते समानतेच्या पायावर, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. अन्न, पाणी आणि स्पर्श यांच्या भिंती पाडल्याशिवाय मनाची दारे उघडत नाहीत, हे त्यांना ठाऊक होते.

रत्नागिरीतील पतितपावन मंदिर ही त्यांच्या सामाजिक क्रांतीची साक्ष देणारी घटना ठरली. सर्व हिंदूंसाठी जातिभेदाशिवाय प्रवेश असलेले मंदिर उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून सामाजिक समानतेचे प्रतीक असावे, हा त्यामागचा संदेश होता. या उपक्रमामुळे त्यांना पारंपरिक समाजरचनेतील घटकांकडून विरोधही सहन करावा लागला. कर्मकांड, अंधश्रद्धा, स्पृश्य-अस्पृश्यता, सोवळे-ओवळे यासारख्या प्रथांना त्यांनी उघडपणे विरोध केला. बुद्धिनिष्ठ, विज्ञानाभिमुख आणि पुरोगामी दृष्टिकोन हा त्यांच्या विचारांचा पाया होता. बुद्धीला न पटणारी आणि तर्कसंगती नसणारी कोणतीही गोष्ट अथवा कृती केवळ पूर्वीपासून चालत आली आहे, म्हणून आचरणात आणू नये असा त्यांचा आग्रह होता. अखंड हिंदुस्थान हे त्यांचे स्वप्न होते. फाळणीच्या प्रश्नावर त्यांची भूमिका ठाम होती. भारत अखंड राहावा ही त्यांची इच्छा होती. देशाचे विभाजन ही एक ऐतिहासिक शोकांतिका आहे असे ते मानत. सावरकरांच्या विचारांशी मतभेद व्यक्त केले गेले. त्यांच्या कृतींवर टीकाही झाली. परंतु त्या टीकेमुळेच त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास झाला. त्यांच्या साहित्याचा पुनर्विचार झाला आणि त्यांच्या कार्याचे अनेक पैलू नव्याने उजेडात आले. किंबहुना, त्यांच्यावर केलेल्या आरोपांमुळेच सावरकर पुन्हा एकदा ‘जीवित’ झाले, असे म्हणता येईल. असे भाग्य इतर कुणाही स्वातंत्र्यसेवकाला लाभले नाही.

सावरकरांच्या साहित्याची उंची सामान्यांना न पेलणारी आहे. अंदमानानंतरच्या काळातही त्यांनी विपुल लेखन केले. इतिहास, राजकारण, समाजशास्त्र, काव्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी विचार मांडले. त्यांची लेखनशैली तर्कशुद्ध, प्रखर आणि आक्रमक होती. त्यांनी रचलेली देशभक्तीपर गीते, नाटके आणि लेख यातून त्यांच्या मनातील राष्ट्रनिष्ठा व्यक्त होते. त्यांचे प्रभावी वक्तृत्व आणि जहाल लेखन यांचा ब्रिटिशांनी धसका घेतला होता, असे मानायला जागा आहे. भाषिक स्वाभिमान हा त्यांच्या राष्ट्रवादाचा अविभाज्य भाग होता. इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द देऊन त्यांनी भाषा समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रनिर्मितीतील भाषेचे महत्त्व ते जाणून होते. त्यांच्या मते, भाषिक गुलामगिरी ही मानसिक गुलामगिरीचीच एक छटा आहे. सावरकरांच्या विचारांचे मूल्यांकन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ते मूलतः संघटनवादी होते. समाजाची ऊर्जा विखुरलेली न राहता एकत्र यावी, यासाठी त्यांची धडपड होती. त्यांना सामाजिक समता, सांस्कृतिक अभिमान आणि राजकीय सबलता ही त्रिसूत्री मान्य होती. विखुरलेला समाज कधीच सबळ राष्ट्र उभारू शकत नाही, हे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक आत्मभान यावे म्हणून ‘हिंदू संघटन’ ही संकल्पना मांडली. राष्ट्रनिर्मितीत स्त्रियांचा सक्रिय सहभाग अपरिहार्य आहे, हा त्यांचा आग्रह त्या काळाच्या तुलनेत प्रगत मानला जातो.

सावरकरांचा खरा वारसा समाजाला अंतर्मुख करणाऱ्या या मुद्यांमध्ये आहे. त्यांनी पेटवलेली विचारांची आणि कृतीची ज्योत केवळ इतिहासाच्या पानांवर नाही. ती विवेक, संघटन आणि आत्मभान यांची आठवण करून देणारी चेतना आहे. त्यांच्या जीवनातील सत्य पुराव्यांवर उभे राहावे. त्यांच्या कार्याची व्यापकता समजून घ्यावी आणि मतभेदांच्या पलीकडे जाऊन त्यांच्या विचारांचे सार शोधावे हीच त्यांना दिलेली खरी आदरांजली ठरेल.

## वेध

# ‘मिशन जिंकूया’मुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा

**नंदकिशोर काथवटे**

गडचिरोली म्हटलं की डोळ्यासमोर येतं घनदाट जंगलं, नद्या-नाले, डोंगररांगा आणि अनेक अडचणींशी झुंज देणारे जीवन. या दुर्गमतेच्या पलीकडे आज गडचिरोलीतील विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहू लागला आहे. स्पर्धेच्या युगात तो आत्मविश्वासाने पुढे जात आहे आणि त्याच्या पाठीशी आहे जिल्हा प्रशासन. जिल्हा परिषद गडचिरोलीच्या ‘मिशन जिंकूया’ या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्रामीण व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडू लागले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणारा हा उपक्रम केवळ शिष्यवृत्ती परीक्षेपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. तज्ज्ञ मार्गदर्शन, ओएमआर सराव, परीक्षा शुल्काची सुविधा, शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग आणि अभ्यासाचे सूक्ष्म नियोजन अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा दिली जात आहे.

अलिकडेच शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या २० विद्यार्थ्यांना मुंबईची हवाई सफर घडवून आणण्यात आली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांनी प्रथमच विमान प्रवासाचा अनुभव घेतला. मंत्रालय, विधान भवन, गेटवे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, एलिफंटा लेणी, नेहरू विज्ञान केंद्र आणि नेहरू तारांगण अशा ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांना भेट देत ज्ञानाचा आणि अनुभवाचा नवा खजिना उघडला. ही सहल त्यांच्या स्वप्नांना आकाशाची उंची देणारा अनुभव होता. या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव तथा गडचिरोलीचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांच्या निवासस्थानी भेट दिली. गडचिरोलीतील विद्यार्थी अत्यंत तेजस्वी आहेत, असे सांगत त्यांनी त्यांच्या जिद्दीचे कौतुक केले. शिक्षक, डॉक्टर, कलेक्टर किंवा पोलिस अधिकारी होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या या मुलांना सर्वोत्तम सुविधा मिळाल्या पाहिजेत, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मोठ्या स्वप्नांना शासनाने दिलेली ही दाद त्यांच्या आत्मविश्वासाला नवे बळ देणारी आहे. खरे पाहता, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्तेची कमी नाही; कमी आहे ती संधींची. ‘मिशन जिंकूया’सारख्या उपक्रमांमुळे ही दरी भरून काढण्याचा प्रयत्न होत आहे. विद्यार्थ्यांना जर योग्य मार्गदर्शन, उत्तम शिक्षक आणि आधुनिक सुविधा मिळाल्या, तर ते कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत. उलट, कठीण परिस्थितीत वाढल्यामुळे त्यांच्यातील जिद्द आणि चिकाटी त्यांना अधिक सक्षम बनवते. पुढील वर्षी शंभर विद्यार्थ्यांना हवाई सफर घडविण्याचा आणि ‘आदर्श शाळां’तर्गत विद्यार्थ्यांना हैदराबाद व बंगळुरू येथील रिसर्च सेंटरला पाठविण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे. हा केवळ दौरा नाही, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील संधींचे दार उघडण्याचा प्रयत्न आहे. अशा एक्सपोजरमुळे विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होतो, त्यांची स्वप्ने अधिक स्पष्ट होतात आणि स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी नवा उत्साह निर्माण होतो. आज गरज आहे ती या सकारात्मक उपक्रमांना सातत्य देण्याची. जिल्हा प्रशासनाने दाखवलेली दूरदृष्टी आणि बांधिलकी नक्कीच कौतुकास्पद आहे. गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम जिल्ह्यातूनही विद्यार्थी मोठी स्वप्ने पाहू शकतो, ती पूर्ण करू शकतो, यावर ‘मिशन जिंकूया’ने शिक्कामोर्तब केले आहे. दुर्गमतेतून उंच भरारी घेणाऱ्या या विद्यार्थ्यांना सलाम! योग्य संधी आणि भक्कम पाठबळ मिळाले, तर गडचिरोलीचा विद्यार्थी केवळ जिल्ह्याचाच नव्हे तर राज्य आणि देशाचाही अभिमान ठरेल, याबद्दल शंका नाही.

आजच्या काळात स्पर्धा तीव्र आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी आत्मविश्वास, योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण परिश्रम आवश्यक असतात. ‘मिशन जिंकूया’ विद्यार्थ्यांना केवळ यशाचे ध्येय देत नाही, तर त्यासाठी लागणारी मानसिक ताकदही देतो. गडचिरोलीच्या मातीतील ही मुले जर अशाच पद्धतीने संधींचा लाभ घेत राहिली, तर उद्याचे डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी आणि वैज्ञानिक याच दुर्गम भागातून घडतील, अशी आशा बाळगू शकतो. गडचिरोलीच्या दुर्गम मातीत उमलणारी ही स्वप्ने आता केवळ कल्पना राहिलेली नाहीत, तर ती वास्तवात उतरण्याच्या दिशेने ठाम पावले टाकत आहेत. प्रशासनाची साथ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांचा संगम झाला, तर कोणतीही दुर्गमता आड येऊ शकत नाही. ‘मिशन जिंकूया’सारखे उपक्रम ही केवळ योजना नसून ग्रामीण भागातील नव्या पिढीच्या भविष्याची भक्कम पायाभरणी आहे. ही जिद्द, हा आत्मविश्वास आणि हे पाठबळ कायम राहिले, तर गडचिरोलीचा विद्यार्थी उद्याच्या भारताच्या घडणीत निर्णायक भूमिका बजावेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# हरयाणात काँग्रेसला क्रॉस व्होटिंगचा शाप

**श्यामकांत जहागीरदार**

राज्यसभेच्या एकूण ७२ जागांसाठी यावर्षी तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ३७ जागांची निवडणूक १६ मार्चला होत आहे. जूनमध्ये २४ तर नोव्हेंबर महिन्यात ११ अशा आणखी ३५ जागांसाठी निवडणूक होणार आहे. पहिल्या टप्प्यात निवडणूक होत असलेल्या राज्यसभेच्या ३७ जागांत काँग्रेस नेतृत्वातील इंडिया आघाडीजवळ १८ तर भाजपा नेतृत्वातील रालोआजवळ १५ जागा आहेत. रालोआच्या १५ जागात भाजपाच्या ९ जागांचा समावेश आहे. यावेळी भाजपाच्या जागांत तीनने वाढ होत त्या १२ होऊ शकतात. दुसरीकडे इंडिया आघाडीच्या १८ जागात काँग्रेसच्या फक्त ४ जागा आहेत. त्यात फार तर एका जागेची भर पडू शकते. काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी, केटीएस तुलसी, रजनी पाटील आणि फुलोदेवी नेताम या चार सदस्यांचा कार्यकाळ संपत आला आहे. यापैकी केटीएस तुलसी आणि फुलो देवी नेताम हे दोन सदस्य छत्तीसगडमधून निवडून आल्या आहेत. अभिषेक मनू सिंघवी तेलंगणातून तर रजनी पाटील महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून आल्या आहेत.

जून महिन्यात ज्या २४ जागांसाठी निवडणूक होणार आहे, त्यातही काँग्रेसच्या ४ जागा आहेत. जून महिन्यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचा कार्यकाळ संपत आहे. सध्या राज्यसभेत काँग्रेसचे संख्याबळ २७ आहे. यावर्षी होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा दोनने वाढतील, असा अंदाज आहे. मात्र, या निवडणुकीत काँग्रेसच्या जागा वाढल्या नाही तर काँग्रेसकडे असलेले राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात येऊ शकते. त्यामुळे काँग्रेसला यावेळी राज्यसभेची निवडणूक अतिशय गांभीर्याने लढवावी लागणार आहे. देशात सध्या फक्त तीनच राज्यात काँग्रेसची सत्ता आहे. यात तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश यांचा समावेश आहे. यावेळी कर्नाटकात राज्यसभेची निवडणूक नाही, त्यामुळे काँग्रेसची सारी मदार तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश या दोन राज्यांवरच राहणार आहे. छत्तीसगड आणि हरयाणाची थोडी फार मदत काँग्रेसला मिळू शकते. काँग्रेसला तेलंगणातून दोन, हरयाणा, छत्तीसगड आणि हिमाचलमधून प्रत्येकी एक जागा मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला या निवडणुकीत खरा धोका हा भाजपापासून नाही तर आपल्याच पक्षातील आमदारांपासून आहे. त्यामुळे यावेळी निवडणुकीत आपली मते फुटणार नाही, म्हणजे क्रॉस व्होटिंग होणार नाही, याची काळजी काँग्रेसच्या नेतृत्वाला घ्यावी लागणार आहे.

याआधी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत हरयाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसची मते फुटली होती. त्यामुळे सहज विजयी होणाऱ्या दोन जागांवर काँग्रेसचा पराभव झाला होता. हिमाचल प्रदेशमध्ये राज्यसभेच्या एका जागेसाठी निवडणूक होत असून राज्यात काँग्रेसचे ४० आमदार आहेत आणि राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी ३५ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे काँग्रेसला एक जागा सहज मिळू शकते. राज्यसभेच्या एका जागेसाठी ज्येष्ठ नेते आनंद शर्मा आणि माजी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष प्रतिभासिंह यांची नावे चर्चेत आहे. प्रतिभासिंह या याज्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री दिवंगत वीरभद्रसिंह यांच्या पत्नी आहेत. राज्यसभेच्या निवडणुकीचा याआधीचा राज्यातील इतिहास काँग्रेससाठी समाधानकारक नव्हता. २०२४ मध्ये राज्यात झालेल्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंगचा फटका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक मनू सिंघवी यांना बसला होता. विशेष म्हणजे तेव्हा राज्यात काँग्रेसचे स्पष्ट बहुमत होते; काँग्रेसजवळ ४० आमदार होते तर भाजपाजवळ फक्त २८. जिंकण्यासाठी ३५ आमदारांची आवश्यकता होती. त्यामुळे काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी यांचा विजय १०० टक्के निश्चित मानला जात होता. पण मतदानात गडबड झाली, काँग्रेसच्या सहा आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले, त्यामुळे काँग्रेसची सहा मते कमी होत ३४ वर आली तर भाजपाची सहा मते वाढत ती ३४ झाली. काँग्रेस आमदार काँग्रेसला साथ देत नसल्यामुळे ईश्वरानेही काँग्रेसला साथ न देण्याचा निर्णय घेतला. ईश्वरचिठ्ठीत भाजपाचे हर्ष महाजन विजयी झाले. यामुळे राज्यात प्रचंड खळबळ उडाली. काँग्रेसचे सुखवीरसिंह सुक्खू यांचे सरकार कोसळण्याची स्थिती उद्‌भवली होती. हिमाचल प्रदेशमध्ये पराभूत झाल्यानंतर सिंघवी नंतर तेलंगणातून राज्यसभेवर निवडून आले. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत छत्तीसगडमधून काँग्रेसचे केटीएस तुलसी आणि फुलोदेवी नेताम हे दोन खासदार विजयी झाले होते, पण यावेळी संख्याबळाचा विचार करता काँग्रेसचा एकच खासदार विजयी होऊ शकतो. तुलसी आणि नेताम यांना काँग्रेसची उमेदवारी मिळण्याची शक्यता नाही. काँग्रेसमधून राज्यसभेच्या एका जागेसाठी माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि माजी उपमुख्यमंत्री टी.एस. सिंहदेव यांच्या नावांची चर्चा आहे. हरयाणात भाजपाच्या किरण चौधरी आणि रामचंद्र जांगरा या दोन सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्यामुळे हरयाणात राज्यसभेची निवडणूक होत आहे. राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी ३१ मतांची आवश्यकता आहे. भाजपाजवळ ४८ तर काँग्रेसजवळ ३७ आमदार आहेत. त्यामुळे भाजपा आणि काँग्रेस एकेक जागा जिंकू शकेल, असे दिसते. मात्र हरयाणात काँग्रेसमध्ये क्रॉस व्होटिंगची परंपरा आहे. २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे अजय माकन यांचा पराभव झाला होता. भाजपा तसेच जजपाच्या पाठिंब्याने अपक्ष उमेदवार कार्तिकेय शर्मा विजयी झाले होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री भजनलाल यांचे पुत्र कुलदीप बिष्णोई यांच्या बंडखोरीमुळे तेव्हा माकन यांचा पराभव झाला होता. बिष्णोई यांना प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष व्हायचे होते; मात्र काँग्रेसच्या नेतृत्वाने माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांचे निकटवर्ती उदयभान यांना प्रदेश अध्यक्ष केले, त्यामुळे दुखावलेल्या बिष्णोई यांनी क्रॉस व्होटिंग केले, असे मानले जाते.

राज्यसभा निवडणुकीत हरयाणात क्रॉस व्होटिंग होण्याची ही पहिली घटना नाही. २०१६ मध्येही क्रॉस व्होटिंगमुळे काँग्रेस आणि ईनेलो समर्थित उमेदवार आर. के. आनंद यांचा भाजपा समर्थित उमेदवार सुभाष चंद्रा यांनी पराभव केला होता. या निवडणुकीत आनंद यांना २१ तर सुभाषचंद्र यांना १५ मते मिळाली होती. काँग्रेसची १४ मते अमान्य करण्यात आली तर भाजपाची दुसऱ्या पसंतीची १४ मते चंद्रा यांना मिळाली; ते विजयी झाले होते. त्यामुळेही यावेळची हरयाणातील राज्यसभा निवडणूक काँग्रेससाठी सोपी नाही. हरयाणा काँग्रेसमध्ये गटबाजी आहे. राज्यात भूपेंद्रसिंह हुडा यांचा एक गट आहे तर दुसरा गट हुडा विरोधकांचा. हुडा विरोधकांत शैलजा, रणदीप सुर्जेवाला आणि अन्य नेत्यांचा समावेश आहे. या गटबाजीमुळे काँग्रेसला राज्यातील आपला विरोधी पक्षनेताही अजूनपर्यंत ठरवता आला नाही. या गटबाजीचा फटका राज्यातील काँग्रेसला वारंवार बसत आहे, तसाच तो यावेळीही बसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याचाच फायदा घेत भाजपाने राज्यातील राज्यसभेची दुसरी जागाही जिंकण्याचा प्रयत्न केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

९८८१७१७८१७

### ईपीएस-९५ अंतर्गत निवृत्ती वेतनधारकांना महागाई भत्ता मिळावा

भारतात ईपीएस-९५ योजनेंतर्गत निवृत्ती वेतन धारकांची संख्या डिसेंबर २०२५ अखेर ८२.११ हजार होती. त्यात ४७ लाख कर्मचाऱ्यांना प्रति माह रु. ९ हजारांपेक्षा कमी निवृत्ती वेतन मिळत आहे. त्यात १८ लाख कर्मचारी असेही आहेत ज्यांना प्रति माह केवळ रु. १ हजार निवृत्ती वेतन मिळत आहे. यात वाढ होत नाही. कारण दर ६ महिन्यांनी जो महागाई भत्ता वाढतो, त्याचा लाभ या कर्मचाऱ्यांना मिळत नाही. सर्वोच्च न्यायालयाने ४.११.२०२२ ला दिलेल्या निर्देशानुसार काही कर्मचाऱ्यांना वाढीव पेन्शनचा लाभ मिळायला लागला आहे; पण त्यांनाही वाढीव महागाई भत्ता मिळत नाही. ईपीएस-९५ योजनेंतर्गत वाढीव महागाई भत्ता मिळण्याची तरतूद नसावी. त्यामुळे निवृत्तीच्या वेळी निर्धारित करण्यात आलेले निवृत्ती वेतन कर्मचारी हयात असेपर्यंत तेच राहत. महागाईच्या काळात प्रति माह रु. १ हजार निवृत्ती वेतन म्हणजे ज्येष्ठांची क्रूर चेष्टाच आहे. त्यातच वाढीव महागाई भत्ता न देणे अन्यायकारक आहे.

**वसंत पिंपळापुरे** /९४२२८०७०१३



### ओपन जागा की कचरा डेपो...

## वाचक पत्रे


सोलापूर शहरात नूतन महापौर व नगरसेवक कार्यरत झालेले आहेत. प्रत्येक नूतननगरसेवक त्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या आश्वासनात बऱ्याच नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील महत्त्वाच्या विषयावर नागरिकांशी विचारविनिमय केलेले आहे. शहरातील महत्त्वाचे प्रश्न म्हणजे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज लाईन,लाईटीचे व्यवस्था,रस्त्यावरील अतिक्रमण,आरोग्य,हे सर्व विषय सर्व प्रभागात कायम स्वरूपी आपल्याला पाहायला मिळते याचेच एक उदाहरण म्हणजे शहरातील नावाजलेले नगर म्हणजे आंत्रोळीकर नगर व त्या शेजारी असलेले बसवेश्वर नगर हे आहे. या दोन्ही नगरात आज झपाट्याने नवीन इमारती होत आहेत. फक्त इमारती नवीन करून,बांधून फायदा नाही किंवा मनपाचे उत्पन्न टॅक्समुळे वाढते एवढेच विचार करून चालणार नाही. तर या परिसरात असलेल्या ओपन राखीव जागेवर वेळेवरच उपायोजना करून ती जागा नागरिकांसाठी वापराण्यासाठी योग्य करून देण्यात आली पाहिजे. पण तसे न होता आज या परिसरात खुली जागा म्हणजे कचरा डेपो झालेले आपल्याला पाहायला मिळते. या परिसरात असलेल्या खुल्या जागेवर जवळपासच्या बांधकामाचे कचरा येथे मोठ्या प्रमाणावर टाकण्यात येते.यामुळे या परिसरात घानीचे साम्राज्य पाहायला मिळते. पण या घाणीच्या साम्राज्याकडे प्रशासन मात्र तक्रार केल्याशिवाय उपायच करत नाही असे दिसून येते.

तरी कृपया नूतन नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील ओपन जागेवर सुंदर व उपयुक्त असे काहीतरी केले पाहिजे असे वाटते..

**फैय्याज शेख, सोलापूर**

### सामाजिक समरसता

सामाजिक समरसता ही एकात्मिक राष्ट्रीय जोपासनेची गरज आहे. आपला देश भिन्न संस्कृती आणि संप्रदायाने नटलेला आहे. याकरिता परस्पर सौहार्द, सन्मान महत्त्वाचा ठरतो. देशात काही असामाजिक तत्त्व, विभक्त कुटुंब, आरक्षण, बेरोजगारी यासारखे प्रश्न निर्माण करून उठसूट आंदोलन उभे करून देशात अशांतता माजवून लोकांना भ्रमित करतात. अलिकडे ‘मुक्ती’ या शब्दप्रयोगाने लोकांना भुरळ घालून रस्त्यावर कसे उतरवता येईल, याचे कसब पणाला लावण्यात धन्यता मानतात. असामाजिक तत्त्वांचा वलय निर्माण होण्याची कारणमीमांसा करण्याची गरज आता गृहमंत्रालयावर येवून पडलेली आहे. कारण कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस यंत्रणेला हे एक आव्हान आहे.



**वि. ल. उईके** /८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन

**सोलापूर, २५ फेब्रुवारी-**

विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतुहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी व्हॅलेंटाईन सर्कल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील उपस्थित होते. थोर वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमा पुजनाने व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गायत्री कामुनी यांनी दिनविशेष सांगितले. या दिवशी चित्रकलांचे प्रदर्शन व प्रयोगाच्या मार्गदर्शनात रीवर क्लीनिंग, स्मार्ट ॲग्रीकल्चर, ह्युमन इंटरनल सिस्टम, ॲक्सिडंट सेंसर कार, अर्थके आलाराम, सोलार सिस्टम, रोबोट लिफ्ट, स्मार्ट व ग्रीन सिटी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, यांसारख्या बरेच प्रतिकृती, भिंतीपत्रकांचे प्रदर्शन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आली. यावेळी विज्ञान शिक्षिका मेहजबीन शेख, स्वेता येमेकर, कामाक्षी गड्डम, पूजा मानेकरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी कौतुक केले.



### ‘विमल प्रकाश’ बंगला ठरला सोलापूरमधील उत्कृष्ट काँक्रीट रचनेचा मानकरी

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

शहरातील अभियांत्रिकी व वास्तुरचनेच्या क्षेत्रात अभिमानास्पद ठरणारी कामगिरी करत ‘विमल प्रकाश’ या निवासी बंगल्याने आउटस्टँडिंग काँक्रीट स्ट्रक्चर ऑफ सोलापूर डेपो हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला आहे. हा सन्मान अल्ट्राटेक सिमेंट कंपनी असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स आणि यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आला. २००० चौ.फु. पेक्षा अधिक बांधकाम क्षेत्र असलेल्या बंगल्यांच्या गटात ‘विमल प्रकाश’ या प्रकल्पाने उत्कृष्ट गुणवत्ता, मजबूत संरचना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि आकर्षक वास्तुरचना या सर्व निकषांवर विशेष ठसा उमटवला. प्रकल्पातील काँक्रीट संरचनेची मजबुती, सुरक्षितता आणि दीर्घकालीन टिकाऊपणा यांचा सखोल अभ्यास करून परीक्षक समितीने हा पुरस्कार जाहीर केला. एलिव्हेशन डिझाईन हे या प्रकल्पाचे मुख्य आकर्षण असून, वास्तुविशारद अक्षत शाह यांनी एएसी ब्लॉक्सचा वापर करून आकर्षक आणि गतिमान जाळी पॅटर्न तयार करण्याचा अभिनव प्रयोग केला आहे. या यशामागे श्रेयस प्रकाश कोठारी यांचा दूरदृष्टीपूर्ण दृष्टिकोन महत्त्वाचा ठरला. स्ट्रक्चरल इंजिनिअर श्रीनिवास पी. मोहोळकर यांनी मजबूत व सुरक्षित बांधकामासाठी तांत्रिक अचूकतेची जोड दिली, तर इंजिनिअर महावीर वेद यांनी संपूर्ण प्रकल्पाच्या अंमलबजावणीत काटेकोर नियोजन आणि गुणवत्तेची अंमलबजावणी सुनिश्चित केली.



### एस.व्ही.सी.एस. प्रशालेचे एन.एम.एम.एस. परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत एस.व्ही.सी.एस. हायस्कूल एमआयडीसी येथील प्रशालेने घवघवीत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना प्रवीण नवले, रामेश्वर चोबे, रोहिणी कल्याणशेट्टी, शैलजा भुसारे व रेवणसिद्ध बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक केदार पटणे यांनी अभिनंदन केले. **यश मिळविलेले विद्यार्थी :** चैताली सदाफुले, श्रेया नरोटे, श्रीविद्या गोसकी, योगेश सुप्पल, गौरव समाणे, अपर्णा चौरे, प्रणव बोडके, प्रसाद क्षिरसागर, त्रिशा कौंची, सृष्टी बाबानगरे, अनुष्का पाटील व आविष्कार सोनवणे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Sanjay Krishna Mane** HAS BEEN CHANGED TO **Sanjay Krushna Mane**

Resi. - Samata Nagar, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME. (1707/2026 Dtd.23.02.2026)

# खुल्या गटात दुलंगे व राठी अजिंक्य

## सोनी कॉलेज बॅडमिंटन स्पर्धा

### आंतरराष्ट्रीय खेळाडू मृण्मयी देशपांडे यांच्या हस्ते गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**

निमंत्रित बॅडमिंटन स्पर्धेत खुल्या गटात गणेश दुलंगे व प्रपती राठी यांनी अजिंक्यपद पटकाविले.

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे संचलित देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालयात ९ ते १७ वर्षांखालील आणि खुला गट अशा विविध वयोगटांसाठी निमंत्रित बॅडमिंटन स्पर्धेचे शानदार आयोजन करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि पीएम-उषा उपक्रमांतर्गत ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे चेअरमन मधुसूदन करवा आणि आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू मृण्मयी देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी संचालिका डॉ. वासंती अय्यर, क्रीडा संचालिका सुवर्णा कांबळे, प्रशिक्षक अर्शीद शेख, प्रमुख पंच म्हणुन आर्शीन शेख, श्रीराम, डॉ. मोरे, चित्राली आदी उपस्थित होते.



**अंतिम निकाल एकेरी ( विजेता व उपविजेता)**

| | | |
|---|---|---|
| * ९ वर्षांखालील | **मुले** : | केतन हेबाले, विहान कुलकर्णी. |
| | मुली : | जुनैरा अत्तार, ईश्वरी येलावे. |
| * ११ वर्षांखालील | **मुले** : | असद शेख, आदित्य पवार. |
| | मुली : | ओसिन अरखाराव, मरियम होटगी. |
| * १३ वर्षांखालील | **मुले** : | यश मोरे, अथर्व व्हटकर. |
| | मुली : | आराध्या सावंत, अन्वी शाह. |
| * १५ वर्षांखालील | **मुले** : | मिहिर लोणावत, कार्तिक चिंचोरे. |
| | मुली : | अर्विता कुलकर्णी, आरोशी घाडगे. |
| * १७ वर्षांखालील | **मुले** : | सई परदेशी, समर्थ ढवळे. |
| | मुली : | संस्कृती स्वामी, काव्या दावडा. |
| * खुला | **मुले** : | गणेश दुलंगे, कुंदन वेर्णेकर. |
| | मुली : | प्रपती राठी, सृष्टी वाघमारे. |

# सोलापूरच्या गार्गी ओक व आव्यान पुलगमचा उपांत्य फेरीत प्रवेश





## राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली १२ वर्षाखालील राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत येथील गार्गी ओक व आव्यान पुलगमचा यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला.

कुमठा नाका जिल्हा क्रीडा संकुलातील टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुलींच्या एकेरी गटात सोलापूरच्या द्वितीय मानांकित गार्गी ओकने पुण्याच्या बिगर मानांकित कौशिकी चॅटर्जी चा ६-०,६-० असा तर दुहेरीत पुण्याच्या समारिया ठाकूर च्या साथीने पुण्याच्या चौथ्या मानांकित कायरा गोहिल व आराध्या घाणवत या जोडीचा ६-१ , ६-० असतात पराभव करून एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात तर मुलांच्या दुहेरी गटात आव्यान पुलगम (सोलापूर) व श्रेयस चोटमल (पुणे) या बिगर मानांकित जोडीने रिडिट नवले (पुणे) व सयान कुवाड (पुणे) या चौथ्या मानांकित जोडीचा अत्यंत अटीतटीच्या सामन्यात टायब्रेकर मधे ६-३ , ३-६ , १०-५ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# निमा सोलापूर संघाची विजयी सलामी

## ट्रायअसोसिएशन कप''क्रिकेट : आयएमए, डेंटल व निमा यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

निमा सोलापूर संघाने ''ट्रायअसोसिएशन कप'' या क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली. सलामीच्या सामन्यात त्यांनी डेंटल असोसिशन संघाचा ७० धावांनी पराभव केला.

नेहरूनगर येथील जय जवान जय किसान स्कूलच्या मैदानावर सुरू झालेल्या सलामीच्या सामन्यात निमा सोलापूर ने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना १२ षटकांत १७९ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये डॉ. भीमा सिंदगी व डॉ. गोरख यांनी ६५ धावाची भागीदारी केली. डॉक्टर फिरोज यांनी चौफेर फटकेबाजी करीत २३ चेंडूत ६९ धावा जोडून धावसंख्या मजबूत केली.

या आव्हानाचा पाठलाग करत असताना डेंटल असोसिएशन कडून जाहिद अफजल यांनी २५ धावा केल्या. मात्र त्यांना विजयी पल्ला गाठता आला नाही. डेंटल असोसिएशन चा संघ १०७ धावात गारद झाला. बॉलर सूर्यकांत धप्पा धुळे यांनी निमा सोलापूर कडून १२ धावांत ३ गडी टिपले. त्यामुळे निमा सोलापूर संघाने ७० धावांनी हा सामना जिंकत मालिकेत विजयी सलामी दिली.

सोलापूर, मेडिकल हब म्हणून ओळख असणाऱ्या सोलापूर शहरात डॉक्टरांच्या संघटनांना एकत्र घेऊन निमा सोलापूर शाखेतर्फे या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन निमा सोलापूर प्रेसिडेंट डॉ. नागनाथ जिड्डीमनी, आयएमए प्रेसिडेंट डॉ. मंजुषा शहा, आयडीए प्रेसिडेंट डॉ. अश्विनी किणीकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी निमाचे पदाधिकारी डॉ.विनायक टेंभुर्णीकर, डॉ. साहेबराव गायकवाड डॉ.नितीन बलदवा, डॉ. रविराज गायकवाड, डॉ. सुभाष भांगे डॉ. प्रवीण ननवरे डॉ. अभिजीत पुजारी, डॉ. श्रुती मराठे, डॉ. अश्विनी देगावकर, डॉ. पल्लवी भांगे आयडीए चे डॉ.वरुण देशपांडे आयएमए चे डॉ.योगेश राठोड उपस्थित होते.



# पीडब्ल्यूडी संघास विजेतेपद

## सोलापूर जनता सहकारी बँक क्रिकेट : बँक ऑफ महाराष्ट्र उपविजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त बँकेतर्फे घेण्यात आलेल्या सोलापूर जनता बँक टेनिस बॉल क्रिकेट ट्रॉफी २०२६वर पीडब्लुडी सोलापूर विभाग क्रिकेट संघाने आपले नाव कोरले. बँक ऑफ महाराष्ट्रचा संघ उपविजेता ठरला.

अंतिम सामना पीडब्ल्यूडी संघाने १२ धावांनी जिंकला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पीडब्ल्यूडी संघाने ६ षटकांमध्ये ३ बाद ७६ धावांचे आव्हान दिले. बँक ऑफ महाराष्ट्र संघाने ६ षटकांत ५ बाद ६४ धावांच करता आल्या.

सोलापूर जनता सहकारी बँकेला यंदा ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल जुळे सोलापुरातील भंडारी ग्राउंड येथे झालेल्या या स्पर्धेत १८ संघानी भाग घेतला. पारितोषिके आयपीएल पंच अनिश सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते देण्यात आली. विजेत्या पीडब्ल्यूडी संघाचा चषक आणि २१ हजार ६० रुपये तर उपविजेता बँक ऑफ महाराष्ट्र संघास उपविजेता चषक आणि ११ हजार ६० रुपये बक्षीस देण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक पुरुषोत्तम उडता, संचालिका चंद्रिका चौहान, गौरी अमडेकर, बँकेचे उपसरव्यस्थापक मकरंद जोशी, सीसीओ रमेश मामड्याल, बँकेचे सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष सुहास मुळजकर, सोलापूर जनता बँक क्रिकेट टीमचे कर्णधार अक्षय सुरवसे, क्रीडा समिती सदस्य सिद्धार्थ गंगौडा, लक्ष्मण सुतार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे अधिकारी दिनेश गुंड यांनी केले.

पंच म्हणून वरुण बुर्ला, सागर गड्डम, राज कुलकर्णी यांनी, समालोचक म्हणून डॉ. विपुल शेंडगे, शंकर पवार यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बँकेचे अधिकारी किरण आंबरे, दगडू साळुंखे, नागेश गुणके, बसवराज मदरकी, कपिल सावंत, राहुल हुंडेकरी,सुदर्शन गंभिरे, सुमित श्रोत्री, केशव घोडके महेश काकी, कर्मचारी ऋषिकेश परूळेकर, पवन शेंडे, अमोल रामनवर, राजशेखर कोडी, निखिल यादव, विनोद सोमा, रुपेश कुमरकुंटा, संजय राठोड, धनंजय सुरपाली, वैभव इनामदार यांनी परिश्रम घेतले.

**वैयक्तिक पारितोषिक विजेते**

सामनावीर : अरुण बल्ला. गोलंदाज : जमीर पठाण, फलंदाज : अनिल रेगाळ (बँक ऑफ महाराष्ट्र). मालिकावीर : महेश बुगडे (महेश अर्बन बँक).

## महापौर विनायक कोंड्याल यांचा प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केला सत्कार

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

महापौर पदी विनायक कोंड्याल यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या वतीने त्यांच्या सत्कार फेटा व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. यावेळी सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजय झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून



सोलापूर शहरातील मूलभूत सुविधा, विकास कामे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न व सोलापूर शहराच्या विकासाला एक नवीन उंचीवर घेऊन जाल. आपली वाटचाल यशस्वी होवो अशा प्रकारच्या शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी महापौर विनायक कोंड्याल यांना दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर सचिव इरफान शेख, भीमा मस्के उपस्थित होते.

**भारतीय स्टेट बँक**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस आणि विशेषतः खाली नमूद केलेल्या व्यक्तींना आणि त्यांच्या कायदेशीर वारसांना याद्वारे सूचित करण्यात येते की, भारतीय स्टेट बँक (**State Bank of India**), बार्शी शाखा, बार्शी, तालुका बार्शी, जिल्हा- सोलापूर ही बँक बार्शी येथे बँकिंग व्यवसाय करत असून, सदर बँकमार्फत ठेवी स्वीकारणे, कर्ज वाटप करणे, लॉकर सुविधा देणे इत्यादी सेवा पुरविल्या जातात.

सदर बँकेमध्ये खालील लॉकर / खातेधारकांनी लॉकर भाड्याने घेतले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

| अनु. क्र. | लॉकर / खातेधारकाचे नाव | लॉकर क्र. |
|---|---|---|
| १ | श्री. सोमनाथ जयराम तलवार | लॉकर क्र. **C-23** |
| २ | श्री. सुबराव तात्याबा कोकाटे | लॉकर क्र. **B-43** |
| ३ | सौ. किरण पलंगे आणि श्री. विलासराव पलंगे | लॉकर क्र. **C-42** |
| ४ | श्री. बाबासाहेब भानुदास सांगळे | लॉकर क्र. **C-51** |
| ५ | श्री. बाळासाहेब भीमराव बारबोले बारबोले आणि सौ. निर्मला आणि सौ. निर्मला बारबोले | लॉकर क्र. **C-75** |

वर नमूद केल्याप्रमाणे, वरील लॉकर / खातेधारकांच्या नावावर बँकेत लॉकर असून, सदर लॉकर अनेक वर्षांपासून इनऑपरेटिव्ह (वापरात नसलेले) आहेत आणि त्यांची भाडे फी सदर लॉकर / खातेधारकांनी अनेक वर्षांपासून भरलेली नाही. बँकेने वारंवार नोटीस पाठवून सदर लॉकरच्या थकीत भाड्याची मागणी केली आहे. तथापि, संबंधितांनी लॉकर भाड्याची थकबाकी भरलेली नाही. त्यामुळे बँकेचे लॉकर विनाकारण अडकून पडलेले आहेत. त्यामुळे, सदर लॉकर तोडून व उघडून, त्यातील वस्तू जप्त करून आणि त्यांचा लिलाव करून थकीत रक्कम वसूल करण्याचा निर्णय बँकेने घेतला आहे आणि त्याला भारतीय स्टेट बँक, आर. बी. ओ. (**R.B.O.**) सोलापूर यांनी मंजुरी दिली आहे.

या जाहीर सूचनेद्वारे संबंधितांना सूचित करण्यात येते की, ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत त्यांनी बँकेत येऊन सदर लॉकरची थकीत रक्कम बँकेला भरावी. अन्यथा, विहित मुदतीत संबंधित लॉकरधारक / खातेधारक किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी रक्कम न भरल्यास, बँक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर लॉकर तोडेल/फोडेल आणि त्यातील वस्तू जप्त करून व जप्त केलेल्या वस्तूंचा लिलाव करून लॉकरची थकबाकी वसूल करेल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

दिनांकः २५/२/२०२६
ठिकाणः बार्शी भारतीय स्टेट बँक (**SBI**), बार्शी शाखा
शाखा व्यवस्थापक
तालुका - बार्शी, जिल्हा - सोलापूर.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व उत्तर सोलापूर येथील रहिवाशांना कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे नान्नज येथील हंगामी बागायत शेतजमीनीचे गट नं. ५०५ याचे एकूण क्षेत्र हे १, आर ४८, आकार रु. १ पैसे १२ इतकी हंगामी बागायत शेतजमीन इतकी मिळकत असुन, याचे चतुःसिमा
**खालीलप्रमाणे:-**
पूर्वेस - सदर गट नंबर ५०५ पैकी जगन्नाथ चांगदेव शिंदे यांची जमीन, पश्चिमेस - गट नंबर ५०६ व ५०७, दक्षिणेस - गट नंबर ५०४, उत्तरेस- गट नंबर ५००

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली जिरायत शेतजमीन मिळकत ही श्री. सुनिल कृष्णाजी पत्की राः घर नंबर अे १०/१, सनसिटी, दमाणी नगर, जाम मिल कंपाउंड, सोलापूर यांचे मालकीच असून त्यांनी आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबूल करुन आमचे अशिलाकडून इसारा म्हणून काही रक्कम स्विकारुन वर नमूद मालकांनी आमचे अशिलास घरजागेचे इसारा पावती करारपत्र लिहून दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री वर नमूद मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे.

३) तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर कलम १ मधील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकाराने हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, खरेदी विक्री, पोटगी, साठेखत, गहाणखत, वित्तीय संस्थेचा बोजा वगैरे स्वरुपाचा कोणत्याही प्रकाराने हक्क व हितसंबध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत आमचे खालील पत्त्यावर नोंदवावी. जर सदर मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत न आल्यास किंवा कोणाची असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले असे समजून आमचे अशिल सदर वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे. असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकाराने तक्रार चालणार नाही कळावे.

ही जाहीर नोटीस दिली ता. २६/०२/२०२६.

सही/-
**ॲड. सागर एस. बासुतकर**
रा. १६१४, कुचन नगर,
दाजी पेठ, सोलापूर.
मो.नं. ७५०७५४७५६७

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर, कुमठा नाका, उजनी वसाहत, सोलापूर-४१३ ००३.**
Email: eemdsolapurgmail.com दुरध्वनी क्रमांकः (०२१७) २९९०७१४

**ई-निविदा सूचना क्रमांक २८ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत, सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये (जी एस टी व बिमा वगळून) |
|---|---|---|---|
| १. | सिना-माढा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ व टप्पा क्र. २ येथील पंपाचे वार्षिक परिचलन व किरकोळ दुरुस्ती कामे (सन २०२५-२०२६, २०२६-२०२७, २०२७-२०२८) करिता | सोलापूर | रु ९५,१४,६७२/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक ०५/०३/२०२६ (सकाळी ११ पासून) ते दिनांक १३/०३/२०२६ (सायं ६.०० वाजता पर्यंत
**ई-निविदा उघडण्याचा :-** दिनांक १६/०३/२०२६ (सकाळी १२ वाजता)

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.**

**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**
http://mahatenders.gov.in. (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर. / लेखा-२/निविदा/४९२/सन २०२६.
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांचे कार्यालय
दिनांक : २०/२/२०२६.

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापूर**

**विमाका/पुणे/जाहि./३३७/२०२५-२६**



# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### भारतीय कर्णबधिर संघाने जिंकला आशिया चषक

**कटक** : येथील बाराबती स्टेडियमवर झालेल्या एडीसीए टीआय आशिया चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीत बुधवारी भारताच्या कर्णबधिर संघाने श्रीलंकेच्या कर्णबधिर संघावर ६ गड्यांनी विजय नोंदवून पहिला आशिया चषक जिंकला. या मालिकेत भारताने आश्चर्यकारक कामगिरी केली. भारताने श्रीलंकेविरुद्धचा पहिला सामना ४ गड्यांनी जिंकला, त्यानंतर दुसऱ्या सामन्यात नेपाळविरुद्ध १० गड्यानी विजय मिळवला आणि तिसऱ्या सामन्यात श्रीलंकेने नेपाळविरुद्ध ६ गड्यांनी विजय मिळवला. उलट सामन्यात, श्रीलंकेने पुन्हा नेपाळविरुद्ध १५७ धावांनी विजय मिळवला, त्यानंतर भारताने श्रीलंकेविरुद्ध १ धावांनी आणि नेपाळविरुद्ध ९ गड्यांनी विजय मिळवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. भारताच्या साई आकाशला प्रभावी अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

### राष्ट्रीय नेमबाजी पंच अभ्यासक्रमाला प्रतिसाद

**नवी दिल्ली** : बुधवारी येथील करणी सिंग शूटिंग रेंज येथे पार पडलेल्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या राष्ट्रीय नेमबाजी पंच अभ्यासक्रमात ४७ जणांनी भाग घेतला. २१ फेब्रुवारी रोजी सुरू झालेला हा अभ्यासक्रम द नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय) च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. पाच दिवसांच्या या अभ्यासक्रमात सहभागींना आयएसएसएफ नियम, रेंज मॅनेजमेंट, स्कोअरिंग प्रोटोकॉल आणि नैतिक निर्णय पद्धतींमध्ये आवश्यक कौशल्ये देण्यात आली. ही विक्रमी तुकडी भारतीय नेमबाजी खेळांमध्ये निष्पक्षता आणि उत्कृष्टता सुनिश्चित करणाऱ्या कुशल पंचांची एक मजबूत फळी तयार करण्यासाठी एनआरएआयची वचनबद्धता अधोरेखित करते. आजची त्यांची समर्पण भारताच्या जागतिक स्तरावरील यशाचा मार्ग मोकळा करते, असे एनआरएआयचे सरचिटणीस पवनकुमार सिंग यांनी म्हटले आहे. या धर्तीवर एनआरएआय पुढील महिन्यात प्रतिष्ठित आयएसएसएफ बी पंच अभ्यासक्रमाचे आयोजन करणार आहे.

### पारस डोग्राला ५० टक्के दंड, अनिशला दोन डिमेरिट गुण

**हुबळी** : बुधवारी केएससीए मैदानावर रणजी करंडकाच्या अंतिम सामन्यात दुसऱ्या दिवसाच्या खेळादरम्यान कर्नाटकचा पर्यायी क्षेत्ररक्षक के.व्ही. अनिशला डोके वर काढल्याबद्दल जम्मू आणि काश्मीरचा कर्णधार पारस डोग्राला त्याच्या सामना शुल्काच्या ५० टक्के दंड आणि दोन डिमेरिट गुण देण्यात आले आहेत. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, दुसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर लगेचच डोग्राला त्याच्या सामना शुल्काच्या ५० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. याशिवाय पुरुषांच्या बहु-दिवसीय सामन्यांसाठी खेळण्याच्या परिस्थितीनुसार, डोग्राच्या शिस्तबद्ध रेकॉर्डमध्ये दोन डिमेरिट पॉइंट्स जोडले गेले आहेत. जम्मू आणि काश्मीरच्या पहिल्या डावाच्या १०१ व्या षटकांत ही घटना घडली, जेव्हा डोग्रा आणि कन्हैया वाधवान यांनी सुरुवातीच्या अडचणींनंतर डाव सावरण्याचा प्रयत्न केला. प्रसिद्ध कृष्णाचा चेंडू सीमारेषेवर आदळल्यानंतर काही वेळातच, डोग्राने अनिशशी वाद घातला.

# भारताला झिम्बाब्वेविरुद्ध विजयच हवा

**चेन्नई, २५ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत गट १ मध्ये गुरुवारी चेन्नईतील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर गत विजेता भारत आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान महत्त्वपूर्ण सुपर ८ सामना होणार आहे.

सध्या गट १ मध्ये वेस्ट इंडीज व दक्षिण आफ्रिकाने प्रत्येकी एक सामना जिंकून प्रत्येकी २ गुणांसह पहिल्या दोन क्रमांकावर स्थान मिळविले आहे. भारत व झिम्बाब्वेने आपला पहिला सुपर एट सामना गमावला असून ते दोघेही शून्यासह अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी झालेल्या पराभवातून सावरण्यासाठी व आपला नेट रन रेट (-३.८०) सुधारण्यासाठी गतविजेत्या संघाला मोठ्या विजयाची आवश्यकता आहे.



सूर्यकुमार यादव



सिकंदर रझा

फलंदाजांच्या अव्वल फळीतील समस्या, विशेषतः सलामीच्या व तिसऱ्या क्रमांकाच्या स्थानांवर भारताचा प्रमुख धोका असल्याने चिंतेचा विषय आहे.

मोठ्या पराभवानंतर अव्वल फळीतील कमकुवतपणा व दबावामुळे दबलेल्या गतविजेत्या संघाला गुरुवारी टी-२० विश्वचषकातील आपल्या दुसऱ्या सुपर एट सामन्यात झिम्बाब्वेविरुद्ध सामना करताना आपली शक्य तितकी सर्व शक्ती पणाला लावण्याची आवश्यकता असेल.

रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांनी झालेल्या पराभवानंतर भारताचा नेट रन रेट -३.८० असा आहे, त्यामुळे आयसीसीच्या या स्पर्धेत भारताचे अस्तित्व मोठ्या फरकाने टिकून राहणे महत्त्वाचे आहे, पण त्यासाठी भारताला सलामीवीर व तिसऱ्या क्रमांकाच्या जागेभोवतीच्या समस्या सोडवण्याची गरज आहे.

या विश्वचषकात, विद्यमान विजेत्या संघाने दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर द्विपक्षीय आव्हानांना तोंड देण्यासाठी ईशान किशन व अभिषेक शर्माच्या उत्कृष्ट कामगिरीवर भर दिला. पण पोटाच्या संसर्गानंतर अभिषेकचा फलंदाजीतील फॉर्म गेला तसेच डावखुऱ्या फलंदाजाची आक्रमक शक्ती कमी झाली आहे असे दिसते.

(वृत्तसंस्था)

### आजचे सुपर एट सामने

**दक्षिण आफ्रिका वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत वि. झिम्बाब्वे**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडीज उपांत्य फेरीत प्रवेश करण्यास उत्सुक



एडन मार्करास

**अहमदाबाद, २५ फेब्रुवारी**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकच्या सुपर ८ फेरीत गुरुवारी येथे दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. या महत्त्वाच्या सामन्यात दोन्ही संघ अनुक्रमे झिम्बाब्वे आणि भारताविरुद्धचे सामने जिंकल्यानंतर उपांत्य फेरीत लवकर स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करतील.

मुंबईत वेस्ट इंडीजने झिम्बाब्वेचा १०७ धावांनी पराभव केला, तर अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिका संघाने भारताविरुद्ध ७६ धावांनी विजय मिळवला.



शाय होप

या दोन्ही निकालांचा अंतिम क्रमवारीवर गंभीर परिणाम होऊ शकतो, कारण भारत आणि झिम्बाब्वे दोघांनाही आता चांगले सामना खेळायचे आहे. संदर्भ अगदी सरळ आहे, जर दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडीजला हरवले आणि भारताने त्याच दिवशी रात्री झिम्बाब्वेला हरवले, तर गट १ मधील पुढील फेरीच्या सामन्यांमध्ये भारत व वेस्ट इंडीज यांच्यात उपांत्यपूर्व फेरीसारखा सामना होईल.

तथापि, जर वेस्ट इंडीजने दक्षिण आफ्रिकेच्या आव्हानावर मात केली, तर झिम्बाब्वेने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध उलटफेर न केल्यास त्यांचे पुढील दोन सामने कसेही झाले तरी त्यांचा संघ बाद होऊ शकतो. कारण सूर्यकुमार यादवचा संघ वेस्ट इंडीज आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांविरुद्ध नेट रन रेटमध्ये खूपच मागे आहे.

(वृत्तसंस्था)

# भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय हॉकीपटू

**प्रो-लीग हॉकी**

**होबार्ट, २५ फेब्रुवारी**

भारतीय हॉकी संघाने बुधवारी २०२५-२६ च्या एफआयएच प्रो-लीग होबार्ट लेगच्या शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियावर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये विजय मिळवून बोनस पॉइंट मिळवला.

नियमित वेळेत १-१ अशी बरोबरी साधल्यानंतर, आठ सामन्यांनंतर गोलरक्षक मोहित एच. एस.च्या धाडसी खेळामुळे भारताने पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये विजय मिळवला.

होबार्ट लेगमधील भारताची कामगिरी अशी राहिली. भारताने स्पेनकडून ०-२ असा पराभव, ऑस्ट्रेलियाकडून २-२ असा पराभव शूटआऊटमध्ये ४-५ असा पराभव, स्पेनसोबत बरोबरी १-१ व नंतर शूटआऊटमध्ये ३-४ असा पराभव पत्करला. भारताने अखेरच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियासोबत १-१ बरोबरी मिळविल्यानंतर पेनॉल्टी शूटआऊटमध्ये ३-१ असा विजय मिळविला.

२०२५-२६ च्या एफआयएच प्रो-लीग हंगामातील पहिला विजय नोंदवण्यासाठी भारताला इतका वेळ लागला. हा एक कठीण प्रवास होता आणि विजयासाठी मोहित एच.एस.चे आभार मानावेत. होबार्ट लेगसाठी निवडण्यात आलेल्या गोलरक्षकाने स्वतःची चांगली कामगिरी केली आहे. या कामगिरीमुळे त्याला कृष्ण बहादूर फाटक यांच्यानंतर संघाचा दुसरा पसंतीचा गोलरक्षक म्हणून विद्यमान खेळाडूंपेक्षा पुढे जाण्यास मदत होईल, असे भारतीय हॉकी संघ व्यवस्थापनाने म्हटले आहे.

हार्दिक सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पुढील स्पर्धेत १४ जून रोजी युरोपियन लेग मध्ये खेळणार आहे. (वृत्तसंस्था)

# पुण्याचा मानस धामणे उपांत्यपूर्व फेरीत

**महाओपन एटीपी चॅलेंजर ७५ टेनिस**

**पुणे, २५ फेब्रुवारी**

म्हाळुंगे बालेवाडी टेनिस स्टेडियमवरील शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या महाओपन एटीपी चॅलेंजर ७५ पुरुष टेनिस स्पर्धेत बुधवारी पुरुष एकेरीत आपला उत्कृष्ट फॉर्म कायम राखत पुण्याचा स्टार खेळाडू मानस धामणेने प्रतिस्पर्ध्यावर विजय नोंदविला व उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. बिगरमानांकित खेळाडू क्रोएशियाचा दुजे अजडुकोविया, ग्रेट ब्रिटनचा ॲलिस्टर ग्रे आणि सहावा मानांकित इटलीचा फेडेरिको सिना या अन्य टेनिसपटूंनी शेवटच्या आठ टप्प्यात स्थान मिळवले.

वाइल्डकार्डधारी मानस धामणेने इल्या इवाश्काला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करताना घरच्या प्रेक्षकांना रोमांचित केले. दुर्दैवाने, तो ३-६ ने पिछाडीवर असताना निवृत्त झाला. धामणे आत्मविश्वासू आणि संयमी दिसत होता, बेलारूसच्या इल्याला दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली. मानस आता शुक्रवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व लढतीत क्रोएशियाच्या दुजे अजडुकोविचशी भिडणार आहे. बिगरमानांकित दुजे अजडुकोविचने पोर्तुगालच्या फ्रेडरिको फेरेरा सिल्वाला ६-२, ६-२ असे पराभूत केले. (वृत्तसंस्था)

# जम्मू-काश्मीरचा ६ बाद ५२७ धावांचा डोंगर

**रणजी करंडक क्रिकेट**

**हुबळी, २५ फेब्रुवारी**

हुबळी क्रिकेट मैदानावर बुधवारी आठ वेळा विजेत्या कर्नाटकविरुद्धच्या रणजी करंडक अंतिम सामन्यात दुसऱ्या दिवशी वाईट प्रकाश व खऱ्याखुऱ्या पावसमुळे खेळ थांबेपर्यंत जम्मू-काश्मीरने धावांचा पाऊस पाडला आणि पहिल्या डावांत ६ बाद ५२७ धावांचा डोंगर उभा केला.

कालचा नाबाद शतकवीर शुभम पुंडिर व अब्दुल सामदने जम्मू-काश्मीरच्या २ बाद २८४ धावांवरून पुढे खेळण्यास मैदानावर आले आणि स्वैर फलंदाजी करू लागले. मात्र शुभम पुंडिर पाटीलच्या गोलंदाजीला बळी पडला. पुंडिरने २४७ चेंडूंचा सामना करत १२ चौकार व २ षट्कारांसह १२१ धावांची खेळी केली. पुंडिर व सामदने जम्मू-काश्मीरला तिनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. नंतर सामदही प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीला बळी पडला. अब्दुल सामदने १०४ चेंडूंत ८ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ६१ धावांची खेळी केली.



पारस डोग्रा



साहील लोटरा

पुढे कन्हैया वाधवान व कर्णधार पारस डोग्रानेही जम्मू-काश्मीरच्या धावसंख्येत भर घातली. डोग्राने स्ट्राईक चांगल्या प्रकारे रोटेट करून आपल्या संघाची धावसंख्या वाढविली. वाधवान शिखर शेट्टीच्या गोलंदाजीत राहुलकडून झेलबाद झाला. वाधवानने १०९ चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने ७० धावा केल्या. ४१ वर्षीय डोग्राने १५० चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. श्रेयस गोपालच्या फिरकीवर त्रिफळाचीत होण्यापूर्वी पारस डोग्राने ८ चौकारांसह ७० धावांची खेळी केली.

वाईट प्रकाश व पावसामुळे खेळ थांबेपर्यंत साहील लोटरा व अबिद मुश्ताकने नाबाद खेळी करीत जम्मू-काश्मीरला १५६ षटकांत ६ बाद ५२७ धावांवर पोहोचवले. साहीलने ९३ चेंडूंत ७ चौकारांसह नाबाद ५७ धावाची, तर अबिद मुश्ताकने ३१ चेंडूंत २ चौकारांसह नाबाद २० धावांची खेळी केली.

कर्नाटककडून प्रसिध कृष्णाने ३ बळी, तर विद्याधर पाटील, श्रेयस गोपाल व शिखर शेट्टीने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)





# जिंकू किंवा मरू

टी २० विश्वचषक स्पर्धा सुरू झाली तेव्हा आपल्या संघावर ही वेळ कधी येईल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण असं झालं खरं. म्हणतात ना क्रिकेट इज अ फनी गेम. या स्पर्धेत ते सिद्ध झालं. अव्वल आठ चा पहिला सामना आपण हरलो,अगदी चारी मुंड्या चीत! झिंबाब्वे, वेस्ट इंडीज यांचा अव्वल आठ मध्ये आरामात प्रवेश. ऑसीज पहिल्या फेरीतच स्पर्धेबाहेर. या स्पर्धेत असे बरेच उलट फेर बघायला मिळाले. दक्षिण आफ्रिकेने आपला पराभव केला, याला मी उलटफेर म्हणणार नाही,कारण दोन्ही संघ तुल्यबळ आहेत. १८७ धावांचा पाठलाग करताना आपण पाच दहा धावांनी हरलो असतो तर मग पराभव थोडा मान्य करण्याजोगा वाटला असता. पण आपला जो लाजिरवाणा पराभव झाला तो धक्कादायकच होता. त्यामुळे काय झालं की,नेट रन रेट,जर तर ची समीकरणं यांचा आपल्याला गांभीर्याने विचार करावा लागत आहे.

असो अजूनही सर्व काही संपलेलं आहे असं नाही. आता आपले उरलेले दोन सामने आज झिंबाब्वे बरोबर आणि १ मार्चला वेस्ट इंडीज बरोबर आहेत. हे दोन्ही सामने जिंकावेच लागतील.आपला संघ जर अति आत्मविश्वासातून बाहेर आला असेल, तर हे दोन्ही सामने आपण का जिंकू शकणार नाही? नक्कीच जिंकू.

ज्या आक्रमक फलंदाजीच्या आपण फुशारक्या मारत होतो, ती फलंदाजी सपशेल नापास झाली आहे हे आपण लवकरात लवकर स्विकारून फलंदाजीच्या रणनीती मध्ये सुधारणा करायला हवी. सुधारणा करायची म्हणजे अगदी सावध पवित्रा घ्यायचा असं मुळीच नाही. पण आक्रमण सुनियोजित हवं. खरं तर टी २० हे प्रारुपच वेड्या वाकड्या फटक्यांचं आहे. मॅडनेस.... पण मेथड इन मॅडनेस, मॅडनेस असा हवा.

पहिल्या पॉवर प्ले मध्ये फक्त दोन खेळाडू सीमारेषेवर असतात त्याचा फायदा घेण्यासाठी उत्तुंग फटके मारावेच लागतील. पहिल्या सहा ओव्हर हल्ला, सहा ते पंधरा ओव्हर स्थैर्य, पंधरा ते वीस ओव्हर फूट ऑन ॲक्सिलरेटर. ही झाली सर्वमान्य स्ट्रॅटेजी. पण हे सदा सर्वकाळ चालत नाही. खेळपट्टीचं स्वरूप, सामने आता दिवसरात्र असणार आहेत त्यामुळे ड्यू फॅक्टर, प्रतिस्पर्धी संघाचे गोलंदाज, त्यांची बलस्थानं आणि कच्चे दुवे. सगळ्यात महत्वाचं म्हणजे पहिली फलंदाजी असेल तर त्या खेळपट्टीवरच्या पार स्कोअरचा अचूक अंदाज एवढे सगळे फॅक्टर विचारात घ्यावे लागतात! टीव्ही समोर बसून सामना बघताना आपण इमोशनल असतो, नियोजन आणि अंमलबजावणी यात थोडंफार इकडं तिकडं झालं की आपण टीकास्त्र सोडतो. खात्रीने सांगता येईल आपले सगळे खेळाडू यात पारंगत आहेत. गौतम गंभीर हा या प्रारुपातला उत्कृष्ट प्रशिक्षक आहे यात संदेह असण्याचं कारण नाही. सो नथिंग टू वरी, जस्ट चिल!

आता सुपर एट च्या राहिलेल्या सामन्यांचा विचार केला तर आघाडीची फळी विशेषतः अभिषेक वर प्रश्नचिन्ह नक्कीच आहे. संजू सॅमसनला एक संधी मिळते का बघावं लागेल. अर्थातच त्यासाठी तिलक वर्माची जागा धोक्यात येऊ शकते. अभिषेकसाठी आणखी एक संधी, कदाचित या स्पर्धेतील शेवटची संधी असू शकेल आणि त्या संधीचा लाभ तो नक्कीच उठवणार. फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांच्या सामन्यापूर्वीच्या प्रेस कॉन्फरन्स प्रमाणे.. रिडिंग बिटवीन द लाईन्स.. आज झिंबाब्वे विरुद्ध खेळताना आघाडीच्या फळीत संजू सॅमसन दिसू शकेल, वॉशिंग्टन सुंदर च्या जागी अक्षर पटेल असेल. खरंतर कुलदीप अकरा मध्ये हवा पण शक्यता कमी वाटते. आठव्या क्रमांका पर्यंत फलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू असणार, दहावा वरुण अकरावा बुमराह असणारच. खेळपट्टी फिरकीला साथ देणारी असेल तर नवव्या क्रमांकावर कुलदीप, खेळपट्टी जलदगतीला साथ देणारी असेल तर अर्शदीप. रिंकू आज संघात सामील होत आहे तो अकरा मध्ये असेल. पुढचे दोन सामने तुलनेने कमी अवघड आहेत. खरी परिक्षा पुढेच आहे. दुसऱ्या गृप मध्ये इंग्लंडने सेमी फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला आहे. दुसरा संघ बहुतेक न्युझीलंड असेल. अंतिम सामना पुन्हा एकदा भारत दक्षिण आफ्रिका यांच्यात पडू शकेल!

तूर्त विजयी भव टीम इंडिया!

रेकॉर्ड बनाना है, रेकॉर्ड तोडना है!....

**- मुकुंद कुलकर्णी**
**दूरभाष ९४२१४५४८८८**

# रेल्वेसह १४ कबड्डी संघांचा विजय



राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत हरयाणा व आंध्र प्रदेश दरम्यानच्या सामन्यातील एक उत्कंठावर्धक क्षण

**७२ वी वरिष्ठ राष्ट्रीय पुरुष कबड्डी**

**वडोदरा, २५ फेब्रुवारी**

येथील सामा इनडोअर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ७२ व्या वष्ठि राष्ट्रीय पुरुष कबड्डी स्पर्धेत पहिल्या दिवशी अनेक दमदार खेळाचे प्रदर्शन झाले. अनुभवी खेळाडू आणि उदयोन्मुख प्रतिभांनी आपल्या मोहिमांना दमदार सुरुवात केली. चंदीगडसह १४ संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांवर शानदार विजय नोंदविला.

या स्पर्धेत एकूण २९ संघ सहभागी झाले असून त्यांना आठ गटांमध्ये विभागले आहे. पहिल्या दिवशी गट अ ते एच पर्यंत ८ सामने खेळले गेले. चंदीगड, भारतीय रेल्वे, तामिळनाडू आणि गुजरात संघांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवला.

वैयक्तिक कामगिरीनेही दिवस भरभरून दाखवला. गुजरातच्या मितेश प्रजापतीने २१ गुण मिळवून त्यांच्या संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. विदर्भाचा आदेश वरखडे देखील २८ गुणांच्या प्रभावी प्रयत्नांसह आघाडीवर राहिला, परंतु संघर्षपूर्ण सामन्यात अखेरच्या क्षणी विदर्भाला पराभव पत्करावा लागला.

गट अ मध्ये चंदीगडने संपूर्ण वर्चस्व दाखवत झारखंडवर ७६-३२ असा ४४ गुणांनी विजय मिळवला. गट ब मध्ये गत वर्षीच्या उपविजेत्या भारतीय रेल्वेने ओडिशाचा ७३-२३ असा ५० गुणांनी पराभव केला. नरेंद्र कंडोलाने १६ गुण मिळवले.

पंजाब व गुजरात यांच्यातील गट क सामना अत्यंत चुरशीचा ठरला, गुजरातने पंजाबचा ४६-४४ असा पराभव केला. गट ड मध्ये तामिळनाडूने मणिपूरचा ७५-१६ असा पराभव करून ५९ गुणांचा विजय मिळवला.

उत्तर प्रदेश आणि विदर्भ यांच्यात चुरशीची लढत झाली व यात उत्तर प्रदेशने चार गुणांनी विजय मिळवला. प्रो-कबड्डी लीग (पीकेएल) हंगाम १२ मध्ये तामिळ थलायवाजकडून खेळणारा उत्तरप्रदेशचा कर्णधार अर्जुन देशवालने १५ गुण मिळवले आणि आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

गट ई मध्ये हरयाणाने आंध्र प्रदेशवर ४९-३२ असा विजय मिळवला. गट ई च्या दुसऱ्या सामन्यात जम्मू-काश्मीरने तेलंगणाचा ४३-३४ असा पराभव केला. चुरशीच्या सामन्यात बिहारने केरळवर तीन गुणांनी विजय मिळवला. (वृत्तसंस्था)

# बार्शीतील राडा प्रकरणी आरोपींना २४ तासात जामीन

## पोलिसांच्या कारवाईवर गंभीर प्रश्नचिन्ह; कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न चिघळण्याची शक्यता

### साधी कलमे लावून आरोपींना दिलासा दिल्याचा पोलिसांवर आरोप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२५ फेब्रुवारी**

बार्शी शहरात २२ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान दोन गटांमध्ये झालेल्या गंभीर राडा, दगडफेक व तोडफोड प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींना अवघ्या २४ तासांत जामीन मंजूर झाल्याने संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी विविध तीन गुन्ह्यांत एकूण २९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, त्यातील दोन गुन्ह्यांत शासकीय अधिकारी फिर्यादी आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.



घटनेची तीव्रता लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांनी घटनास्थळी भेट देत कारवाईचे आश्वासन दिले होते. त्यानुसार पाच आरोपींना अटकही करण्यात आली; मात्र न्यायालयात हजर केल्यानंतर त्यांना तात्काळ जामीन मंजूर झाल्याने पोलिसांनी नेमकी कोणती आणि कितपत कडक कलमे लावली, याबाबत गंभीर शंका उपस्थित होत आहेत.

सोशल मीडियावर नेटक-यांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवत पोलिसांवर कमकुवत कलमे लावून आरोपींना सुटकेचा मार्ग मोकळा करून दिला असा आरोप केला आहे. काहींनी तर संबंधित कलमांचे स्क्रीनशॉट जतन करून ठेवण्याचे आवाहन करत भविष्यात याबाबत जाब विचारला जाईल, असा इशाराही दिला आहे. वरिष्ठांची भेट आणि अटक ही केवळ औपचारिकता होती का?, कडक कारवाई का झाली नाही? आरोपींवर कमकुवत कारवाईसाठी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का? पोलिसांनी कोणाच्या सांगण्यावरून आरोपींना वाचवले? अशा प्रश्नांचा भडिमार सोशल मीडियावर सुरू आहे.

#### सोशल मीडियावर नेटकऱ्यांच्या काही निवडक पोस्ट, कमेंट व प्रतिक्रिया

काही नेटक-यांनी तर असेही म्हटले आहे की त्यांना लावलेल्या कलमांची यादी जपून ठेवा म्हणजे भविष्यात आपल्याला गरज पडेल. पोलिसांनी यातील आरोपींवर कडक कारवाई करणे गरजेचे होते. कारवाई शून्य. पोलीस यंत्रणा काहीही कारवाई करत नाही आणि करणारही नाही. आपलेच दात आपलेच ओठ. प्रशासनाने सर्वांना वेड्यात काढले. या घटनां दरम्यान पोलीस ठाण्यात दाखल झालेले विविध तीन गुन्ह्यात महिलेला मारहाण, पोलीस ठाण्यासमोर दोन गटांमध्ये दगडफेक व मारहाण, शासकीय ग्रामीण रुग्णालयात घुसून तोडफोड अशा गंभीर घटना घडल्याचा आरोप असताना आरोपींना तात्काळ जामीन मिळाल्याने कायदा-सुव्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शांततेसाठी ओळखल्या जाणाऱ्या बार्शीत अशा प्रकारच्या घटनांनंतर पोलीस प्रशासनाने अधिक कठोर आणि प्रभावी भूमिका घेणे अपेक्षित होते, परंतु पोलिसांनी तसे केले नाही असे सर्वसामान्य नागरिकांचे मत आहे. विशेष म्हणजे, सोशल मीडियावर व्यक्त होत असलेल्या भावना आणि पोस्टमधील आक्रमक सूर पाहता भविष्यात तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वी राज्यात अनेक ठिकाणी सोशल मीडियावरील पोस्टमुळे गंभीर कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे बार्शीमध्येही परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी पोलिसांनी ठोस, पारदर्शक आणि कडक भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या मते, जर गंभीर स्वरूपाच्या प्रकरणातही आरोपींना सहज जामीन मिळत असेल, तर अशांतता निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींचा आत्मविश्वास वाढण्याचा धोका आहे. यामुळे भविष्यात अशाच घटनांना खतपाणी मिळू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. एकूणच, या संपूर्ण प्रकरणात पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर चहूबाजूंनी टीका होत असलेली दिसून येत आहे. पोलिसांचा निष्काळजीपणा आणि कायद्याचा धाक कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले न उचलणे याबाबत सर्वसामान्य बार्शीकरांमध्ये चिंतेचे व काळजीचे वातावरण निर्माण झाल्याच्या भावना अनेक बार्शीकरांमध्ये चर्चिल्या जात आहेत.

## महत्वाचे...



### काँग्रेस पक्ष संघटना बांधणीसाठी माढा तालुका काँग्रेस कमिटीची बैठक

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज माढा तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक टेंभुर्णी येथे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार यांचे स्वागत माढा तालुकाध्यक्ष संजय पाटील व टेंभुर्णी शहर अध्यक्ष हेमंत देशमुख यांनी केले. बैठकीस माढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संजय पाटील, कुर्डूवाडी शहर अध्यक्ष फिरोज खान, जिल्हा सरचिटणीस जहीर मणेर, जिल्हा मीडिया सेलचे प्रमुख सचिन खैरे-पाटील, अशोक आप्पा पाटील, टेंभुर्णी शहर अध्यक्ष हेमंत देशमुख, विकास माने, राहुल क्षीरसागर, संतोष नवले, गणेश नवले, राहुल देवकर, निलेश गवळी, अमर राकुंडे, जमीर काझी, विकास डोके, दादा लांडगे, किरण पवार, राजू खोचरे उपस्थित होते.



### केशरी कार्ड धारकांना मोफत धान्य द्या; माढा स्वराज्य माहिती अधिकार संघटनेचे निवेदन

**मोडनिंब, दि. २५ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील माढा, कुर्डुवाडी, कुर्डु, मोडनिंब, आलेगाव, आहेरगावसह सर्व गावात रितसर मागणी केलेल्या सर्व केशरी कार्ड धारकांना अन्न सुरक्षा योजने अंतर्गत मोफत धान्याचा पुरवठा करावा अश्या मागणीचे निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटनेच्या वतीने माढाचे तहसीलदार संजय भोसले यांना देण्यात आले. माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, संस्थापक कम लेश शेवाळे, विश्वस्त धनश्री उत्पात यांच्या सूचनेनुसार व जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांच्या आदेशानुसार आणि सर्व विश्वस्त, सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी माढा तहसील कार्यालयात हे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी स्वराज्यचे तालुका कार्याध्यक्ष आनंद क्षीरसागर, तालुका संपर्क प्रमुख अशरफ शेख, माढा शहर अध्यक्ष अप्पासाहेब गवळी, कुर्डुवाडीचे अध्यक्ष सागर भोईटे, शहर समन्वयक अविनाश ननावरे, खोपोली शहर पोलीस मित्र उपाध्यक्ष कैलास मोरे, प्रादुम्न राजुरे उपस्थित होते.



### जळोली जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थीनींचे एनएमएमएस परीक्षेत यश

**करकंब, दि. २५ फेब्रुवारी-**

केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाकडून महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेमार्फत इयत्ता ८वीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये (एनएमएमएस) जि.प.प्रा.शाळा जळोलीच्या इयत्ता ८वीच्या ७ विद्यार्थिनींनी आदर्श शिक्षक नागनाथ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली यश संपादन केले. यामध्ये समृध्दी नरसाळे, पूजा पवार, साक्षी लांडे, सायली शिंदे, अनुजा कोळेकर, दिव्या नवगिरे, ज्ञानेश्वरी नवगिरे या विद्यार्थ्यांनीनी हे घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हनुमंत नरसाळे यांच्या हस्ते मार्गदर्शक शिक्षक गायकवाड व यशस्वी विद्यार्थीनींनींचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थिनींचे मुख्याध्यापक जयवंत कापसे, शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे, नागनाथ गायकवाड, सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळासाहेब खांडेकर, शिक्षिका देवकी कलढोणे (दुधाणे), शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हनुमंत नरसाळे,उपाध्यक्ष साधना किर्ते यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...



### सुधा खिस्ते

**पंढरपुर दि. २५ फेब्रुवारी-**

येथील सुधा बाळकृष्ण खिस्ते (वय ९०) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. पंढरपूरातील फोटोग्राफर सुनिल खिस्ते यांच्या त्या मातोश्री होत.



### रुक्मिणी मिसाळ

**सांगोला,दि.२५ फेब्रुवारी -**

चिणके (ता.सांगोला) येथील रुक्मिणी विठ्ठल मिसाळ (वय- ९०) यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



### भीमराव गोतसुर्वे

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

येथील भीमराव शेकाप्पा गोतसुर्वे (वय-८३) यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्यावर बुधवारी सायंकाळी मोदी येथील स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार शेखर गोतसुर्वे यांचे ते वडील होत.



### बसवेश्वर महाजन

**सांगोला,दि.२५ फेब्रुवारी -**

महूद (ता.सांगोला) येथील व्यावसायिक बसवेश्वर पांडुरंग महाजन (वय-९०) यांचे हृदयविकाराच्या धक्याने मंगळवारी निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## पोक्सो गुन्ह्याचा आरोप असलेल्या आरोपीचा जामीन मंजूर




**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२५ फेब्रुवारी**

बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर १२/२०२६ नुसार आरोपी शुभम संदीप निकाळजे रा.बार्शी याच्यावर फिर्यादीच्या डोक्यात हाताने मारुन,शिविगाळ केलेप्रकरणी फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्ये केल्याने आरोपीवर बीएनएस कलम ७४, ७९, ११५(२), ३५१(२), ३५१(३),३५२ व पोक्सो कलम १२ प्रमाणे गुन्हा दाखल होता.सदर संशयित आरोपीच्यावतीने बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीशश्री. व्ही.के. मांडे यांच्या न्यायालयात अॅड. विवेक गजशिव यांच्यावतीने जामीन अर्ज दाखल केला होता. यावेळी आरोपीचे वकील यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश व्ही.के.मांडे यांनी वर नमूद आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला.यावेळी आरोपींच्यावतीने अॅड. विवेक गजशिव, अॅड. श्रीराम काशीद, अनुराग मेटकरी यांनी काम पाहिले.

## भक्त निवास येथे ७० भाविकांचे गुरूलीलामृत पारायण

### गिरनार दत्तभक्त परिवारकडून प्रथमेश इंगळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२५ फेब्रुबारी**

कोल्हापूर येथील श्री स्वामी समर्थ मनमंदिर सेवा केंद्र प्रणित गिरनार दत्तभक्त परिवारातील ७० भाविकांनी येथील श्री.वटवृक्ष स्वामी देवस्थानच्या भक्त निवास हॉलमध्ये गुरूलीलामृत पारायण सोहळा संपन्न झाला.

मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गिरनार दत्तभक्त परिवाराचे हे उपक्रम मोठ्या भक्ती भावात पार पडले. यावेळी गिरनार दत्तभक्त परिवार कडून प्रथमेश इंगळे यांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार



करण्यात आला. या एक दिवसीय पारायण सोहळ्यात पुरूष व महिला मिळून एकूण ७० भाविक सहभागी झाले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ मनमंदिर सेवा केंद्रचे संस्थापक अध्यक्ष संतोष सुभाष गोसावी माऊली, सेवा केंद्राचे सदस्य महेश पाटील, सचिन चव्हाण, संजय कोळी, अरुण गवळी, समर्थ गोसावी, संजय ठाणेकर, सतीश मोरे, सर्जेराव बर्गे, महादेव पाटील, भरत सुतार, रोहिणी ठाणेकर, पूजा जाधव, मेघा पुणेकर, सोनाली गवळी, वंदना कोळी, जयश्री गोसावी, भाग्यश्री पाटील, मनीषा मडवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक भाविकानी पारायण सेवा श्री स्वामी समर्थांच्या चरणी अर्पण केली. यावेळी बोलताना मनमंदिर सेवा केंद्रचे संस्थापक अध्यक्ष संतोष सुभाष गोसावी यांनी श्री स्वामी समर्थांच्या पावन वास्तव्य भुमीत पारायण सेवा करण्याचे फळ म्हणजे सुखी, समाधानी जीवनाची गुरुकिल्ली आहे. शाश्वत समाधान प्राप्त करून घेण्याचा हा थोर मार्ग आहे. तो भाविकांच्या जीवनात प्राप्त व्हावा हा उद्देश या पारायण सेवेच्या मागे आहे. श्री स्वामी समर्थ सर्वांचे कल्याण करतीलच, मंदीर समितीने आम्हाला येथे पारायण सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल समितीचे प्रमुख महेश इंगळे यांचे विशेष आभार मानत असल्याचे मनोगत व्यक्त केले.

## नेवरे जिल्हा परिषद शाळेस अव्वल मानांकन प्राप्त



### माळशिरस तालुक्यात मानांकन मिळवणारी एकमेव शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२५ फेब्रुवारी-**

नेवरे (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद शाळेस गुणवत्तेच्या आधारावर अव्वल मानांकन प्राप्त झाले आहे अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक नाथसिंह देशमुख यांनी दिली.

अधिक माहिती देताना देशमुख म्हणाले की, नेवरे शाळेने शासनाच्या वतीने राज्यातील सर्व शाळांचे मुल्यमापन होत असते यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांची व्यावसायिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा विकास, शाळा व्यवस्थापन व नेतृत्व, पायाभूत सुविधा व सुरक्षितता, पालक व समुदाय सहभाग व शैक्षणिक गुणवत्ता या बाबींच्या निकषावर मुल्यमापन ठरवले जाते. राज्यातील १ लाख २ हजार ६७५ शाळा पैकी ४२९ शाळांना ए + म ानांकन मिळाले. तर माळशिरस तालुक्यातील नेवरे ही एकमेव शाळा मुल्यांकनास प्राप्त ठरली आहे. एकूणच सर्व शिक्षक व ग्रामस्थांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. शाळेच्या या यशाबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी अस्लम इनामदार यांनी कौतुक करून अभिनंदन केले. याप्रसंगी केंद्रप्रमुख दिनकर दळवी, अमर गोसावी, संजय जाधव, जामोद खोत, विजयकुमार हजारे, उत्तम कुदळे, अमोल सोपनर, तुकाराम कचरे, निदेशक सचिन कारंडे, सचिन जाधव, अमोल कदम, शाळा समिती अध्यक्ष दयानंद पाटील, उपाध्यक्ष जोतीराम बोबडे उपस्थित होते.




## महाराष्ट्र विद्यालय बार्शीचे एनएमएमएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

एनएमएमएस परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, महाराष्ट्र विद्यालय बार्शी या विद्यालयातून २४६ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी १८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. १०० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८५ इतकी आहे आणि आदित्य दिपक म्हेत्रे हा विद्यार्थी १५३ गुण मिळवून विद्यालयातून प्रथम आलेला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सचिन देशमुख, सुरेश डिसले, संग्राम देशमुख व सुजित लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य अरुण देबडवार, खजिनदार जे.सी. शितोळे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी.साठे, पर्यवेक्षक के.जी.मदने यांनी अभिनंदन केले.

## कर्नाटक सरकारची मुजोरी सुरूच; उजनीच्या पाण्याशिवाय पाणी सोडणार नसल्याची भूमिका

### 'दक्षिण'च्या शेतकऱ्यांचा उमराणी बंधाऱ्यावर गोंधळ

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि.२५ फेब्रुवारी-**

भीमा नदीतील पाणी संपल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडले. मात्र महाराष्ट्र कर्नाटक सीमेच्या हद्दीवर असणाऱ्या उमराणी बंधाऱ्यांत कर्नाटक सरकारने मोठ्या प्रमाणात पाणी अडवल्यामुळे सादेपूर, लवंगी, कारकल, औज, कुरघोट, टाकळी व बरूर यासह अनेक गावातील शेतकऱ्यांना पाणीटंचाई जाणवत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी भीमा नदीत पाणी सोडण्यासाठी आजी व माजी आमदारांकडे निवेदन देत पाणी सोडण्याची मागणी केली. कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून उमराणी बंधाऱ्यातील पाणी न सोडता पाण्यावर



अधिकार गाजवित असल्यामुळे त्यांची मुजोरी सुरूच असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. याबाबत मंगळवारी रात्री शेतकऱ्यांनी उमराणी बंधाऱ्यांवर जाऊन पाणी सोडण्यासाठी गोंधळ घातला. याकडे दुर्लक्ष करीत कर्नाटकचे अधिकारी पाणी खाली सोडण्यास तयार नाहीत. याउलट पाणी सोडण्यासाठी शेतकऱ्यांकडून जबरदस्ती होऊ नये, म्हणून बंधाऱ्यांवर जीपीआरएस सुरू केल्याचे दिसून येते. उजनीचे पाणी उमराणी बंधाऱ्यात आल्यावरच पाणी सोडणार असल्याचे आडमुठे धोरण कर्नाटकने स्वीकारले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

एक महिन्यापासून दक्षिण सोलापूर तालुक्यातील भीमा नदी परिसरात पाणी नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी पाणी सोडण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा केला. त्यानुसार उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले आहे. मात्र यापूर्वी सोडण्यात आलेले पाणी कर्नाटक सरकारच्या उमराणी बंधाऱ्यांत अडविण्यात आल्यामुळे दक्षिणच्या शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळत नाही. त्यामुळे दक्षिण मधील दहा ते पंधरा गावामधील शेतकरी व नागरीकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. याबाबत लोकप्रतिनिधीनी कर्नाटक सरकारवर दबाव आणणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. मंगळवारी रात्री दक्षिण मधील शेतकऱ्यांनी उमराणी बंधाऱ्यावर जाऊन खाली पाणी सोडण्याची विनंती केली. यावेळी कर्नाटक सरकारकडून पाणी सोडणार नसल्याचे स्पष्टपणे सांगण्यात आले. त्यामुळे कर्नाटक सरकारच्या आडमुठे धोरणामुळे दक्षिण मधील शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. एकीकडे उमराणी बंधारा पाण्याने भरला असताना दुसरीकडे बंधाऱ्याखालील नदीपात्र मात्र कोरडे पडल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी कर्नाटक सरकारवर दबाव टाकण्याची मागणी होत आहे .

#### कर्नाटकचे आडमुठे धोरण

महाराष्ट्र सरकारने दक्षिणच्या शेतकरी व पाणीपुरवठ्यासाठी सोडलेले पाणी कर्नाटकने उमराणी बंधाऱ्यांत अडविले आहे. यामुळे बंधाऱ्याखालील दहा ते पंधरा गावातील शेतकरी व नागरिकांना पाणीटंचाई सहन करावे लागत आहे. कर्नाटकचे हूकूमशाही धोरण शेतकऱ्यांसाठी ऊन्हाळ्यात घातक ठरू शकते.

**- रायप्पा बने, शेतकरी, औज(मं.), दक्षिण सोलापूर**

## महत्वाचे...



सोलापूर : सोलापूर इंडस्ट्रीज को ऑफ इस्टेट सोसायटी रोड येथे औद्योगिक विकास महाराष्ट्र शासन टॉवेल व डाळिंब महानिर्यात कार्यशाळा झाली. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

### पंढरीतील सहेर तांबोळी हिचा पहिला रोजा

**पंढरपूर, दि. २५ फेब्रुवारी -**



येथील अकबर अनिल येथे राहणारी ६ वर्षाची चिमुकली सहेर सरफराज तांबोळी हिने पहिला रोजा केला होता. तिचे कौतुक होत आहे. मुस्लीम समाजात रमजान महिन्यात १ नेकी केल्याने ६० नेकी केल्याचे श्रेय मिळत असते. उन्हाळा असतानाही या लहान मुलीने रोजा केला आहे. सहेर तांबोळी हिने सईद मौलाना यांच्या उपस्थितीत मक्का मशीद येथे इफ्तार करुन रोजाचा सोडला आहे. याबद्दल तिचे विशेष कौतुक होत आहे.



### हर्षवर्धन सपकाळ यांच्या निषेधार्थ मूक निदर्शने

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी क्रूरकर्मा टिपू सुलतान याची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना केल्याच्या निषेधार्थ हिंदु जनजागृती समितीच्या वतीने बुधवारी सोलापूरात मूक निदर्शने करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्त्रीसन्मानाचे रक्षक आणि प्रशासनाचे आदर्श प्रतीक आहेत. याउलट इतिहासात वादग्रस्त ठरलेल्या टिपू सुलतानची महाराजांशी तुलना करणे हा शिवचरित्राचा अवमान आहे, अशी भूमिका या निदर्शनाच्या माध्यमातून मांडण्यात आली. यावेळी हिंदु जनजागृती समितीचे सर्वश्री बालराज डोंतुल, धनंजय बोकडे, दत्तात्रय पिसे, विनोद रसाळ आणि विद्यमान नगरसेवक सत्यनारायण गुर्रम यांच्यासह सोलापूर शहर आणि ग्रामीण भागातील ५० हून अधिक शिवप्रेमी हातात निषेधाचे फलक धरून सहभागी झाले होते.

### डॉ. पद्मश्री एन.टी. रामाराव संघाच्या अध्यक्षपदी तिपण्णा गणेरी यांची निवड

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

डॉ. पद्मश्री एन.टी. रामाराव शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संघाचे पंचवार्षिक जनरल मिटींग संस्थेचे माजी रामचंद्र जन्नु यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत डॉ. पद्मश्री एन.टी. रामाराव शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संघाच्या अध्यक्षपदी तिपण्णा गणेरी यांची निवड करण्यात आली. संस्थेचे सचिव श्रीनिवास गणेरी यांनी जमा खर्चाचे तपशील वाचून दाखविले. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष शंकर द्यावरकोंडा, कार्याध्यक्ष जनार्दन इंजामुरी, उपकार्याध्यक्ष अंबादास सायपूर, सचिव श्रीनिवास गणेरी, सहसचिव बाळकृष्ण अंबट, खजिनदार तिपण्णा चिनराज, सहखजिनदार श्रीनिवास गोसकी, ऑफिस इन्चार्ज आनंद सायपूर, सदस्य रायलिंग मिठ्ठापल्ली, देविदास गुंडेटी, नरसिंग कनकी, सदस्य श्रीनिवास नंदाल, मुकेश गणेरी, शंकर पोतु, संदीप चिनराज आदींची निवड करण्यात आली.



### अरुण रोडगे २ वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

शहर व सोलापूर जिल्हयातून २ वर्षाकरीता अरुण प्रभाकर रोडगे यास तडीपार करण्यात आले आहे. असे आदेश पोलीस आयुक्तालयातून काढण्यात आले आहेत. अरुण प्रभाकर रोडगे, वय ५७ वर्षे, रा. १५३, मुरारजी पेठ, मंगळवेढेकर चाळ, सोलापूर याचेविरुध्द सन २०२३, २०२४, २०२५ व २०२६ या कालावधीमध्ये सामान्य नागरीकांना साथीदारांसह मारहाण करुन दमदाटी करणे, सामान्य नागरीकांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे, अवैध व्यवसाय (मटका जुगार) चालवून दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द सलगर वस्ती पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलीस आयुक्त, एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाने उपायुक्त विजय कबाडे यांनी कार्यवाही करुन दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

# सर्व स्मशानभूमीच्या झालेल्या कामांचा आढावा घेणार : महापौर कोंड्याल

## आदिला नदी डीमार्केशन संदर्भात लवकरच बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या स्मशान भूमीच्या विकास कामांचा आढावा घेण्यात येणार आहे. दरम्यान, आदीला नदी परिसरातील डीमार्केशन, बांधकाम परवानगी या संदर्भात लवकरच आढावा बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरातील १४ स्मशानभूमीचे नूतनीकरण काम करण्यात आले. कुमठे स्मशानभूमी, मोदी स्मशानभूमी, मोदी ख्रिश्चन समशान भूमी, देगाव मुस्लिम कब्रस्तान स्मशानभूमी, जुना कारंबा नाका स्मशानभूमी, जुना पुना नाका स्मशानभूमी, भावसार स्मशानभूमी, रुपाभवानी रोड लिंगायत स्मशानभूमी, रुपा भवानी रोड हिंदू स्मशानभूमी, अक्कलकोट रोड जडे साहेब मुस्लिम स्मशानभूमी, अक्कलकोट रोड पद्मशाली स्मशान भूमी या सर्व स्मशानभूमीचे सुशोभीकरण करण्यात आले.

एकूण २२ कोटी रुपये निधीतून या १४ स्मशानभूमीत सुशोभीकरण काम करण्यात आले. प्रवेशद्वार,संरक्षक भिंत, गॅस दाहिनी, स्वच्छता गृह, अंतर्गत काँक्रिटचे रस्ते, सौर पथदिवे, वेटिंग शेड, बोर व पंपसेट बर्निंग शेड, पाण्याची टाकी, पेवर ब्लॉक पथदिवे, प्रेरक करणारे साईन बोर्ड, स्टोअर रूम, विद्युत दाहिनी आदी कामांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होता. दरम्यान, या सर्व कामांचा आढावा घेण्याचे नियोजन आहे. संबंधित विभागांना या संदर्भात सूचना देऊन आढावा घेण्यात येणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले. आदिला नदी परिसरात प्रशासनाकडून डीमार्केशन करण्यात आले आहे. या परिसरात देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानगी व इतर बाबींचा आढावाही लवकरच बैठक घेऊन घेण्यात येणार आहे. दर दोन दिवसाआड विविध विभागांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. यामध्ये त्या त्या विभागाच्या अडचणी जाणून घेण्याबरोबरच आवश्यक ती कामे करण्याच्या सूचनाही देण्यात येणार आहेत. प्रभाग निहाय आराखडा तयार करण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्याचबरोबर प्रभाग निहाय अडचणी, इतर माहिती घेण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील नागरिकांचे प्रश्न व समस्या जाणून त्या सोडविण्याला प्राधान्य देण्यात येत आहे, असेही यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.



# भाजपाचे नूतन नगरसेवक ज्ञानेश्वर म्यॉकल यांची दैनिक 'तरूण भारत' कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पार्टीचे नूतन नगरसेवक ज्ञानेश्वर म्यॉकल यांनी तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी दैनिक तरूण भारतचे कार्यकारी संचालक तथा समुह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते शाल, पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी श्री. पेठे, माने यांनी सत्कार करून म्यॉकल यांना शुभेच्छा दिल्या. तर सत्काराला उत्तर देताना श्री. म्यॉकल यांनी सांगितले की, तरूण भारतमधून माझी जडण घडण झाली. तरूण भारतमुळे आज माझी ओळख निर्माण झाली आहे. माजी संपादक अनिल कुलकर्णी, सर्वश्री दशरथ वडतीले, रमेश बसाटे, राजेंद्र खमीतकर, दत्तात्रय आराध्ये आदी माजी कर्मचाऱ्यांसह व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, मराठवाडा आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के यांच्यासह तरूण भारतचे कर्मचारी उपस्थित होते.



संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष तथा नूतन नगरसेवक शिवाजीतात्या वाघमोडे यांनी बुधवारी दैनिक 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांचे स्वागत करताना मुख्य संपादक प्रशांत माने. यावेळी उपस्थित तरुण भारतचे जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, उपसंपादक यशवंत गुरव, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांतबापू डांगे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहर उपप्रमुख राज जगताप, प्रदीप मोरे.

# पार्किंग वादातून तोडफोड; शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यावर आरोप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २५ फेब्रुवारी-**

बेगम पेठ परिसरात पार्किंगच्या किरकोळ वादातून चारचाकी गाडीची तोडफोड झाल्याची घटना मंगळवारी घडली होती. या प्रकरणात शिवसेना (शिंदे गट) अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख मुस्ताक शेख यांच्यावर आरोप करण्यात आले असून, तोडफोडीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेगम पेठेतील संपर्क कार्यालयाच्या बाजूला अफसर शेख यांनी आपली चारचाकी गाडी उभी केली होती. गाडी लावण्याच्या कारणावरून मुस्ताक शेख आणि अफसर शेख यांच्यात वाद झाला.



हा वाद चिघळत गेला आणि त्यातून संबंधित गाडीची तोडफोड करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. घटनेचे काही व्हिडिओ मोबाईलवर चित्रीत झाले असून ते सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. उर्वरित दृश्ये कॅमेऱ्यातही कैद झाली आहेत.

दरम्यान, स्थानिक रहिवाशांनी गंभीर आरोप करत सांगितले की, वादाच्या वेळी महिलांशी शिवीगाळ करण्यात आली. संबंधितांवर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच गाडीच्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे

# रघुनाथ क्षीरसागर लिखित फोटो फ्रेम या कौटुंबिक कथा संग्रहाचे थाटात प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

रघुनाथ क्षीरसागर लिखित फोटो फ्रेम या कौटुंबिक कथा संग्रहाचे प्रकाशन बुधवारी ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक अरविंद जोशी यांच्या हस्ते व प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ लेखिका सुनेत्रा पंडित यांच्या उपस्थितीत झाले.

सुरुवातीस सरस्वती पूजन वंदनानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. जटायू अक्षर सेवेचे प्रतिनिधी सुमित गाडेकर यांनी राष्ट्रीय विचार देणाऱ्या जटायू अक्षर सेवा या संस्थेची माहिती व परिचय करून दिला. फोटो फ्रेम या कथेचे वाचन श्री वरदराज मिरजी व अर्चना कुलकर्णी यांनी केले. रघुनाथ क्षीरसागर यांनी आपला वाचन व लेखन प्रवास उघडून सांगताना ही प्रेरणा आपल्याला आजी व वडील यांच्याकडून मिळाली असे सांगितले तसेच रहस्यकथा लेखनानंतर सामाजिक विचार देणाऱ्या कौटुंबिक कथा लिहिण्यास प्रारंभ केला असे सांगितले. विवाह प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाचा संस्कार असून त्यात काळानुरूप बदल होत चालले आहेत. मात्र आपली संस्कृती आपण जपली पाहिजे असे सुनेत्रा पंडित यांनी सांगितले. अदिती मुळे (क्षीरसागर) यांनी उपस्थित रसिकांचे आभार मानले. सूत्रसंचालन प्रिसिजन वाचक दूत श्रीधर खेडगीकर यांनी अतिशय सुंदररित्या केले.

# नरोटेवाडी येथील शिलाई उद्योग इतर बचत गटांना दिशादर्शक

## अतिरिक्त सीईओ कोहिनकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

नरोटेवाडी येथील महिला बचत गटाने सुरु केलेला शिलाई उद्योग सर्व गावातील बचत गटांसाठी अनुकरणीय आहे. याशिवाय ग्रामपंचायत कर येणे व वसुली, दप्तर अद्यावत, आयुष्यमान कार्ड वाटप व मुद्देनिहाय योग्य कामाचे नियोजन करून गुणांक वाढवणे जिंकण्यासाठी आवश्यक असल्याचे जिल्हा परिषदचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत त्यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडी,गुळवंची गावांना भेटी देवून अभियानाअंतर्गत कामाची तपासणी केली.यावेळी ते बोलत होते.यावेळी गटविकास अधिकारी राजाराम बोंग, विस्तार अधिकारी तथा पालक अधिकारी सोमनाथ शिंदे,श्रीकांत मुळे,सरपंच उमेश भगत,उपसरपंच महेंद्र खटके, पदाधिकारी,कर्मचारी उपस्थित होते. ग्रामीण भागात बचत गट हे अर्थकारणाचा कणा आहे.शासनाचे बचत गटांना मोठे प्रोत्साहन आहे. नरोटेवाडी येथील महिलांचा गणवेश शिलाई उद्योग इतर गावातील बचत गटांना आदर्शवत आहे. ग्रामपंचायत येणे कर रक्कम व वसुलीसाठी प्राधान्य द्या, दप्तर अद्यावत ठेवा,आरोग्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या आयुष्मान कार्ड १०० टक्के कुटुंबात वाटप करा,शासकीय इमारती, रस्ते, स्मशानभूमी,शाळा,अंगणवाडी परिसर स्वच्छ ठेवा असे सूचना कोहिनकर यांनी दिल्या. तर नरोटेवाडी गावाने अभियानांतर्गत केलेले काम प्रशंसनीय असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी शाळा,अंगणवाडी, किचन शेड, महिला उद्योगास भेट दिली.



यावेळी ग्रामसेवक सुवर्ण घोडके, मुख्याध्यापक काळे,ग्रामसंघाचे अध्यक्ष शालन कोळेकर, रणजीत भगत, भूषण धावणे, सविता देवकर, गीता वाले, शुभांगी उंबरे, सुरेखा खटके, शितल खटके उपस्थित होते.

# कामगार विरोधी धोरणांचा निषेध; सोलापुरात भारतीय मजदूर संघाचे 'सरकार जगावो' आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांविरुद्ध आणि प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघ (इचड), सोलापूर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य 'सरकार जगावो' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेकडो कामगार आणि पदाधिकारी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये नवीन कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही ठोस आर्थिक तरतूद नसल्याबद्दल आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रामुख्याने एझड-९५ अंतर्गत निवृत्त कर्मचाऱ्यांना किमान ५,००० रुपये व त्यापेक्षा जास्त पेन्शन वाढ मिळावी, ही मागणी लावून धरण्यात आली. भारतीय मजदूर संघ हा देशातील सर्वात मोठ्या कामगार संघटनांपैकी एक असून, कामगारांच्या हितासाठी हे देशव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष नंदकुमार भोसले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाचे वाचन केले. त्यांनी केंद्र सरकारच्या कुचकामी धोरणांवर सडकून टीका केली. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुधांशू रानडे यांनी ओरिसा, पुरी येथील अखिल भारतीय अधिवेशनात संमत झालेल्या ठरावांची माहिती दिली.जर शासनाने या मागण्यांकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर आगामी काळात यापेक्षाही तीव्र आणि उग्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नंदकुमार भोसले यांनी यावेळी दिला. या आंदोलनात भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या विविध संघटनांचे प्रतिनिधी, महिला पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# २ मार्चला जिल्हा लोकशाही दिन

**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

शासन परिपत्रकानुसार दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जाणारा जिल्हा लोकशाही दिन यंदा सोमवार २ मार्च रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (सात रस्ता) येथे पार पडणार आहे. या दिवशी नागरिकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यासाठी सर्व संबंधित विभागप्रमुखांनी अनिवार्यपणे उपस्थित राहावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिले आहे. विभागप्रमुखांनी आपल्या विभागाकडे मागील सहा महिन्यांत प्राप्त झालेल्या लोकशाही दिनातील निवेदनांवर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.



# विविध तेलुगू संस्थांकडून महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

महापौरपदी विनायक कोंड्याल यांची निवड झाल्याबद्दल विविध तेलुगू सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय,तेलुगू देशम पार्टी, व डॉ. एन. टी. रामाराव शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा मंडळ (सोलापूर) चे अध्यक्ष गणेरी तिप्पन्ना यांनी शुभेच्छापत्र देऊन अभिनंदन केले. तसेच उपाध्यक्ष इंजामुरी जनार्धन, कार्याध्यक्ष पोतु रामुलू, कार्यकारी उपाध्यक्ष गोसकी श्रीनिवास, सचिव चिन्नाराजु तिप्पन्ना, संयुक्त सचिव गणेरी श्रीनिवास, खजिनदार अक्कल नागनाथ, उपखजिनदार देवरकोंडा शंकर आदी पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी कनकी नरसिंह, नंदल श्रीनिवास, बालकृष्ण यांनी अभिनंदन व्यक्त केले. अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, एक्झिक्युटिव्ह चेअरमन बालराजू बोल्ली, उपाध्यक्ष श्रीनिवास यंगनडुल, सचिव तिप्पन्ना गणेरी, संयुक्त सचिव प्रभाकर भीम नाथ, खजिनदार श्रीनिवास गल्लि यांनी शुभेच्छा दिल्या.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महामार्गावरील विद्युत तारांचा धोका वाढला; ग्रामस्थांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** लातूर- पुणे महामार्गावरील मुरुड हे एक महत्त्वाचे शहर असून, शहरात विविध जाती धर्माच्या, साधुसंतांच्या तसेच महापुरुषांच्या जयंती उत्सव, मिरवणुका मोठ्या प्रमाणात होतात. त्यामुळे महामार्गावरील विद्युत तारेची उंची वाढवावी किंवा विद्युत लाईन बाजूला घेण्याचे निवेदन ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे यांनी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे दिले आहे.

लातूर जिल्ह्यातील मुरुड हे शैक्षणिक व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर मानले जाते. शहराची लोकसंख्या ५० हजारा पेक्षाजास्त आहे. शहरात विविध जाती धर्माचे लोक राहतात. त्यामुळे विविध जाती धर्माच्या महा वितरण साधुसंतांच्या तसेच महापुरुषांच्या मिरवणुका निघतात. या मिरवणुकांमध्ये शोभा रथ, ध्वज, मिरवणुकीतील देखावे, साऊंड सिस्टिमची वाहने तसेच ऊस वाहतूक करणारी वाहनेही शहरातूनच जातात. त्यामुळे या सर्व गोष्टीला अडथळा निर्माण होत असून विद्युत तारेचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्युत लाईन रस्त्याच्या बाजूला घ्यावी किंवा त्याची उंची वाढवावी असे निवेदन ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे यांनी उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे दिले आहे. निवेदनावर दत्ता पुदाले, शुभम देवकर, श्रीकांत कुंभार, आकाश सापसोड रवी ईटकर, आनंद ईटकर, शंकर ईटकर यांच्या सह्या आहेत.



## विविध वृत्त...

### 'जेड ग्लोबल' च्या मुलाखतीत कॉक्सिटच्या चौघांची निवड



**लातूर :** येथील कॉक्सिटमध्ये संगणकशास्त्राची पदवी घेणाऱ्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी जेड ग्लोबल या आयटी कंपनीने घेतलेल्या कॅम्पस मुलाखतीत कॉक्सिटच्या चौघांच्या नोकरीसाठी निवडी झाल्या आहेत. याबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मागील चार दिवसांपूर्वी संगणकशास्त्राची पदवी घेणाऱ्या विविध विभागांतील तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी जेड ग्लोबल या नामांकित आयटी कंपनीच्यावतीने कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीला लातूरसह संपूर्ण मराठवाड्यातील सुमारे विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. या मुलाखतीत येथील कॉक्सिटच्याही विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या होत्या. त्यांचा निकाल नुकताच कंपनीने कळविला आहे. यात कॉक्सिटच्या झैद शेख, वरद गुजराथी, साई हुडगे व शुभम राठोड यांच्या निवडी झाल्या आहेत. याबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य आर. एस. अवस्थी, कॉक्सिटचे ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांची उपस्थिती होती. कॉक्सिटच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाकडून आयटी कंपन्यांमध्ये आवश्यक असलेल्या अभ्यासक्रमांची तयारी करून घेण्यात येते. यासाठी तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, माजी प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, प्रा. कैलास जाधव, प्रा. नितीन वाघमारे हे विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेतात.

### जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल चे एनएमएमएस परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



**लातूर :** जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर च्या इयत्ता आठवी च्या विद्यार्थ्यांनी एन एम एम एस परीक्षेत घवघवीत यश संपादन केले त्याबद्दल त्यांचा सत्कार आदरणीय प्राचार्य प्रशांत घार यांच्या हस्ते संपन्न झाला यशस्वी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे सुचिता मोगरगे, श्रेयश सुरवसे, प्रीतम सोळुंके, सायली पुजारी, दादासाहेब, सूर्यवंशी, रेश्मा गुळवे, सुरज राठोड, आर्यन चव्हाण,जीविका चौरे,प्रणव बनसोडे, या प्रसंगी पर्यवेक्षक तानाजी घाटके, परीक्षा विभाग प्रमुख विश्वनाथ सिंधीकुमठे,गिरीष रंदाळे, नंदकिशोर माळी,डॉ.गणपत माने, डॉ.सुशिल शिंदे,निता तांभाळे,संभाजी वारकड ,रामदास लातूरे, अमर येळंबकर, संगमेश्वर भेंडेगावे, रंजना राशिनकर,गीता पाटील, संकेत बनसोडे, गजानन घोंगडे,आकाश लोहार,अमित भालके यांनी उपस्थित राहून यशस्वी विद्यार्थ्यांच कौतुक केले.

### राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे 'एनएमएमएस' परीक्षेत यश



**लातूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली असून सात विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.महेश बाळासाहेब मस्के हा विद्यार्थी ११० गुण मिळवत विद्यालयात प्रथम, हर्ष बालाजी कांबळे १०८ गुण मिळवत द्वितीय तर अदिती अविनाश लवटे ही १०२ गुण मिळवून विद्यालयात तृतीय आली आहे. या परीक्षेत अद्वैत अन्शीराम बल्लाळ याने ८६ गुण, सार्थक धनराज कराड ८१, तर साईनाथ दत्ता गोरे व अंकिता अमोल कंठाळे यांनी प्रत्येकी ७८ गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, पर्यवेक्षक एस. एम. गुरमे, पांडुरंग कुलकर्णी, मदन धुमाळ यांच्यासह अन्य शिक्षकांनी शाल, पुष्पहार देऊन कौतुक केले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध

- पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांची ट्युशन एरिया भेटीदरम्यान वेणूताई गर्ल्स हॉस्टेलला भेट
- ट्युशन परिसरातील अडचणी जाणून घेत दिले तात्काळ उपाययोजनेचे आदेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** लातूर शहरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी ट्युशन एरिया भेटीदरम्यान बुधवारी वेणूताई गर्ल्स हॉस्टेल येथे सदिच्छा भेट देत विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. विद्यार्थिनींच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले.





लातूर शहर हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र असून राज्याच्या विविध भागांतून तसेच बाहेरगावाहून अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी येथे शिक्षणासाठी येत असतात. शिक्षणासोबतच सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याची जाणीव ठेवून जिल्हा पोलीस प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी ट्युशन एरिया भेटीदरम्यान वेणूताई गर्ल्स हॉस्टेल येथे थेट भेट देत तेथील विद्यार्थिनींशी संवाद साधला.

या भेटीदरम्यान विद्यार्थिनींनी ट्युशन क्लासला जाताना व परतताना येणाऱ्या अडचणींबाबत माहिती दिली. काही ठिकाणी अंधार, वाहतुकीची अडचण, संशयास्पद व्यक्तींची उपस्थिती किंवा सुरक्षिततेबाबत निर्माण होणारी चिंता यासंदर्भात विद्यार्थिनींनी आपली मते व्यक्त केली. पोलीस अधीक्षकांनी सर्व बाबी अत्यंत लक्षपूर्वक ऐकून आणि समजून घेतल्या. यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना ट्युशन परिसरात नियमित गस्त वाढविणे, संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवणे, विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे याबाबत सूचना दिल्या. तसेच कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास तात्काळ पोलीसांना कळविण्याचे आवाहन विद्यार्थिनींना करण्यात आले.

संवादादरम्यान पोलीस अधीक्षकांनी विद्यार्थिनींशी दिलखुलास चर्चा करत त्यांना त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिस्त, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही प्रकारच्या भीती किंवा दबावाखाली न राहता आत्मविश्र्वासाने शिक्षण घ्यावे, पोलीस प्रशासन कायम तुमच्या पाठीशी आहे असा विश्र्वास त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

ट्युशन परिसर भेटीदरम्यान वेणूताई गर्ल्स हॉस्टेल येथे झालेल्या या भेटीमुळे विद्यार्थिनींमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्र्वास व सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाल्याचे पाहावयास मिळाले. अनेक विद्यार्थिनींनी पोलीस अधीक्षकांनी स्वतः हॉस्टेलमध्ये येऊन संवाद साधल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

लातूर जिल्हा पोलीस दल हे महिला सुरक्षा व विद्यार्थ्यांच्या हितासाठी सतत तत्पर असून भविष्यातही अशा प्रकारचे लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीस ३ वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** लातूर शहरातील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात पोलिसांनी केलेला सक्षम तपास, पुरावे संकलन तसेच न्यायालयीन प्रक्रियेत केलेली प्रभावी पैरवी यामुळे पीडितेला न्याय मिळण्यास मदत झाली आहे.

आरोपी संजय गोविंदराव कोळी (वय ४६ वर्षे, रा. विक्रम नगर, लातूर) याने फिर्यादीच्या पीडित मुलीशी गैरवर्तन व लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली व पुढील तपास सुरू केला.

सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गिते यांनी अत्यंत बारकाईने व कायदेशीर बाबींची पूर्तता करून केला. तपासादरम्यान पीडितेचे जबाब, वैद्यकीय अहवाल, पंचनामे तसेच इतर महत्त्वाचे पुरावे गोळा करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात न्यायालयीन कामकाजादरम्यान पोलिसांनी सरकारी पक्षाला आवश्यक ते सर्व सहकार्य केले.

सदर खटल्याची सुनावणी सत्र न्यायाधीश-४ एस. व्ही. जाधव यांच्या न्यायालयात झाली. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील एम. एस. महिंद्रकर यांनी प्रभावी युक्तिवाद सादर केला. तसेच पैरवी महिला पोलीस अंमलदार बी. टी. हिंगडे यांनी खटल्याच्या कामकाजात समन्वय ठेवून महत्वाची भूमिका बजावली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व सादर करण्यात आलेले पुरावे विचारात घेऊन मा. न्यायालयाने आरोपी संजय गोविंदराव कोळी यास दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस भारतीय दंड संहिता कलम ३५४(अ) तसेच पोस्को कायदा कलम ८ अन्वये ३ वर्षे कारावास व चार हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक एस. के. चवरे यांच्या देखरेखित संपूर्ण तपास व न्यायालयीन प्रक्रिया पार पडली. तसेच टी.एम.सी. सेलचे सपोनि शिवशंकर मनाळे यांनीही समन्वय साधण्यात सहकार्य केले.

## पालिका आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** सध्या मुस्लिम समाजबांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू आहे. शहरासह प्रभाग तीनमधील मुस्लिम रहिवास असलेल्या भागातील नागरिकांना सर्व सुविधा द्याव्यात, मशिदींच्या परिसराची नियमित स्वच्छता करावी, पाणी, विद्युत पथदिव्यांच्या सुविधा द्याव्यात, या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्तांना नगरसेवक विकास कांबळे यांच्यावतीने देण्यात आले.रमजान महिन्याची सुरुवात झाल्याने प्रभागातील सर्व मशिदींसमोर विद्युत प्रकाश झोतांची व्यवस्था करावी, मुस्लिमबहुल परिसरातील महानगरपालिकेच्या पथदिव्यांची तत्काळ दुरुस्ती करावी, परिसरातील कचरा व नाल्यांची नियमित स्वच्छता करण्यात यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी प्रभाग क्रमांक तीनचे नगरसेवक विकास कांबळे, प्रभाग दोनचे नगरसेवक सचिन बंडापल्ले, इस्माईल फुलारी, लक्ष्मण वाघमारे, महादू गायकवाड, खंडू सुरवसे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## दयानंद शिक्षण संस्थेत शिवजयंती उत्साहात साजरी; दयानंद न्यूज चॅनेल' व 'ई-मॅगझिन'चे दिमाखदार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध विधायक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या सोहळ्याचे औचित्य साधून दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने तंत्रज्ञान आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातील नवनवीन उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.





कार्यक्रमाची सुरुवात दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी महाराजांचे विचार आणि त्यांचे व्यवस्थापन कौशल्य आजच्या काळातही कसे मार्गदर्शक आहेत, यावर प्रकाश टाकला.

या सुवर्णक्षणी दयानंद कला महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या 'दयानंद न्यूज चॅनेल'चे श्री. रमेश बियाणी यांच्या हस्ते अधिकृत उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याचसोबत प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी शिक्षकांना 'ई-सेवा पुस्तिका' प्रदान करण्यात आल्या आणि संस्थेच्या डिजिटल वाटचालीचा भाग म्हणून 'ई-मॅगझिन'चेही प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता अत्यंत उत्साही वातावरणात झाली. डॉ. संदिपान जगदाळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा प्रसंग पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत केला. त्यांच्या पहाडी आवाजातील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास मा. श्री. जयप्रकाश दरगड, संस्थेच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक व कार्यालयीन सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चन्नबसवेश्वरचा विशाल सोनुने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत चतुर्थ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील फार्म डी. चतुर्थ वर्षातील विद्यार्थी विशाल रमेश सोनूने याने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चतुर्थ पारितोषिक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



लय अवघड हाय गड्या उमगाया बाप र... या विषयावर विशाल सोनूने याने प्रभावी आणि समाजप्रबोधनपर भाषण सादर केले. अभ्यासपूर्ण मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि प्रभावी वक्तृत्वशैलीच्या जोरावर त्याने परीक्षक व उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेत विशाल सोनूनेला उत्तेजनार्थ १००१ रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या यशामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे. विद्यार्थ्याच्या या शानदार यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवनीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती,श्री. अरुणप्पा हालकुडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नसीर शेख, प्रा. रिशा वाले, प्रा. महेश मानके, प्रा. रचिता मलशेट्टे, प्रा. अश्विनी भारती, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्याचे मनपूर्वक अभिनंदन केले.

## श्री सिध्देश्वरास १००१ महिलांकडून रुद्राभिषेक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ फेब्रुवारी :** महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानकडून यात्रा महोत्सव सुरु आहे. या महोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. याचाच एक भाग म्हणून श्री सिध्द्ेश्वरास १००१ महिलांकडून रुद्राभिषेक करण्यात आला आहे. यासाठी सुखदा मांडे, संजिवनी येरटे व वर्षा गोजमगुंडे यांनी पुढाकार घेतला होता.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने सुरु असलेल्या यात्रा महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. यामध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासह शेतकजयांसाठी व महिलांसाठीही कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. यानिमित्ताने शहरातील १००१ महिलांना एकत्रित करून ग्रामदैवत श्री सिध्देश्वरास रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी या महिलांनी एक साथ एका सुरात अभिषेकाच्या निमित्ताने विविध मंत्रोच्चार केले. यामुळे देवस्थान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झालेले पाहण्यास मिळाले. रुद्राभिषेकानंतर महिलांना श्री सिध्देश्वराची महाआरतीही केली. या कार्यक्रमासाठी शहरातील महिलांना एकत्रित आणण्याकरिता सुखदा मांडे, संजिवनी येरटे व वर्षा गोजमगुंडे यांनी पुढाकार घेतला होता. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल देवस्थानच्या वतीने या तिघींचाही यथोचित सत्कार करण्यात करून महाप्रसाद वाटप करण्यात आला.



## संक्षिप्त...

### डॉ.विजयकुमार पवार यांना 'नॅशनल आयडियल प्रोफेसर वार्ड - २०२६ प्रदान



**निलंगा:** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ.विजयकुमार पवार यांना शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील मौलिक योगदानाबद्दल बी द चेंज फाऊंडेशन, मुंबई यांच्या वतीने 'नॅशनल आयडियल प्रोफेसर वार्ड - २०२६' प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र होते. डॉ.विजयकुमार पवार यांच्या प्रस्तुत उज्वल शैक्षणिक यशाबद्दल शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, डॉ.शीतल गुंजटे, प्रा.अभिजीत चवळे, डॉ.जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.प्रदीप पाटील, प्रा.विकास पाटील, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.गंगाप्रसाद तोटावार, प्रा.विजयकुमार हंडे, संजीवकुमार होसुरे, विजयकुमार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डॉ.विजयकुमार पवार यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अंबुलगा (बु) जि.प. प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे NMMS परीक्षेत यश

**निलंगा:** जि.प. प्रशाला अंबुलगा (बु) ता. निलंगा येथील इ. ८वी चे विद्यार्थी या वर्षी पहिल्यांदाच छचवड परीक्षेस बसले होते.




प्रशालेतील परीक्षेस बसलेल्या एकूण १३ विद्यार्थ्यांपैकी खालील तीन विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. कु. म्हेत्रे आरुषी नागनाथ, कु. पारेकर श्रवेता अशोक, कु. म्हेत्रे अंकिता दयानंद सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेच्या व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

### रामकिसन कावळे यांचे निधन



**शिरूरअनंतपाळ :** दैठणा पश्चिम शेंद (ता. येथील श्री. रामकिसन गणपती कावळे यांचे मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ५ वाजता अल्प आजाराने त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले. ते ९७ वर्षांचे होते.त्यांच्या पार्थिवावर दुपारी १.३० वाजता पश्चिम शेंद येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा सधन परिवार आहे. स्वभावाने अत्यंत नम्र, मनमिळावू व धार्मिक वृत्तीचे असलेले श्री. कावळे हे वारकरी संप्रदायाचे विठ्ठल भक्त म्हणून परिसरात परिचित होते. दैठणा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विजयकुमार रामकिसन कावळे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने पश्चिम शेंद येथील कावळे परिवारावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### उदगीरच्या स्वामी विवेकानंद फार्मसीचा संघ विजेता

**उदगीर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या वतीने विद्यापीठात आयोजित द्वितीय फार्मा शिक्षक क्रिकेट २०२६ स्पर्धेत अंतिम सामना जिंकून स्वामी विवेकानंद फार्मसी महाविद्यालयाचा संघ विजेता ठरला.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात फार्मा शिक्षक क्रिकेट आयोजित करण्यात आले होत्या. या स्पर्धेतील अंतिम सामना उदगीरच्या स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसी आणि आलमला येथील शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी यांच्यात झाला. अत्यंत चुरसीच्या व अटीतटीच्या सामन्यात स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसी, उदगीरच्या संघातील खेळाडू प्राचार्य डॉ. गणेश तोलसरवाड यांच्या नेतृत्वात दिग्विजय केंद्रे, महेश मुक्ता, विश्र्वनाथ मोरखंडे, नवनाथ बेंडके, शिवराज सूर्यवंशी, श्रीपाद अहंकारी, सिद्धेश्र्वर शिकरे, आनंद मठपती, सुमित पाटील, समीर शेख, विजयकुमार झंवर, अनिल चोपडे, नितीन इंगळे, प्रवीण लंजिले यांनी उत्कृष्ट खेळून विजेतेपद पटकावले आहे. तर अंतिम सामन्यात सामनावीर व मालिका वीर पुरस्कार प्रा. दिग्विजय केंद्रे यांना देण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. सुधीर जगताप, संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी ज्योती स्वामी, संस्थेच्या मनुष्यबळ विकास विभागाच्या प्रमुख स्नेहा लांडगे, वैभव बिडवे, संदेश गवळे यांनी अभिनंदन केले.

### राज्यस्तरीय 'मॉडेल मेकिंग' स्पर्धेत डी. बी. कॉलेजचे यश

**चाकूर :** सोलापूर येथील एमआयटी विश्र्वप्रयाग विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फार्मसीत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'मॉडेल मेकिंग' स्पर्धेत डी. बी. कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी 'लेआऊट ऑफ स्टराईल प्रॉडक्ट्स' हा विषय निवडून मॉडेल सादर केले. याला परीक्षकांची दाद मिळाली. शीतल डोंगरे, प्रतीक जाधव यांनी सादर केलेल्या मॉडेलला प्रथम क्रमांक मिळाला. विविध विषयांवर रियान शेख, आकाश पोळकर, माया चाडेबोणे, अनुश्री नागरगोजे, कृष्णा कदम, गणेश राजमाने यांनी पोस्टर सादरीकरण महाविद्यालयाचे प्रा. वैष्णवी ताथोडे, आशा केदार, मोनिका इंगळे, मानसी देशमुख, दीपाली भुरे, रोहित पांचाळ, सुप्रिया काटगाव, योगिता राठोड यांनी मार्गदर्शन केले.

# औशातील भुईकोट किल्ल्याला ११.२० कोटींचा ऐतिहासिक निधी

## वारसा संवर्धनातून पर्यटन विकासाला वेग, आ.अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा/सुधीर गंगणे**

**औसा, दि. २५ फेब्रुवारी :** ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून औसा शहरातील भुईकोट किल्ल्याच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ११ कोटी २० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे शहराच्या पर्यटन विकासाला नवी चालना मिळणार आहे, तसेच स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीलाही मोठा हातभार लागणार आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी औसा दौऱ्यादरम्यान किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली होती. किल्ल्याची सद्यस्थिती, तटबंदीवरील झीज, काही ऐतिहासिक वास्तूंची पडझड तसेच परिसराच्या सुशोभीकरणाची गरज यांचा सविस्तर आढावा घेतला होता. त्यावेळी किल्ल्याच्या सर्वांगीण संवर्धनासाठी विशेष निधी देण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली होती. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासनाने ११.२० कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

या निधीतून तटबंदीचे मजबुतीकरण, जीर्ण भागांचे संवर्धन, दरवाजे व महत्त्वाच्या वास्तूंची दुरुस्ती, खंदक परिसराची स्वच्छता आणि सुशोभीकरण, आकर्षक प्रकाश योजना, माहिती फलक तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. या कामांमुळे किल्ल्याचे ऐतिहासिक स्वरूप अबाधित राहील. आणि पर्यटकांसाठी अधिक सुरक्षित व आकर्षक वातावरण निर्माण होणार आहे.

सामरिक आणि स्थापत्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असलेला औसा येथील भुईकोट किल्ला खोलगट भागात वसलेला आहे. मजबूत तटबंदी, विस्तीर्ण खंदक आणि ऐतिहासिक वास्तू हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. बहामनी काळात उभारण्यात आलेल्या या किल्ल्याला पुढे निजामशाही, आदिलशाही आणि मोगल सत्तांमध्येही महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे या किल्ल्याचे ऐतिहासिक स्थान व्यापक स्वरूपाचे आहे.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे औसा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, मराठवाड्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून औशाची ओळख अधिक भक्कम होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# भोगेश्वर मंदिर ट्रस्ट देणार मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत

### भोगेश्वर महादेव मंदिर समितीच्या अध्यक्षपदी मलबा घोणसे



**तभा वृत्तसेवा/ रियाज मोमीन**

**वलांडी, दि. २५ फेब्रुवारी :** तळेगाव ता. देवणी येथे श्री भोगेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व विश्वस्तांना माननीय धर्मादाय आयुक्त लातूर यांच्या आदेशान्वये पदभार देण्यात आला व त्यांचा सत्कार ह भ प विठ्ठल महाराज शिवणखेडकर यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिर समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मालबा रामराव घोणसे, पुजारी व कायम विश्र्वस्त भगवान दत्तू बन, सचिव व्यंकटराव बाबुराव पाटील, विश्वस्त राजकुमार महादू बन, तानाजी धोंडीराम अट्टरगे, श्री शिवाप्पा अण्णाराव रोट्टे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री मालबा घोणसे यांनी तळेगावकरांच्या इतिहासात नवीन काहीतरी करून दाखवण्याचे आश्वासन दिले. मंदिर समितीच्या वतीने तळेगावातील मुलीच्या लग्नासाठी ११००० रू. ची आर्थिक मदत केली जाणार आहे. व भजनी मंडळाला लागणारे सर्व साहित्य पुरविण्याचे आश्वासन दिले.

यानिमित्त रुद्राभिषेक ह भ प विठ्ठल महाराज शिवणखेडकर यांचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय दादा साळुंखे जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री घोणसे यांचा विविध संघटना व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रामभाऊ बिरादार अंगद घोणसे, विजयकुमार देशमुख सोपान धनेगावे, बळी शेळके, नागनाथ जोगी, शिवाजी कोटे, नरसिंग काळे, गोविंद इंगोले, राम धनेगावे, विठ्ठल आटरगे संदीप कोनाळे, हसन सय्यद, सत्यवान वाघमारे,यांनी परिश्रम घेतले.


# महात्मा फुले स्कूल येथे संत गाडगे महाराज यांची जयंती

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. २५ फेब्रुवारी :** जळकोट येथील महात्मा फुले पब्लिक स्कूल गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयातील प्राचार्य तसेच शिक्षकांच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रचार्य सी.एन. बिरादार हे होते तर प्रमुख पाहुणे नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य एम.जे. वाघमारे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मनोज जाधव म्हणाले की, संत गाडगे महाराज हे मानवता विचारसरणीचे थोर समाज सुधारक होते. ते पुढे म्हणाले की, संत गाडगे महाराज ज्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' मानून अज्ञान, अंधश्रद्धा व जातिभेदाविरुद्ध लढा दिला. त्यांचे विचार 'मानव सेवा हीच ईश्र्वर सेवा' यावर आधारित होते. ज्यासाठी त्यांनी कीर्तनातून साधी, सोपी व विज्ञाननिष्ठ शिकवण दिली.



संत गाडगे बाबांचे प्रमुख विचार व विचारसरणी ही (दशसूत्री) मानवतावाद, देव दगडात नसून माणसात आहे,. माणसाला कमी लेखू नका, जातीभेद पाळू नका, प्रत्येक मानवाचा आदर करा. असा संदेश त्यांनी दिला.

सातवीच्या विध्यार्थ्यांनी गाडगे महाराज यांच्या स्वच्छता अंधश्रद्धा, कर्जबाजारी यावर बाल नाटिका सादर केली. त्यांचे मार्गदर्शक शिक्षक वाघमारे आर. व्ही. हे होते. या प्रसंगी शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बडे यांनी तर कडकंजे रमेश यांनी आभार मानले.

# 'महाराष्ट्र' च्या विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाजाचा अनुभव

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २५ फेब्रुवारी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाची प्रत्यक्षात माहिती मिळावी या उद्देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.एन.कदम व उपप्राचार्य डॉ.बी.एस. गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक न्यायालयास अभ्यास भेट दिली. या अभ्यास भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी न्यायालयीन प्रक्रिया, विविध प्रकरणांची सुनावणी, तसेच न्यायालयातील कामकाजाची



पद्धत जवळून पाहिली व अनुभवली.या भेटीदरम्यान न्यायालयातील न्यायाधीश श्री. एस. बी.पवार, श्री. आर. व्ही. पांडे, अधिकारी व वकीलांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन रचना, खटल्यांची सुनावणी, पुरावे सादर करण्याची प्रक्रिया, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य, माहिती अधिकार ,तसेच न्यायालयाचे समाजातील महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या दरम्यान विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उत्तरे न्यायालयातील अधिकाऱ्यांनी दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. अशा अभ्यास भेटींमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळतो, आणि कायद्याविषयी जागरूकता वाढीस लागते. विद्यार्थ्यांनीही ही भेट अभ्यासपुरक व ज्ञानात भर टाकणारी असल्याचे मत व्यक्त केले.

या अभ्यास भेटीत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.व्ही.पी.सांडूर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.एस.एस. बदनाळे, प्रा.माने पोर्णिमा, प्रा. सातपुते पूनम आदींनी प्रयत्न केले.

# नीतीमान व्यक्ती समाजाला दिशा देतात : रो. डॉ.हरिप्रसाद सोमाणी

## रोटरी क्लबच्या उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्काराचे उदगीरात थाटात वितरण




**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २५ फेब्रुवारी :** समाजात मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होत असतात. त्या समस्या सोडवून समाजाला योग्य दिशा देण्याचे काम नीतीमान व्यक्ती करीत असतात, असे प्रतिपादन रोटरी क्लब ३१३२ चे माजी प्रांतपाल हरिप्रसाद सोमाणी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्काराचे सोमवारी रोटरी क्लब ३१३२ चे माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांच्या हस्ते येथील मोरया मंगल कार्यालयात वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे होते. व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हलकीकर यांची उपस्थिती होती.

यावेळी रोटरी क्लबच्या वतीने शहरातील ज्येष्ठ व्यापारी बाळकृष्ण मुक्कावार यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. उदगीरचे भूमिपुत्र नांदेड येथील प्रसिद्ध पचनसंस्था विकार तज्ञ् डॉ. नितीन जोशी, हैद्राबाद येथील उद्योजक असलेले उदगीरचेच भूमिपुत्र मारोती मरलापल्ले,ज्येष्ठ व्यापारी ईश्र्वरप्रसाद बाहेती, शिवकुमार डोईजोडे, दत्तात्रय भोसले यांचा उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

पुढे बोलताना डॉ.हरिप्रसाद सोमाणी म्हणाले की, समाजात कोणताही व्यवसाय हा कमी दर्जाचा नसतो. त्या त्या व्यवसायात काम करणारी व्यक्ती त्या व्यवसायाला मोठा दर्जा मिळवून देत असते असे सांगत सोमाणी यांनी रोटरी क्लब हे नीतीमानता जोपासून काम करणारी संस्था असल्याचे सांगितले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. नितीन जोशी यांनी उदगीरच्या मातृभूमीत झालेल्या सत्काराने आपण भारावून गेलो असून या सत्काराने मला आणखी नव्या जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे ते म्हणाले. अलीकडच्या काळात देशात मानसिक आरोग्य ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढली असून झोप येण्यासाठी गोळ्या घेणाऱ्याचे प्रमाण वाढले आहे. हे देशासाठी घातक असल्याचे सांगत डॉ. जोशी यांनी मानसिक आरोग्याच्या विषयावर जनजागृती होणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात राजेश्र्वर निटुरे यांनी रोटरी क्लबचे कार्य हे कौतुकास्पद असून समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्ती शोधून त्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगितले.

उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी रोटरी क्लबने समाजातील शेवटच्या घटकासाठी नेहमीच काम केले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय रोटरी क्लबचा १२१ वर्धापनदिन केक कापून साजरा करण्यात आला.

प्रारंभी रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल जैन यांनी केले. प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. जीवन गौरव सन्मानपत्राचे वाचन ज्योती स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन मंगला विश्र्वनाथे व विशाल तोंडचिरकर यांनी केले. आभार मोतीलाल डोईजोडे यांनी मानले. कार्यक्रमास समाजातील विविध क्षेत्रातील नागरिक, महिला पुरुष, रोटरी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.


## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय शिरुर अंनतपाळ (दंडणिय-विभाग)
जा.क्र. २०२५ / जन्म/प्रगटन/कावी-०१

जाहीर प्रगटन देण्यात येते की अर्जदार पटेल महंमद महंमद रा.तुरुकवाडी ता.शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी तहसील कार्यालय शिरूर अनंतपाळ या कार्यालयात पटेल महंमद महंमद रा.तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केली आहे. जन्म झालेल्यांचे नाव पटेल महंमद महंमद सदर व्यक्तीचा तुरुकवाडी या ठिकाणी दिनांक १/७/१९६७ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणे करीता तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे अर्ज सादर केला आहे. वरील जन्म दिनांका बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही,याची नोंद घेण्यात यावी.

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय शिरुर अंनतपाळ (दंडणिय-विभाग)
जा.क्र. २०२५ / जन्म/प्रगटन/कावी-०१

जाहीर प्रगटन देण्यात येते की अर्जदार पटेल हसिनाबी हैदर रा.तुरुकवाडी ता.शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी तहसील कार्यालय शिरूर अनंतपाळ या कार्यालयात पटेल हसिनाबी हैदर रा.तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर यांनी जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणे करीता मागणी केली आहे. जन्म झालेल्यांचे नाव पटेल हसिनाबी हैदर सदर व्यक्तीचा तुरुकवाडी या ठिकाणी दिनांक १/१ /१९७७ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणे करीता तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे अर्ज सादर केला आहे. वरील जन्म दिनांका बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही,याची नोंद घेण्यात यावी.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवात १ मार्चला विधी सेवा शिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ मार्च २०२६ रोजी श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे भव्य विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर उपस्थित राहणार आहेत. महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारून योजनांची माहिती देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभही दिला जाणार आहे. तसेच नागरिकांना मोफत विधीसेवा व कायदेविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.


जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांनी या महामेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# चोर सोडून संन्याशास फाशी, महावितरणचा बेजबाबदार कारभार : लाखो रुपये थकवणाऱ्यांना अभय; किरकोळ थकबाकीदारांची वीज गुल?

**मंगरुळमध्ये वीजप्रश्नावर संताप; महावितरणवर भेदभावाचे आरोप... सर्वसामान्य कुटुंबातील दहावी, बारावी परीक्षार्थींना नाहक त्रास...**






**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२५ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे महावितरणच्या बेजबाबदार कारभाराविरोधात ग्रामस्थांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लाखो रुपयांची थकबाकी असलेल्या ग्राहकांवर कारवाई न करता किरकोळ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असताना वीज खंडित झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असून सर्वसामान्य कुटुंबांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गावातील अनेक भागांत अनधिकृतपणे 'आकडे टाकून' वीज वापर सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांना याची माहिती असूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. उलट वेळेवर बिल भरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांनाच अव्वाच्या सव्वा बिलांचा फटका बसत असल्याची तक्रार आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काही धनदांडग्यांची १ ते ५ लाखांहून अधिक थकबाकी असूनही त्यांचा वीजपुरवठा खंडित केला जात नाही.

मात्र, एखाद्या गरीब ग्राहकाची किरकोळ थकबाकी असल्यास त्वरित वसुलीचा तगादा लावून त्याचा वीजपुरवठा तोडण्यात येतो. त्यामुळे थकबाकीदार आणि नियमित ग्राहकांसाठी वेगळे कायदे आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

काही ग्राहक महावितरण कर्मचाऱ्यांना लाच देऊन बेकायदेशीर वीज वापरत असल्याची शंका व्यक्त करण्यात येत असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### अनागोंदी कारभाराचा शेवट होणार का?

महावितरणच्या निष्क्रिय व दुटप्पी धोरणामुळे गोरगरीब ग्राहक भरडले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. बेकायदेशीर वीज वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई करून प्रामाणिक ग्राहकांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली नाही, तर भविष्यात महावितरणविरोधात मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## आ. कैलास पाटील यांच्या वाढदिनी विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ फेब्रुवारी -**
धाराशिव-कळंब तालुक्याचे आमदार कैलास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनरबाजीवरील अवास्तव खर्चाला फाटा देत एक स्तुत्य शालोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे समाधान बाराते व भगवान ओव्हाळ यांच्या पुढाकारातून बुधवार दि.२५ रोजी मलकापूर व संजीतपूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय बॅगचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याची ही अभिनव संकल्पना पालक व ग्रामस्थांनीही कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल पाटील, रामहारी मुंढे, समाधान बारकुल, लहु बारकुल, बालाजी बारकुल, बापू जमदाडे, सुहास बारकुल, सचिन कोकाटे, मारुती बारकुल, उमेश भालेराव, किरण लोमटे, सुधीर पायाळे, नरसिंग लोमटे, विलास कुटे, चितांबर पुरेकर, रामलिंग बाराते, राहुल बाराते, शहाजी हवालदार, बापू मगर, दशरथ मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या वतीने मुख्याध्यापक भंडारे व शाम ओव्हाळ यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुंदर लोमटे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुधीर लोमटे यांनी केले. कार्यक्रम उत्साहात व समाधानकारकरीत्या पार पडला.

## वाशी तालुकामध्ये अवकाळी पाऊस; शेतकऱ्यांची धावपळ



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ फेब्रुवारी -**
मागील दोन-तीन दिवसांपासून वातावरणात ढगाळपणा वाढला असून हवामान तज्ज्ञांनी अवकाळी पावसाचे संकेत दिले आहेत. काही भागात झालेल्या अवकाळी सरींमुळे पिकांचे नुकसान झाल्याची चित्रे समोर येत असून हातातोंडाशी आलेला घास अस्मानी संकट हिरावून नेईल की काय, अशी धास्ती शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात (दि. २४) फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास अचानक पावसाचे वातावरण तयार झाले. आकाश काळवंडून आले आणि वाऱ्यासह सरी कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याने तालुकाभर शेतकऱ्यांची एकच धावपळ उडाली.

तालुक्यात ज्वारी, गहू आणि हरभरा या पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे.

काही गावांमध्ये अगोदर पेरणी झालेल्या भागात ज्वारीची काढणी सुरू आहे, तर काही ठिकाणी ज्वारी व गहू ही पिके फुलोऱ्यात असून परिपक्वतेच्या टप्प्यावर आहेत. हरभरा पिकाची काढणीही सुरू असून अनेक शेतकऱ्यांनी हरभरा काढून शेतात मोठमोठे ढिगारे करून ठेवले आहेत.

अचानक ढग दाटून आल्याने या ढिगाऱ्यांना पावसापासून वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी चवाळे, ताडपत्री व उपलब्ध साधनसामग्री घेऊन तातडीने उपाययोजना केल्या. काही काळ तालुक्यात धावपळीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

सुदैवाने जोरदार पाऊस न झाल्याने मोठे नुकसान टळले; मात्र अवकाळी संकटाची टांगती तलवार अद्यापही कायम असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामानातील अनिश्चिततेमुळे आगामी दिवसांत अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचेही शेतकरी सांगत आहेत.

## वृद्धाची सोन्याची अंगठी फसवणुकीने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२५ फेब्रुवारी -**
भुम बसस्थानक परिसरात एका वृद्धाची सोन्याची अंगठी फसवणुकीच्या प्रकारात लंपास झाल्याची घटना समोर आली आहे.



फिर्यादी माणिक नरहरी जोगदंड (वय ७६, रा. हातोला ता. वाशी जि. धाराशिव) हे दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१० वाजण्याच्या सुमारास भुम बसस्थानक येथे गावाकडे जाणाऱ्या बसची प्रतीक्षा करत बसले होते. त्यावेळी अनोळखी दोन इसमांनी त्यांच्याशी संवाद साधून तुमची ५ ग्रॅम सोन्याची अंगठी बदलून दोन अंगठ्या करून देतो असे सांगून त्यांची दिशाभूल केली.

फसवणूक करून आरोपींनी अंदाजे ४० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी घेवून पोबारा केला. या प्रकरणी माणिक जोगदंड यांनी दि.२३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यांप्रकरणी अधिकचा तपास पोलिस करीत आहेत.

## उमरग्यामध्ये अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ फेब्रुवारी -**
शहर व तालुक्यात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दि. २४ (मंगळवार) रोजी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन यांच्या वतीने उमरगा पोलीस स्टेशन येथे निवेदन सादर करण्यात आले. शहरात वाढत चाललेल्या छेडछाड, पाठलाग, प्रेमाच्या जाळ्यात अडकवून पळवून नेणे आदी प्रकारांविरोधात तातडीने कठोर व प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी ठोस मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

फाउंडेशनच्या प्रतिनिधींसह स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, गेल्या काही महिन्यांपासून शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरात टवाळखोर तरुणांचे घोळके वाढले आहेत. मुलींची छेडछाड, टिंगल-टवाळी, घुरून पाहणे व पाठलाग करणे यांसारख्या प्रकारांत लक्षणीय वाढ झाली आहे. परिणामी विद्यार्थिनी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक स्वास्थ्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

विशेष म्हणजे त्रिकोळी येथील एका अल्पवयीन मुलगी गेल्या दीड महिन्यांपासून बेपत्ता असल्याची गंभीर बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधित मुलीचा शोध घेण्यासाठी जलद व सखोल तपास करून तिला सुरक्षित परत आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष पथकाची स्थापना. शाळा, महाविद्यालये, बसस्थानके व गर्दीच्या ठिकाणी नियमित व वाढीव पोलीस गस्त. रोड रोमिओ व टवाळखोरांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून गुन्हे नोंदविणे. छेडछाड, स्टॉकिंग व अपहरण प्रकरणांत POCSO ct अंतर्गत कठोर कारवाई. त्रिकोळी येथील बेपत्ता मुलीच्या प्रकरणाचा एसआयटीमार्फत जलद तपास. शाळा-महाविद्यालयांत जनजागृती व समुपदेशन कार्यक्रम. महिला हेल्पलाईन व तक्रार नोंदणीसाठी गोपनीय यंत्रणा. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासनाशी समन्वय. फाउंडेशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित नसून समाजाच्या नैतिक व मानसिक आरोग्याशी निगडित आहे. वेळेत ठोस पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या निवेदनावर सत्यनारायण जाधव, ॲड. अर्चना जाधव, राजू भालेराव, करीम शेख, किशोर औरादे, ॲड. ख्वाजा शेख, धानय्या स्वामी, ज्योती माने, शबाना उडचणे-शेख, किशोर बसगुंडे, राजू बटगिरे, प्रदीप मोरे, प्रदीप चौधरी, संतोष चव्हाण, बबीता मदने आदींसह विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, पोलीस प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन उमरगा परिसरात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## तुळजापूरमध्ये अवकाळी पावसाची हजेरी; भाविक-व्यापाऱ्यांची धांदल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
दुपारी अचानक सुरू झालेल्या पावसामुळे तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकांसह बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची एकच धांदल उडाली.

दि.२४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी चारच्या सुमारास अचानक पावसाने हजेरी लावली. अनपेक्षित पावसामुळे भाविक व शहरवासीयांनी मिळेल त्या ठिकाणी आडोसा घेतला. काही काळासाठी शहरातील प्रमुख रस्ते ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसामुळे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले. दर्शन आटोपून बाहेर पडलेल्या भाविकांना रिमझिम पावसातच आपल्या गावी परतावे लागले. वाऱ्यासह पडणाऱ्या पावसामुळे नागरिकांमध्ये अवकाळी पावसाची चर्चा रंगली.

गतवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे यंदाही पावसाळा लवकर सुरू होणार का, असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. हवामानातील अचानक बदलामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वेदांच पिकलेल फळ म्हणजेच श्रीमद् भागवत : प्रजापती विष्णुदास

### अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथेद्वारे भक्ती-ज्ञानाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
श्रीमद् भागवत कथा म्हणजे वृक्षरूपी वेदाचे पिकलेले फळ होय. भागवत कथा श्रवण करत राहिल्यास भक्ती वृद्धिंगत होते, अध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते आणि भौतिक सुखांविषयी वैराग्य निर्माण होते, असे प्रतिपादन इस्कॉन धाराशिव चे श्रीमान प्रजापती विष्णुदास यांनी केले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, तुळजापूर येथे माऊली महिला भजनी मंडळ, जिजामाता नगर यांच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील भागवत कथेत ते बोलत होते.



कलियुग हे दुःखालय, अशाश्वत व मायावी मृगजळाप्रमाणे असल्याचे सांगताना त्यांनी भागवत कथा श्रवणाने मृत्यूची भीती नष्ट होते, अहंकार कमी होतो व भक्त, भक्ती आणि भगवंत यांचा संगम साधला जातो, असे स्पष्ट केले. सप्तदिवसीय भागवत पुराण श्रवणाने अनेकांचा उद्धार झाल्याची उदाहरणेही त्यांनी यावेळी सांगितली.

भागवत कथेसाठी दररोज सुमारे २०० ते २५० भाविक उपस्थित राहत असून दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता २८ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाने होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## एनपीएसधारक शिक्षकांना अर्जित रजा रोखीकरणाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (एनपीएस) योजनेअंतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती, राजीनामा, नोकरी सोडणे अथवा निधन झाल्यास अर्जित रजेचे रोखीकरण देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद चे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षण सचिवांकडे केली आहे.

यासंदर्भात कुलकर्णी यांनी मंगळवारी (ता. २४) माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत प्रधान सचिव रणजीत सिंह देओल यांना निवेदन सादर केले.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या अंशतः व पूर्णतः अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना National Pension System (एनपीएस) लागू आहे.

त्यामुळे त्यांना नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम-१९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) योजना लागू होत नाही.



मात्र, वित्त विभागाच्या अवर सचिव अनिता लाड यांनी १४ जून २०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार या कर्मचाऱ्यांना नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ लागू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जुनी पेन्शन योजनेच्या तुलनेत एनपीएसधारक शिक्षकांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अत्यल्प मिळत असल्याने अर्जित रजेचे रोखीकरण होणे आवश्यक असल्याचे पत्रात नमूद आहे.

सध्या शिक्षण विभागाकडून स्पष्ट आदेश नसल्यामुळे अनेक सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित असून त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे एनपीएस योजनेअंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरणाबाबत तातडीने स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.


### जाहीर प्रगटन
### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय

**प्रकरण क्र.८५२/२०२५**

**प्रकरणः - मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत**

अर्जदार **पांडुरंग नामदेव दळवे रा. देवसिंगा तुळ**, ता. तुळजापूर येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचे **पंजोबा नामे कै. भगवान रामा दळवे** यांचा मृत्यु दिनांक ०५.०२.१९७० रोजी येवती येथे झाला आहे. याबाबत त्यांचे मृत्यु नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर मृत्यु नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय

स्वाक्षरित/-
(प्रियंका लोखंडे)
नायब तहसिलदार (महसुल)
तहसिल कार्याल, तुळजापुर

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २.७० लाखांच्या सोयाबीनची अफरातफर; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ फेब्रुवारी -**

विश्वासाने घेतलेल्या चावीचा गैरवापर करून २ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोयाबीन विक्री केल्याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर खंडु काळे (रा. गुंजोटी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दि.२१ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दि.९ जानेवारी रोजी सकाळी ९.३० या कालावधीत बाहेरपेठ, गुंजोटी (उमरगा) येथे ही घटना घडविल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

फिर्यादी दिपक प्रभाकर काळे (रा. गुंजोटी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने विश्वासाने सोयाबीन साठवलेल्या पत्र्याच्या शेडची चावी घेतली होती. त्यानंतर अविश्वास दाखवून गोडाऊनमधील २०० पॅकेटपैकी ९० पॅकेट (एकूण ५४ क्विंटल) सोयाबीन पिकअप वाहनात भरून नेले व विक्री करून फसवणूक केली. या सोयाबीनची किंमत अंदाजे २,७०,००० रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणी दिपक काळे यांनी दि.२३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### इटकळ येथील चार विद्यार्थ्यांचे एनएमएम एस परीक्षेत यश; ग्रामस्थांकडून सत्कार

**इटकळ, दि.२५ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ ता. तुळजापूर येथील ६ पैकी ४ विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. श्रावणी नवनाथ खटके, आलिया फारूक मकानदार, अर्पिता महादेव क्षीरसागर व निर्जला सतिश गायकवाड या विद्यार्थिनींचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक शिक्षक सतिश ढोणे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. गावचे सरपंच साहेबराव क्षीरसागर, पोलिस पाटील विनोद सलगरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण माशाळकर व मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांच्या हस्ते सत्कार सोहळा पार पडला. मान्यवरांनी शाळेचा वाढता गुणवत्तेचा आलेख पाहून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. शेवटी मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी आभार मानले.



### मंगरुळ येथे आठवडा बाजारास प्रारंभ; दर मंगळवारी भरणार बाजार

**मंगरूळ, दि.२५ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे आठवडा बाजारास प्रारंभ झाला असून दर मंगळवारी हा बाजार नियमितपणे भरणार आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व लहान-मोठे व्यापारी यांची यामुळे मोठी सोय होणार आहे. मंगरुळ व परिसरातील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी हा बाजार महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यापूर्वी खरेदी-विक्रीसाठी तुळजापूर येथे जावे लागत असल्याने वेळ व खर्च वाढत होता. नव्याने सुरू झालेल्या आठवडा बाजारामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय टळणार आहे. या बाजारात भाजीपाला, फळे, दुग्धजन्य पदार्थ, किराणा साहित्य, कापड, मसाले तसेच दैनंदिन जीवनावश्यक वस्तू खरेदी-विक्रीस उपलब्ध होत आहेत. शेतकरी थेट ग्राहकांना आपला माल विक्रीस आणू शकत असल्याने त्यांना योग्य दर मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### कसई शाळेच्या चार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कसई (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथील चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गौतम बोधला गायकवाड, वैष्णवी गणेश कुंभारे, पूर्वा सखाराम म्हमाणे व संस्कृती विठ्ठल शिंदे यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा शाळेत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुंडलिक भोवाळ, सरपंच बोधला गायकवाड, उपसरपंच दिपक हिप्परकर, सदस्य राम भोवाळ, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना भारत मुंढे, निता लोखंडे व पल्लवी राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

# कृषी प्रदर्शन : तब्बल ८० किलो वजनाचा बबल्या, ५ किलो वजनाचा कोंबडा; कोसा खिल्लार जातीचा 'राणा' बैल लक्षवेधी

**श्री तुळजाभवानी जिल्हास्तरीय कृषि महोत्सवात पशुधन प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण... महिला शेतकरी कंपनीचा अभिनव उपक्रम...**









**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**

श्री तुळजाभवानी जिल्हास्तरीय कृषि महोत्सवात आधुनिक शेती तंत्रज्ञानाबरोबरच पशुधन प्रदर्शनाने शेतकरी व उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. विविध जातींच्या पशू-पक्ष्यांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले.

कुंभारी येथील प्रतीक नागनाथ वडणे यांचा 'बबल्या' नावाचा तब्बल ८० किलो वजनाचा बोकड पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. त्याचा मजबूत बांधा आणि उत्तम संगोपनामुळे तो महोत्सवाचा चर्चेचा विषय ठरला. तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील गुंडू पवार यांनी सादर केलेला उस्मानाबादी जातीचा बोकड व शेळी हेही शेतकऱ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले. स्थानिक वातावरणात उत्तम तग धरणारी ही जात आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने अनेकांनी त्याबाबत माहिती घेतली.

तसेच बीजनवाडी येथील पांडुरंग माने यांचा गिरीराज जातीचा सुमारे ५ किलो वजनाचा कोंबडा उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता. त्याच्या वाढीचा वेग व वजन पाहून अनेक शेतकऱ्यांनी कौतुक केले.

तुळजापूर तालुक्यातील वानेवाडी येथील शेतकरी किशोर बामनकर यांचा ३१ महिन्यांचा 'कोसा खिल्लार' जातीचा बैल पशुप्रदर्शनात विशेष आकर्षण ठरला.

'राणा' नावाचा हा बैल आपल्या देखण्या रूपामुळे आणि दमदार शरीरयष्टीमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. दमदार बांधा, ताठ ठेवण व चपळ हालचालीमुळे त्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या प्रदर्शनामुळे देशी पशुधन संवर्धनाला प्रोत्साहन मिळत आहे. या सर्व पशुधनामुळे महोत्सवात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी व उपस्थितांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत या प्रदर्शनाचे कौतुक केले. महोत्सवामुळे महिला सक्षमीकरण व कृषी व्यवसायाला चालना मिळाली. जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या १८ शेतकरी व शेतकरी गटांचा कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

महिला बचतगट, शेतीपूरक व्यवसाय व हातमाग उद्योगांसह सुमारे ७० स्टॉल उभारण्यात आले होते. हस्तकला, घरगुती पदार्थ व शेती साहित्याची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री झाली. आधुनिक ट्रॅक्टर व शेती अवजारांच्या प्रदर्शनालाही चांगला प्रतिसाद मिळाला असून, अनेक शेतकऱ्यांनी बुकिंग केली आहे.

धाराशिव जिल्ह्यात स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या महिला शेतकरी कंपनीचा उपक्रम सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे. या कंपनीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व संचालक तसेच सर्व शेअर्स धारक या महिला शेतकरी आहेत.

शेअर्स धारक महिला शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल 'धनलक्ष्मी' मार्फत थेट जागेवर खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय कंपनीमार्फत महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांशी जोडणी करून दिली जाते.

या उपक्रमामुळे महिला शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असून ग्रामीण भागातील सेंद्रिय शेतीला नवी दिशा मिळत आहे. महिला नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या या कंपनीमुळे स्थानिक स्तरावर शेती व व्यवसाय क्षेत्रात सकारात्मक बदल घडताना दिसत आहेत. या जिल्हास्तरीय कृषी महोत्सवामध्ये तुळजापूर तालुक्यातील विजयालक्ष्मी सखी प्रोडूसर कपंनी, धाराशीव येथील मंजिरी सखी प्रोडूसर कंपनी तर कळंब येथील प्रेमागोपालन सखी प्रोडूसर कंपनी आदींनी सहभाग नोंदवला होता.

महोत्सवात एकूण ७५ स्टॉल्स उभारण्यात आले असून त्यात शासकीय, निमशासकीय विभाग, महिला बचत गट तसेच विविध संस्थांचा सहभाग आहे.

३० शासकीय दालनांमधून कृषी, महसूल, पशुसंवर्धन, जलसंधारण तसेच महिला व बालकल्याण विभागांच्या योजना एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि कृषी यांत्रिकीकरण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला आहे.





सोयाबीन, हरभरा, ऊस, रेशीम आणि आंबा यांसारख्या पिकांच्या लागवडीपासून प्रक्रिया व निर्यातीपर्यंत तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध आहे.

'उत्पादक ते ग्राहक' या संकल्पनेतून थेट विक्री दालनांमुळे शेतकऱ्यांना मध्यस्थांशिवाय बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

## लिपिक संवर्गाच्या वेतन तफावतीबाबत शासनाकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ फेब्रुवारी -**

शासकीय विभागातील लिपिक संवर्गाच्या वेतन श्रेणीतील तफावत दूर करून प्रलंबित मागण्यांची तात्काळ पूर्तता करावी, अशी मागणी माजी आमदार राहुल महाराज मोटे यांनी राज्याचे मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणीत चौथ्या वेतन आयोगापासून तफावत निर्माण झाल्याची बाब त्यांनी पत्रातून निदर्शनास आणून दिली आहे. ही तफावत दूर करून सुधारित वेतन श्रेणी लागू करावी, पदोन्नतीतील अडथळे कमी करावेत, पदनाम बदल करावा तसेच जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, कर्मचारी संघटनांनी १६ फेब्रुवारीपासून आंदोलन सुरू केले असून शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे मोटे यांनी नमूद केले आहे. लिपिक संवर्ग हा प्रशासनाचा कणा असून त्यांच्या न्याय्य मागण्या प्रलंबित ठेवणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शासनाने तातडीने निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

## वृद्धाची सोन्याची अंगठी लंपास; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२५ फेब्रुवारी -**

भुम बसस्थानक परिसरात एका वृद्धाची सोन्याची अंगठी फसवणुकीच्या प्रकारात लंपास झाल्याची घटना समोर आली आहे.

फिर्यादी माणिक नरहरी जोगदंड (वय ७६, रा. हातोला ता. वाशी जि. धाराशिव) हे दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१० वाजण्याच्या सुमारास भुम बसस्थानक येथे गावाकडे जाणाऱ्या बसची प्रतीक्षा करत बसले होते. त्यावेळी अनोळखी दोन इसमांनी त्यांच्याशी संवाद साधून तुमची ५ ग्रॅम सोन्याची अंगठी बदलून दोन अंगठ्या करून देतो असे सांगून त्यांची दिशाभूल केली.

फसवणूक करून आरोपींनी अंदाजे ४० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी घेवून पोबारा केला.

या प्रकरणी माणिक जोगदंड यांनी दि.२३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून भुम पोलीस ठाण्यातगुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## कळंब बसस्थानकाची दयनीय अवस्था; अवकाळी पावसात परिसर तुंबला

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ फेब्रुवारी -**

अवकाळी पावसाच्या पहिल्याच सरीत कळंब येथील बसस्थानकाची दयनीय अवस्था पुन्हा एकदा उघड झाली आहे. संपूर्ण परिसरात पाणी साचल्याने स्थानक अक्षरशः तुंबले असून जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.



बसस्थानक परिसरातील डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून ठिकठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी साचल्यामुळे हे खड्डे नजरेस पडत नसल्याने प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शालेय विद्यार्थी घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. बसचालकांनाही वाहन वळवताना मोठी कसरत करावी लागत आहे. स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने दिली आहेत. मात्र, लवकरच दुरुस्ती करू या आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उन्हाळ्यात धुळीचा त्रास तर पावसाळ्यात चिखल आणि साचलेल्या पाण्याचा त्रास असा दुहेरी फटका सहन करावा लागत आहे. कळंब हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून दररोज शेकडो प्रवासी या स्थानकातून प्रवास करतात. मूलभूत सुविधांकडे होत असलेले दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांत आहे. एखादी दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

खड्डे बुजवून पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## जनावरे चोरी प्रकरणाचा पर्दाफाश; ८ म्हशींसह १२.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**

लासोना शिवारातील एका शेतकऱ्याच्या ०५ म्हशी चोरीस गेल्याप्रकरणी बेंबळी पोलीस स्टेशन येथे अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्यात यापूर्वीही अशा प्रकारचे जनावरे चोरीचे अनेक गुन्हे नोंद झाल्याने रितू खोखर, पोलीस अधीक्षक, धाराशिव यांनी हे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना आदेश दिले होते.



सपोनि सुदर्शन कासार व पथकास गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार नेकनूर (जि. बीड) येथील एक संशयित इसम व वाहन चोरीच्या परिसरात येऊन गेल्याची माहिती मिळाली. त्यानुसार चंद्रकांत जगन्नाथ नन्नवरे (रा. नन्नवरे वस्ती, नेकनूर, ता. जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले.

चौकशीदरम्यान त्याने दिलेल्या माहितीवरून त्याचा साथीदार शंकर सुरेश चव्हाण (रा. ढोकी) यालाही ताब्यात घेण्यात आले.

आरोपींनी यापूर्वी येवती, लासोना, बेंबळी, कोंड, तुळजापूर, काटी सावरगाव, सांगवीमार्डी, सुरतगाव, वैराग, माणकेश्वर शिवार आदी ठिकाणांहून म्हशी चोरी केल्याची कबुली दिली आहे.

आरोपींकडून एकूण ८ म्हशी तसेच गुन्हा करताना वापरलेले महिंद्रा पिकअप वाहन व हिरो स्प्लेंडर दुचाकी असा एकूण सुमारे १२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तपासात आरोपींनी धाराशिव जिल्ह्यातील एकूण १३ म्हशी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्यांच्या इतर साथीदारांचा व उर्वरित म्हशींचा शोध पोलीस घेत आहेत. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी धाराशिव ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## उमरगा बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ फेब्रुवारी -**

बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उमरगा येथे घडली आहे.

फिर्यादी मनिषा नागेश मुळे (वय ३५, रा. सराटी ता. तुळजापूर) या दि.२३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजण्यापूर्वी पंढरपूर ते हैदराबाद या बसने अणदूर ते उमरगा असा प्रवास करीत होत्या. दरम्यान उमरगा बसस्थानक येथे उतरतानाच्या गर्दीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्समधील सुमारे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत ५०,००० रुपये) चोरून नेले.

घटनेची माहिती मिळताच मनिषा मुळे यांनी त्याच दिवशी (दि.२३) उमरगा पोलीस ठाण्यात प्रथम खबर दिली. त्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून आरोपीचा शोध सुरू आहे. गर्दीच्या ठिकाणी प्रवास करताना नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंबाबत सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.